सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | सोमवार, १३ जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक १२४ | पाने १२ | किंमत रु. ८/- | RNI No. MAHMAR/2023/86477 | Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपण हिंदू आहोत याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे. आपले प्राचीन राष्ट्र वैभवशाली होते. ते आम्ही पुन्हा वैभवशाली करू, असा निश्चय करून त्यासाठी प्रत्येकाने संघटनेचे सूत्र स्वीकारले पाहिजे.

**– स्व. बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# होर्मुझ पुन्हा बंद

## युद्धाचा भडका; भारतीय जहाजावर हल्ला, अमेरिकेचा १४२ ठिकाणांवर तर, इराणचा सहा देशांवर तुफान मारा

**दुबई, १२ जुलै**
होर्मुझ जलमार्गात जहाजांना लक्ष्य करणाऱ्या इराणवर रात्री अमेरिकेच्या वायुदलाने जोरदार हल्ले केले. काही तासातच ३०० पेक्षा अधिक क्षेपणास्त्रांच्या मदतीने अमेरिकेने इराणच्या १४२ ठिकाणांवर प्रहार केला. याला प्रत्युत्तर म्हणून इराणच्या 'इस्लामी रिव्हाल्यूशनरी गार्ड कॉर्प्स'ने (आयआरजीसी) जॉर्डन, कुवेत, बहरीन, कतार, संयुक्त अरब अमिराती, ओमान या सहा देशांमधील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे हल्ले चढवले. रविवारी दोन्ही देशांचे परस्परांवर हल्ले सुरू असताना 'आयआरजीसी' होर्मुझ जलमार्ग जहाजांच्या वाहतुकीसाठी बंद करण्याची घोषणा केली.

'होर्मुझ'मध्ये तणाव असतानाच ओमानच्या आखातातून भारताकडे निघालेल्या 'जीएफसी गॅलेक्सी' या भारतीय मालवाहू जहाजावर क्षेपणास्त्राचा मारा करण्यात आला. जहाजावरील ११ खलाशांपैकी १० जणांची सुटका करण्यात आली, तर एक अद्याप बेपत्ता आहे. ओमानच्या नौदलाकडून बेपत्ता खलाशाचा शोध सुरू आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जहाजावरील हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आणि या भागातील तणाव तातडीने कमी करून राजनैतिक चर्चेद्वारे तोडगा काढण्याचे आवाहन केले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने निवेदनात म्हटले की, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये शनिवारी सायप्रसचा ध्वज असलेल्या एका जहाजावर इराणने हल्ला केला. याला प्रत्युत्तर म्हणून वायुदलाने इराणच्या हद्दीतील १४२ लक्ष्यांवर तीनशेपेक्षा अधिक क्षेपणास्त्रांन मारा केला. यात त्यांचे ड्रोन तळ, नौदल क्षमता, दारूगोळा साठवणूक केंद्रे, दळणवळण नेटवर्क आणि किनारी निगराणी केंद्र उद्ध्वस्त झाले. अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी जहाजावरील हल्ल्यानंतर सांगितले की, इराणने चुकीचा निर्णय घेतला आणि त्यांना आता मोठी किंमत मोजावी लागेल.



अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आग लागली

**आखाती देशातील लष्करी तळांवर प्रहार**

अमेरिकेच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना इराणच्या आयआरजीसीने जॉर्डनचे प्रिन्स हसन हवाई तळ, कुवेतमधील अमेरिकेची पॅट्रियट हवाई संरक्षण प्रणाली व रडार केंद्रे आणि बहरीनमधील अमेरिकन लष्करी दळणवळण केंद्र यांना लक्ष्य केले. तसेच. कतार आणि संयुक्त अरब अमिरातीच्या दिशेनेही क्षेपणास्त्रे व ड्रोन डागले. यानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद ठेवण्याची घोषणा केली. (वृत्तसंस्था)

आम्ही कराराचे पालन करण्याची इराणला अनेकदा संधी दिली, मात्र त्यांनी आमची निराशा केली. त्यांनी होर्मुझ जलमार्गातील सुरक्षा धोक्यात आणली आहे. अमेरिकेचा संयम आता संपला असून, त्यांनी विध्वंसासाठी तयार राहावे.



**– पीट हेगसेथ,**
संरक्षण मंत्री, अमेरिका

इराणच्या गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. आम्ही सर्व हुतात्म्यांचा बदला घेऊ. हा बदला आमच्या राष्ट्राची इच्छा आहे. तो कोणत्याही परिस्थितीत पूर्ण केला जाईल. देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्यांना किंमत चुकवावी लागेल.



**– मोज्तबा खामेनेई,**
सर्वोच्च नेते, इराण

# देशभरात ९५ प्रशिक्षण शिबिरे आयोजित; १८,८४२ स्वयंसेवकांना मिळाले प्रशिक्षण

## वार्षिक अखिल भारतीय प्रांत प्रचारक बैठकीतील आढावा

**बेळगाव, १२ जुलै**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वार्षिक अखिल भारतीय प्रांत प्रचारक बैठकीचा रविवारी कर्नाटकातील बेळगाव येथे समारोप झाला. या बैठकीला सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्यासह २२६ कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत मार्च २०२६ नंतर संघाच्या विविध स्तरांवर आयोजित प्रशिक्षण शिबिरांचा आढावा घेण्यात आला. या वर्षी देशभरात एकूण ८३ संघ शिक्षा वर्ग आणि १२ कार्यकर्ता विकास वर्ग संपन्न झाले. यात एकूण १८,८४२ स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात दैनंदिन शाखा, संघ कार्यपद्धती, ग्रामविकास, कुटुंब प्रबोधन, आपत्ती व्यवस्थापन आणि पर्यावरण यासारख्या विषयांचा समावेश होता.

शाखा स्तरावर कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच सप्टेंबरसाठीच्या शाखा विस्तार योजनेवरही चर्चा झाली. यासोबतच, संघाच्या शताब्दी वर्षातील पूर्ण झालेल्या कार्यक्रमांचा आढावा आणि उर्वरित नियोजित कार्यक्रमांच्या नियोजनाबाबतही विचार करण्यात आला. संघ शताब्दी वर्षातील विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून संपर्कात आलेल्या लोकांना समाजकार्य आणि पंत परिवर्तन उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. २०२६-२७ साठी सरसंघचालकांच्या प्रवास योजनेवरही चर्चा झाली.

या बैठकीत सध्याच्या परिस्थितीशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने जनगणना आणि लोकसंख्येतील असंतुलनाने निर्माण होणाऱ्या आव्हानांबाबतच्या माहितीचा समावेश होता. मादकपदार्थांच्या वाढत्या दुष्परिणामांबद्दल चिंता व्यक्त करण्यासोबत, व्यसनमुक्तीसाठी प्राधान्याने प्रयत्न करण्याची गरज आणि संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित करावयाच्या कार्यक्रमांच्या नियोजनावरही चर्चा करण्यात आली.



बैठकीला उपस्थित सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे

**राम मंदिरातील देणगी अनियमिततेबद्दल दुःख**

श्री राम जन्मभूमी मंदिरातील दानपेटीतील अर्पण मोजताना झालेल्या अनियमिततेच्या घटनेबद्दल सर्वांनी दुःख व्यक्त केले. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्राच्या विनंतीवरून सुरू असलेली एसआयटी आणि पोलिसांची कारवाई निर्णायक टप्प्यावर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. राम मंदिराप्रति असलेल्या सर्व रामभक्तांची श्रद्धा आणि अढळ निष्ठा दुखावली जाईल, अशी कोणतीही घटना भविष्यात घडू नये, याची खबरदारी तीर्थ क्षेत्र न्यासने घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### फॉर्म ६ साठी लागेल पालकांचा तपशील

**नवी दिल्ली :** केवळ विशेष सघन पुनरीक्षण प्रक्रियेत (एसआयआर) समाविष्ट न झालेल्या विद्यमान मतदारांनाच नव्हे, तर मतदार यादीत नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नवीन अर्जदारांनाही मतदार यादीत नाव कायम ठेवण्याासाठी किंवा समाविष्ट करण्यासाठी पालकांचे एसआयआर तपशील सादर करणे अत्यावश्यक आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने दिली. आयोगाने सूचना जारी करून, मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी 'फॉर्म-६' भरणाऱ्या नवीन मतदारांसाठी त्यांच्या पालकांचा एसआयआर तपशील जोडणे अनिवार्य केले आहे. मागील वर्षी जूनमध्ये बिहार येथे सुरू करण्यात आलेल्या एसआयआर प्रक्रियेत ही घोषणा समाविष्ट करण्यात आली होती. नवीन मतदारांना 'फॉर्म-६' सोबतच हे घोषणापत्र सादर करण्यास सांगितले होते.

### नेपाळ सरकारने उठवली नाकाबंदी

**काठमांडू :** नेपाळच्या बालेन शाह सरकारने १८ सीमा प्रवेशद्वार पुन्हा उघडून भारतासोबतच्या सीमेवर मोठा दिलासा दिला आहे. यामुळे नागरिक आणि पर्यटक दोघांसाठीही प्रवास सोपा झाला आहे. नेपाळी नागरिकांनी या सीमा नाक्यांवरील सीमाशुल्क कार्यालये पुन्हा सुरू करण्याची बऱ्याच काळापासून मागणी केली होती. नेपाळ सरकारने भिस्वा आणि थोरीसह १८ सीमाशुल्क नाके पुन्हा उघडण्यास परवानगी दिली आहे. या मंजुरीनंतर वाहने कोणत्याही शुल्काशिवाय सीमेपासून नऊ किमीपर्यंत प्रवास करू शकतील. या मर्यादेपलीकडील प्रवासासाठी निर्धारित सीमाशुल्क भरावे लागेल.

# मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृतांची संख्या ९ वर

**पिंपरी, १२ जुलै**
मोशी कचरा डेपो येथे झालेल्या दुर्घटनेत चौथ्या दिवशीपर्यंत राबविण्यात आलेल्या शोधमोहीमेत दुर्घटनाग्रस्त इमारतीत अडकलेल्या ८ नागरिकांचा मृत्यू झाला. इमारतीशेजारील ढिगाऱ्याखाली अडकलेल्या वामन कसबे (वय ५०, मोशी) यांचा मृतदेह रात्री १ वाजता बाहेर काढण्यात आला. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची संख्या ९ इतकी झाली असून या दुर्घटनेतील सर्व कामगारांचा शोध पूर्ण झाल्याने बचावकार्य थांबविण्यात आले आहे.

**शोधमोहीम पूर्ण झाल्याने बचावकार्य थांबविले**

बुधवार, ८ जुलै रोजी दुपारी दीडच्या सुमारास मोशी कचरा डेपो येथे इमारतीवर कचऱ्याचा ढीग कोसळून दुर्घटना घडली. या इमारतीत व इमारतीबाहेरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ, भारतीय लष्कर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, पोलीस प्रशासन तसेच इतर संबंधित यंत्रणांकडून बचावकार्य सुरू करण्यात आले. घटना घडल्यानंतर लागलीच पाच नागरिक स्वतः बाहेर पडले. त्यामुळे उरलेल्या १८ जणांचा शोध सुरू झाला. बुधवारी रात्री ९ नागरिकांना दुर्घटनाग्रस्त इमारतीतून बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. त्यानंतर तब्बल ८४ तास चाललेल्या या बचावमोहीमेतील (पान २ वर)

प्रत्येक सहकाऱ्याला सुखरूप बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, भारतीय सेनेचे जवान, पोलीस प्रशासन तसेच सर्व संबंधित विभागांनी रात्रंदिवस अथक परिश्रम घेतले. मात्र सारे प्रयत्न अपुरे ठरले. आज महापौर म्हणून नव्हे, तर एका सहकाऱ्याच्या आणि माणुसकीच्या नात्याने माझे मन अत्यंत व्यथित झाले आहे. हा अत्यंत वेदनादायी प्रसंग आहे.

**–रवि लांडगे, महापौर,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

घटना दुर्दैवी असून यामध्ये ९ नागरिकांचा मृत्यू झाला. यंत्रणांनी तब्बल ८४ तास सलग बचाव मोहीम राबविली. ९ नागरिकांना सुखरुप बाहेर देखील काढले. मात्र ९ नागरिकांचा झालेला अंत मन हेलावून टाकणारा आहे.

**– डॉ. विजय सूर्यवंशी,** आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### ८६०० शिक्षकांची पगारकपात होणार

**पुणे, १२ जुलै**
राज्यात ९ जुलै रोजी झालेल्या शाळा बंद आंदोलनात सहभागी झालेल्या सुमारे ८ हजार ६०० शिक्षकांच्या एका दिवसाच्या वेतनात कपात करण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या भूमिकेतून शासनाने आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांवर कारवाईचे आदेश यापूर्वीच दिले होते.

९ जुलैच्या आंदोलनापूर्वीच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी सर्व विभागीय उपसंचालक व शिक्षणाधिकाऱ्यांना कोणतीही शाळा बंद राहू नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते. तसेच शाळा बंद ठेवणारे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या एका दिवसाच्या वेतनात कपात करण्याचे आदेशही जारी करण्यात आले होते. शासनाच्या इशाऱ्यानंतरही राज्यातील अनेक शिक्षक आंदोलनात सहभागी झाले. विविध मागण्यांसाठी मुंबईत आंदोलन करण्यात आले. मात्र, या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. त्यामुळे आंदोलनात सहभागी झालेल्या शिक्षकांवर वेतन कपातीची कारवाई करण्यात येणार असल्याचे डॉ. पालकर यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

# ई-२० इंधनात समस्या नाही

## पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांची माहिती

**नवी दिल्ली, १२ जुल**
ई-२० पेट्रोलबाबतच्या चिंता केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी फेटाळून लावल्या. ग्राहकांना येणाऱ्या समस्यांबाबत येणारे वृत्त चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात ई-२५ कडे वळण्याबाबत सरकार संतुलित आणि टप्प्याटप्प्याने धोरण अवलंबेल तसेच यासंदर्भातील निर्णय तांत्रिक चाचण्यांचे निष्कर्ष आणि वाहन उत्पादक घटकांशी होणाऱ्या चर्चेवर अवलंबून असेल, असे पुरी यांनी सांगितले.

वाहन उत्पादक आणि ग्राहक या दोघांनीही ई-२० इंधन स्वीकारले असून, त्याबाबत कोणतीही कार्यान्वयनात्मक अडचण असल्याचे समोर आले नाही, असे पुरी यांनी २० टक्के इथेनॉल-मिश्रित पेट्रोलबाबतचा वाद फेटाळताना सांगितले. ई-२० मध्ये काहीच अडचण नाही, असे वाहन उत्पादक आणि या वाहनांची देखभाल-दुरुस्ती करणारे लोक म्हणतात. मग, अचानक या प्रकरणात रस का वाढला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हे वस्तुस्थितीचे चुकीचे मिश्रण आहे आणि मला यापेक्षा कठोर शब्द वापरायचे नाहीत, असे पुरी म्हणाले.

भारताने आपल्या ऊर्जा संक्रमण धोरणाचा भाग म्हणून मागील काही वर्षांत इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण सातत्याने वाढवले आहे, असे हरदीपसिंग पुरी यांनी सांगितले. आपण साडेतीन वर्षांपासून ई-१५चा वापर करीत आहोत. मागील वर्षीच्या एप्रिलपासून आपण ई-२० वापरत आहोत. एप्रिल २०२५ ते एप्रिल २०२६ हा एक वर्षाचा कालावधी आधीच पूर्ण झाला आहे आणि आता त्यापुढेही आणखी पाच महिने उलटले आहेत, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



**वाहन उत्पादक ई-२० बाबत समाधानी**

सध्या देशभरात जवळपास २० कोटी दुचाकी आणि २० लाख चारचाकी वाहने इथेनॉल मिश्रित पेट्रोलवर चालत आहेत, असे पुरी यांनी सांगितले. वाहन उत्पादक ई-२० बाबत समाधानी आहेत. प्रत्येकाने तसे स्पष्ट केले आहे. ग्राहकांनाही हे उत्पादन पसंत पडले आहे.

**ई-२५साठी सावध पावले**

ई-२५ इंधनाकडे वळताना सरकार सावधपणे पावले उचलत आहे. तांत्रिक मूल्यमापन होईपर्यंत कोणताही निर्णय घेणार नाही, असे पुरी यांनी ई-२५ कडे वळण्याबाबतच्या सूचनांवर भाष्य करताना म्हटले.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

## अंतरंग

२ सरकारविरोधातील आंदोलन गुन्हा
३ युक्रेनमुळे रशियाची नामुष्की
४ भट्टीच्या भगतांना ठेचा! (अग्रलेख)
६ अर्जेंटिना सहाव्यांदा उपांत्य फेरीत

# पुढील वर्षी धावणार पहिली 'बुलेट ट्रेन'



रेल्वे मंत्र्यांची घोषणा

## पहिल्या टप्प्यात सुरत ते बिलिमोरा प्रवास

**हैदराबाद, १२ जुलै**
मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरचा पहिला टप्पा पुढीलवर्षी सुरत आणि बिलिमोरा दरम्यान सुरू होईल, तर संपूर्ण मार्ग डिसेंबर २०२७ पर्यंत टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्याची योजना आहे. देशातील पहिली बुलेट ट्रेन जुलै २०२७ मध्ये धावणार असल्याची घोषणा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रविवारी केली.

मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरचा पहिला टप्पा २०२७ मध्ये कार्यान्वित होईल. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असून, यामुळे देशात हाय-स्पीड रेल्वे नेटवर्कची सुरुवात होईल. सरकारने हा संपूर्ण प्रकल्प एकाच वेळी सुरू करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने सुरू करण्याची योजना आखली आहे, जेणेकरून प्रवाशांना त्याचा लाभ घेता येईल, असे वैष्णव यांनी हैदराबादमधील एका कार्यक्रमात बोलताना सांगितले. बुलेट ट्रेन प्रकल्पाचे बहुतांश काम अखेरच्या टप्प्यात आहे. ही ट्रेन जुलै २०२७ पासून सुरत आणि बिलिमोरा दरम्यान धावेल. यानंतर, वापी-सुरत, वापी-अहमदाबाद, अहमदाबाद-ठाणे आणि अखेरीस अहमदाबाद ते मुंबई हा संपूर्ण मार्ग कार्यान्वित होईल. संपूर्ण मुंबई-अहमदाबाद कॉरिडॉरचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण होणार असून, त्यानंतर या मार्गावर बुलेट ट्रेन पूर्ण क्षमतेने धावणार असल्याचे ते म्हणाले.




**शिंकांसेन तंत्रज्ञानाची मदत**

भारताचा पहिला बुलेट ट्रेन प्रकल्प जपानच्या शिंकांसेन तंत्रज्ञानावर आधारित असून, यामुळे देशाच्या वाहतूक पायाभूत सुविधेत मोठा बदल होणार आहे. काम नियोजित वेळेत पूर्ण झाल्यास या तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतीय प्रवासी २०२७ पासून पहिल्यांदाच ताशी ३०० किमीपेक्षा जास्त वेगाच्या ट्रेनमधून प्रवास करू शकतील. यामुळे प्रवास केवळ अधिक जलद आणि आरामदायक होणार नाही, तर भारत जागतिक हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क असलेल्या देशांच्या यादीतही सामील होणार असल्याचे वैष्णव म्हणाले. (वृत्तसंस्था)

**पुणे-हैदराबाद कॉरिडॉरला मंजुरी**

हैदराबाद भविष्यात देशाचे हाय-स्पीड रेल्वे केंद्र होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हैदराबादला जोडणाऱ्या तीन नवीन बुलेट ट्रेन कॉरिडॉरला मंजुरी दिली. यामध्ये पुणे-हैदराबाद, हैदराबाद-चेन्नई आणि हैदराबाद-बंगळूरू कॉरिडॉरचा समावेश आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे दक्षिण भारतातील हाय-स्पीड रेल्वे नेटवर्कचा लक्षणीय विस्तार होईल.

**प्रवासाचा वेळ कमी**

रेल्वेमंत्र्यांनी सांगितले की, या हाय-स्पीड ट्रेन सुरू झाल्यानंतर प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. हैदराबाद ते पुणे प्रवास २ तास, हैदराबाद ते मुंबई प्रवास २ तास ५० मिनिटे, हैदराबाद ते अमरावतीला १ तास १० मिनिटे, हैदराबाद ते चेन्नई प्रवासाला अंदाजे ३ तास आणि हैदराबाद ते बंगळूरू प्रवासासाठी २ तास ३५ मिनिटे लागतील. यामुळे व्यापार, पर्यटन आणि रोजगाराच्या नवीन संधीही वाढतील.

# वारीत ख्रिश्चन धर्माचा प्रचार

## ससून रुग्णालयासमोर वाटली पत्रके; दाम्पत्यावर गुन्हा दाखल

**पुणे, १२ जुलै**
ससून रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह वारकऱ्यांना धार्मिक पत्रके वाटून ख्रिश्चन धर्माचा प्रचार केल्याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संबंधितांकडून रुग्णांना 'येशूची प्रार्थना केल्यास लवकर बरे व्हाल' असे सांगून धर्मप्रचार केला जात होता. सुनिल मलेपेरमिल वर्गीस (वय ५६) आणि प्रतिभा सुनिल वर्गीस (वय ५५, दोघेही रा. कल्याणीनगर, येरवडा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी ऋषीकेश पांडे (वय २२, रा. भवानी पेठ) यांनी बंडगार्डन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




फिर्यादी शुक्रवार, १० जुलै रोजी मित्रासह ससून रुग्णालयात गेले होते. त्यावेळी ओपीडी क्रमांक ७२ समोर एक महिला व एक पुरुष रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना 'कृपासनम' नावाचे पत्रक वाटत होते. तसेच, उपचारांपेक्षा येशूची प्रार्थना केल्यास लवकर (पान २ वर)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### राम मंदिर न्यासात हस्तक्षेप नाही : नृपेंद्र मिश्रा

**अयोध्या, १२ जुलै**

देणगी अनियमितता प्रकरणात विरोधकांनी जबाबदारी आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्याची मागणी केली असतानाच राम मंदिर तीर्थक्षेत्र न्यास किंवा त्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कामकाजात कोणताही सरकारी हस्तक्षेप होणार नाही, असे राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी रविवारी सांगितले. अयोध्या मंदिराच्या पहिल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची जबाबदारी आणि अधिकार मंदिर न्यासद्वारे निश्चित केली जातील. नवीन सीईओ आर्थिक व्यवहारांवर देखरेख ठेवतील, असे नृपेंद्र मिश्रा यांनी अयोध्येत पत्रकारांना सांगितले. न्यास किंवा त्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कामकाजात कोणताही सरकारी हस्तक्षेप नसेल, असे त्यांनी स्पष्ट केले. एक प्रकारे सीईओ सरकारी हस्तक्षेपाशिवाय न्यासचा सहाय्यक म्हणून काम करेल. ट्रस्टला सीईओ पदासाठी योग्य उमेदवारांची शिफारस करण्यासाठी तीन सदस्यीय पॅनलची स्थापना करण्यात आली आहे.

# सरकारविरोधातील आंदोलन गुन्हा

## जिनपिंग सरकारचा नवा कायदा लागू, परदेशातील नागरिक कायद्याच्या चौकटीत

**बीजिंग, १२ जुलै**

चीनच्या नॅशनल पीपल्स काँग्रेसने मंजूर केलेला 'वांशिक एकता आणि प्रगतीला प्रोत्साहन देणारा कायदा' अधिकृतपणे अंमलात आणण्याची घोषणा केली. या कायद्यातील कलम ६३ मुळे परदेशात राहणारे चिनी नागरिक कायद्याच्या चौकटीत येणार आहेत. देशाच्या सीमेबाहेर सरकारविरोधात आंदोलन आणि टीका करणाऱ्या नागरिकांवरही खटला चालवण्याचा अधिकार सरकारला मिळाला आहे. या वादग्रस्त कायद्याला मानवाधिकार संघटनांनी तीव्र विरोध केला असून, त्यांनी आंदोलन सुरू केले.




चीनमध्ये लागू झालेल्या कायद्यातील कलम ६३ मुळे सरकारला अमर्याद अधिकार मिळाले आहे. या कलमाद्वारे शी जिनपिंग यांच्या सरकारने आंतरराष्ट्रीय सीमांच्या पलीकडे आपली कायदेशीर पोहोच वाढवण्याची तरतूद केली आहे. चीनबाहेरील कोणतीही संघटना किंवा व्यक्ती, देशाची वांशिक एकता आणि प्रगती धोक्यात आणत असेल आणि त्यामुळे वांशिक विभागणीला प्रोत्साहन मिळत असेल तर, त्यांच्यावर खटला चालवण्याचा सरकारला अधिकार मिळेल. सरकारविरोधात आंदोलन करणे, टीका करून बदनामी करणारे परदेशातील चिनी नागरिक कायद्याच्या चौकटीत येईल असे या कलमात स्पष्टपणे म्हटले आहे. अशा संघटना अथवा नागरिकांवर खटला दाखल झाल्यावर चिनी सरकार संबंधित देशाला त्यांच्या प्रत्यार्पणाची मागणी करेल. या कायद्याने चीनने आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून परदेशात आपली कायदेशीर पोहोच वाढवण्याची तरतूद केली आहे.

### आंतरराष्ट्रीय सीमांच्या पलीकडे कायदेशीर पोहोच

चीन सरकारचे म्हणणे आहे की, परदेशात राहणारे चिनी नागरिक आणि संघटनांवर कायदेशीर कारवाई करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे, जे त्यांच्या वांशिक एकतेला हानी पोहोचवण्याचा किंवा तिला कमकुवत करण्याचा प्रयत्न करतात. चीनने आंतरराष्ट्रीय सीमांच्या पलीकडे आपली कायदेशीर पोहोच वाढवण्याची तरतूद.

### संयुक्त राष्ट्रांतील प्रतिनिधींचा आक्षेप

संयुक्त राष्ट्रांच्या अल्पसंख्याक हक्क आणि सांस्कृतिक विभागाच्या विशेष प्रतिनिधींसह अनेक जागतिक मानवाधिकार संघटनांनी या कायद्याचा तीव्र निषेध केला आहे. त्यांचा आरोप आहे की, या कायद्याचा उद्देश वांशिक सलोखा वाढवणे नाही. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचे म्हणणे आहे की, या कायद्याच्या कलम ६३ चा वापर परदेशात राहणारे चिनी नागरिक, सामाजिक कार्यकर्त्यांचा आवाज दडपण्यासाठी केला जाऊ शकतो. ◂ (वृत्तसंस्था)

> चीनमधील अल्पसंख्याकांच्या हक्कांसाठी शांततेने आवाज उठवणे आता गुन्हा ठरेल. चीनसाठी, एकतेचा अर्थ वेगवेगळ्या समुदायांमधील परस्पर एकजूट नसून, बीजिंगच्या राजकीय विचारधारेला आणि धोरणाला संपूर्णपणे शरण जाणे आहे.
>
> **- सारा ब्रूक्स,** उप-प्रादेशिक संचालक, ॲम्नेस्टी इंटरनॅशनल

> कलम ६३ ही पूर्णपणे कायदेशीर, आवश्यक आणि व्यावहारिक तरतूद आहे. या कायद्याला दूरगामी अधिकारक्षेत्र म्हणून चित्रित करून चीनला विकृत आणि बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> **झोऊ जियानशे,** प्रवक्ते, चीन सरकार

# अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या दोघांना अटक

## 3.४१ लाखाचे मेफेड्रोन जप्त

### सदर बझार गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

सदर बझार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यां दोघा जणांना शनिवारी सिद्धार्थ चौकातून अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १४.७१ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रोन ) ड्रग्ज, दोन मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख ४१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान या दोन्ही आरोपींविरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्याच्या कलम ८ (क), २१ (ब) अन्वये गुन्हा रजि. नं. ५७६/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुजम्मील हबीब कोथींबीरे (वय २९ वर्ष, रा. साखर पेठ, सोलापूर) आणि निलेश बसवराज बिळूर (वय २७ वर्ष, रा. काडादी चाळ, रेल्वे स्टेशन जवळ, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार शहरा-तील अमली पदार्थ विक्रीला आळा घालण्यासाठी सदर बझार पोलीस ठाण्याचे पथक शनिवार रोजी खाजगी वाहनाने गस्त घालत होते. दरम्यान, सिद्धार्थ चौक पाण्याच्या टाकीजवळ दोन इसम संशयास्पदरित्या फिरत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पथकाने तात्काळ शिताफीने सापळा रचून दोन पंचांसमक्ष त्या



दोघांना जागीच ताब्यात घेतले.

यावेळी पोलिसांनी आरोपींची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता मुजम्मील कोथींबीरे याच्या ताब्यातून १,३६,४०० रुपये किमतीचे ६.८२० ग्रॅम एम.डी. ड्रग्ज, एक विवो कंपनीचा मोबाईल आणि २,००० रुपये रोख तर निलेश बिळूर याच्या ताब्यातून १,५७,८०० रुपये किमतीचे ७.८९० ग्रॅम एम.डी. ड्रग्ज आणि एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त डॉ. एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त डॉ. प्रितम यावलकर आणि सहाय्यक पो-लीस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री यांच्या मार्गदर्शनाखाली व सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे व पोलीस निरीक्षक रविंद्रनाथ भंडारे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक रा-हुल सावंत, पोलीस अंमलदार संतोष पापडे, मुल-ानी, राजेश चव्हाण, बागलकोटे (परिमंडळ), प्रमोद पकाले, गायकवाड, विशाल बोराडे, उमेश चव्हाण, हनमंत पुजारी, परशुराम म्हेत्रे. अमीन शेख, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे, काशिनाथ वाडेकर, आनंद निंबाळकर यांनी पार पाडली आहे.

# फ्लॅटमध्ये जबरदस्तीने घुसून महिलेचा लैंगिक छळ

## 'फ्लिपकार्ट'च्या डिलिव्हरी बॉयला अटक

**बंगळुरू, १२ जुलै**

परवानगीशिवाय फ्लॅटमध्ये घुसून आणि वॉशरूम वापरण्याच्या बहाण्याने लैंगिक छळ केल्याचा आरोप प्रकरणी पोलिसांनी एका डिलिव्हरी एजंटला अटक केली आहे. विजय मल्लिकार्जुन कामथ, असे त्याचे नाव आहे. या प्रकरणी महिलेने केलेल्या तक्रारीवरून मराठहल्ली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

डिलिव्हरी बॉय पार्सल देण्यासाठी माझ्या घरी आला. त्यानंतर त्याने मला वॉशररूम वापरू देण्याची विनंती केली. मी अनोळखी व्यक्तींना घरात प्रवेश देत नाही, असे सांगत त्याच्या विनंतीला स्पष्ट नकार दिला.

मात्र, माझ्या विरोधाकडे दुर्लक्ष करून तो थेट घरात घुसला, असा आरोप महिलेने समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये केला आहे. वॉशरुममधून बाहेर आल्यानंतर डिलिव्हरी बॉयने माझ्यासमोर अश्लील वर्तन केले. या घटनेमुळे मला प्रचंड मानसिक धक्का बसला असून, माझ्याच घरात मला असुरक्षित वाटू लागले. कोणाच्याही घराच्या मर्यादांचे उल्लंघन करण्याचा किंवा परवानगीशिवाय घरात घुसण्याचा अधिकार कोणालाही नाही, असेही पीडितेने म्हटले आहे. महिलेने फ्लिपकार्ट डिलिव्हरी एजंट विजय मल्लिकार्जुन कामथ याच्याविरुद्ध विनयभंगाची तक्रार दिली होती, त्यावरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर कायदेशीर कारवाई सुरू आहे, असे बंगळुरू पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### आम्ही अत्यंत व्यथित : फ्लिपकार्ट

या घटनेमुळे आम्हाला अत्यंत धक्का बसला असून, आम्ही ग्राहकाला पूर्ण सहकार्य करीत आहोत. ग्राहकांची सुरक्षा ही आमच्यासाठी सर्वांत महत्त्वाची आहे. त्यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. हे प्रकरण आमच्या निदर्शनास येताच, आम्ही संबंधित डिलिव्हरी पार्टनरला तातडीने कामावरून काढून टाकले आहे. याप्रकरणी तपास यंत्रणांना पूर्ण सहकार्य करण्यास कटिबद्ध आहोत, असे फ्लिपकार्टने म्हटले आहे.



आसाममध्ये मादक पदार्थांची निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरोधात राज्य सरकाराने मोठी मोहीम हाती घेतली आहे. जप्त केलेल्या मादक पदार्थांची पाहणी करताना मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा

# विनायक राऊत यांच्या सुनेच्या तक्रारीची दखल

## निष्पक्ष चौकशीची मागणी

**मुंबई, १२ जुलै**

उबाठाचे माजी खासदार विनायक राऊत यांच्या सून गिरीजा राऊत यांनी सासरच्या मंडळींविरोधात दाखल केलेल्या कौटुंबिक छळाच्या तक्रारीची शिवसेना नेत्या आणि विधानपरिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी कोणत्याही राजकीय दबावाखाली न येता सखोल व निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. गोऱ्हे यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

विनायक राऊत, त्यांचे पुत्र गीतेश राऊत आणि शामल राऊत यांच्यासह अन्य काहींविरुद्ध गिरीजा राऊत यांनी मानसिक छळ आणि कौटुंबिक अत्याचाराची तक्रार पोलिसांत दाखल केली आहे. या पार्श्वभूमीवर, शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी वर्षा जितेंद्र मोरे यांच्या माध्यमातून डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पीडित गिरीजा राऊत यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर संवाद साधला. गिरीजा यांनी त्यांच्यावर झालेल्या कथित अत्याचारांची माहिती दिल्यानंतर, या लढ्यात तुम्ही एकट्या नसून आम्ही खंबीरपणे तुमच्या पाठीशी आहोत, असा धीर डॉ. गोऱ्हे यांनी दिला.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून डॉ. गोऱ्हे यांनी गिरीजा राऊत यांच्या वकिलांशीही दूरध्वनीवरून संपर्क साधला. या प्रकरणातील कायदेशीर तरतुदी आणि पुराव्यांचे सादरीकरण याबाबत त्यांनी सविस्तर चर्चा केली. विशेष म्हणजे, या प्रकरणात गिरीजा यांच्या बाजूने सरकारी वकिलांची नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे न्यायप्रक्रिया अधिक प्रभावी व निष्पक्ष होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. ◂ (तभा वृत्तसेवा)

### 'लाडक्या सुनेचे रक्षण' धोरणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी

गिरीजा यांनी केलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. दोषी आढळणाऱ्या कोणालाही कायद्यापासून संरक्षण मिळता कामा नये, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या 'लाडक्या सुनेचे रक्षण' धोरणाचा संदर्भ देत, राज्यातील प्रत्येक सून सुरक्षित असल्याचा विश्वास निर्माण करण्यासाठी या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

# लॉरेन्स बिश्नोईला भारतातून ताब्यात घेणार

## अमेरिकेच्या न्याय विभागाकडून प्रत्यार्पणाची तयारी

**वॉशिंग्टन, १२ जुलै**

कॅनडातील खलिस्तानवादी फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येसह इतर अनेक गुन्ह्यांमध्ये कुख्यात गुन्हेगार लॉरेन्स बिश्नोई याच्यावर न्यायालयाने आरोप निश्चित केल्यानंतर, अमेरिकेच्या न्याय विभागाने त्याच्या प्रत्यार्पणाची तयारी सुरू केली आहे. अमेरिकेतील विविध राज्यात लॉरेन्स आणि त्याच्या साथादीरांवर ५० हून अधिक गुन्हे दाखल आहेत.

कॅलिफोर्नियाच्या सेंट्रल डिस्ट्रिक्टमधील अमेरिकन अॅटर्नी कार्यालयाचे अधिकारी सियारन मॅकइव्हॉय यांनी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, बिश्नोई भारतातील तुरुंगात आहे. आम्ही त्याला अमेरिकेत प्रत्यार्पण करण्याची मागणी करणार आहोत. या आठवड्याच्या सुरुवातीला, अमेरिकेच्या न्याय विभागाने 'ऑपरेशन हार्डबॉल' अंतर्गत दोषारोपपत्रात ३७ जणांवर गुन्हे दाखल केले होते. अमेरिका, कॅनडा आणि युरोपमधील कायदा अंमलबजावणी संस्थांनी संयुक्तपणे केलेल्या या कारवाईत ट्रान्सनॅशनल नेटवर्क (आंतरराष्ट्रीय



जाळे) असलेल्या तीन भारतीय गुन्हेगारी सिंडिकेटशी संबंधित २४ जणांना अटक करण्यात आली. बिश्नोई आणि त्याचा साथीदार गोल्डी ब्रार यांच्याशिवाय अमेरिकेच्या दोषारोपपत्रात नाव असलेल्या इतर टोळी प्रमुखांमध्ये आसामच्या तुरुंगात असलेला जग्गू भगवानपुरिया आणि कॅनडातील रहिवासी रवींदर सिंग धांडा यांचा समावेश आहे. बिश्नोई आणि ब्रार यांच्यावर निज्जरच्या हत्येचे आदेश दिल्याचा आरोप आहे. एफबीआयने ब्रारच्या अटकेसाठी माहिती देणाऱ्याला ५० हजार डॉलर्सचे बक्षीस जाहीर केल्याचे त्यांनी सांगितले.

### भारतात शिक्षा भोगावी लागणार

भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ मध्ये प्रत्यार्पण करारावर स्वाक्षरी झाली आहे. त्यामुळे अमेरिकेने लॉरेन्सला ताब्यात घेण्याची अधिकृत मागणी केल्यास भारताला त्याचे प्रत्यार्पण करावे लागेल. परंतु, बिश्नोईच्या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा कायदेशीर विचार म्हणजे तो आधीच न्यायालयीन कोठडीत आहे आणि भारतात त्याच्यावर अनेक गुन्हेगारी खटले सुरू आहेत. याचा अर्थ भारत कायदेशीररित्या असा युक्तिवाद करू शकतो की, कोणत्याही प्रत्यार्पणापूर्वी बिश्नोईला आधी त्याच्यावर प्रलंबित असलेल्या खून, खंडणी आणि संघटित गुन्हेगारीच्या खटल्यांना सामोरे जावे लागेल आणि दोषी आढळल्यास शिक्षा भोगावी लागेल. त्यानंतर त्याला अमेरिकेच्या स्वाधीने केले जाऊ शकते. ◂ (वृत्तसंस्था)

# मुंबईत केतन हत्याकांडाची पुनरावृत्ती; मुलीला डोंगरावरून ढकलले

**मुंबई, १२ जुलै**

पुण्यातील लोहगड किल्ल्यावरील केतन अग्रवाल हत्याकांडासारखीच घटना मुंबईत समोर आली आहे. कांदिवली पूर्व भागातील समता नगर परिसरात एका अल्पवयीन मुलीची उंच डोंगरावरुन ढकलून हत्या करण्यात आल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी आरोपी डिलिव्हरी बॉयला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनुसार, शुक्रवारी सकाळी दामू नगरमागील डोंगराळ भागात एका अल्पवयीन मुलीचा मृतदेह आढळला. माहिती मिळताच समता नगर पोलिस, गुन्हे शाखा आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली. घटनास्थळाचा सखोल तपास करण्यात आला, वैज्ञानिक पुरावे गोळा करण्यात आले. तपासादरम्यान, पोलिसांनी स्थानिक रहिवाशांची विचारपूस केली. हरवलेल्या व्यक्तींच्या नोंदी तपासल्या आणि तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण केले. या प्रयत्नांमुळे मृत मुलीची ओळख पटली. मृत अल्पवयीन मुलीचे आरोपी सूरज मारुती वाघमारेसोबत प्रेमसंबंध होते, असे तपासात उघड झाले. ◂ (वृत्तसंस्था)

### हत्येमागील कारण गुलदस्त्यात

पोलिसांनी चौकशी आणि गोळा केलेल्या पुराव्यांच्या आधारे त्या तरुणाला ताब्यात घेत अटक केली. आरोपी सूरज डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. हत्येमागील खरे कारण शोधण्यासाठी पोलिस सध्या आरोपीची चौकशी करत आहेत. प्राथमिक तपासात अद्याप कोणताही स्पष्ट हेतू समोर आलेला नाही.

# सुट्टे पैसे नाहीत; उतर खाली

## बस कंडक्टरने थेट परिवहन मंत्र्यांनाच बाहेर काढले

**बंगळुरू, १२ जुलै**

एसटीचा प्रवास अथवा महापालिका बसचा, यातून प्रवासावेळी सामान्यांना होणारा त्रास ही गृहीत धरलेलीच बाब आहे. कधी बस उशिरा येणे, तर कधी किरकोळ गोष्टींवरून बसचालक आणि वाहकांशी प्रवाशांची वादावादी नित्याचीच बाब. असाच धक्कादायक अनुभव खुद्द कर्नाटकच्या परिवहन मंत्र्यांना बसमधून प्रवास करताना आला. परिवहन मंत्री बैरथी सुरेश यांनी गैरवर्तन करणारे वाहक आणि चालक यांना निलंबित करण्याचा आदेश दिला.

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेत सर्वसामान्य प्रवाशांना नेमक्या कोणत्या अडचणी येतात, हे जाणून घेण्यासाठी सुरेश यांनी बसने प्रवास करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी शनिवारी रात्री बंगळुरूच्या बससमध्ये तोंडाला मास्क लावून



बसमधून प्रवास करताना परिवहन मंत्री बैरथी सुरेश

प्रवास केला. एका साध्या प्रवासाने सुरू झालेली ही मोहीम काही वेळातच नाट्यमय वळणावर पोहोचली. हेब्बाल ते नागशेट्टीहल्ली या मार्गावरील बसने प्रवास करत असताना त्यांनी तिकीट काढण्यासाठी बस कंडक्टरकडे १०० रुपयांची नोट दिली. मात्र, वाहकाने सुट्टे पैसे नसल्याचे कारण सांगत त्यांना तिकीट देण्याऐवजी थेट बसमधून उतरण्यास सांगितले. अनेक प्रवाशांना रोज भेडसावणाऱ्या या समस्येचा थेट अनुभव मंत्र्यांनी स्वतः घेतला.

### रिक्षाचालकाची मनमानी उघड

मंत्र्यांची ही मोहीम केवळ बस प्रवासापुरती मर्यादित राहिली नाही. नागशेट्टीहल्ली येथे बसमधून उतरल्यानंतर सुरेश यांनी एका ऑटो-रिक्षा चालकासोबत सुरू असलेल्या वादातही हस्तक्षेप केला. त्या रिक्षाच्या मीटरवर ३० रुपये भाडे दिसत असतानाही चालक प्रवाशाकडून ३६ रुपयांची मागणी करत हुज्जत घालत होता. ◂ (वृत्तसंस्था)

### चालक, वाहकाची उडाली भंबेरी

सुरेश यांनी शनिवारी रात्री सुमारे दोन तास १० पेक्षा जास्त बीएमटीसी बसेसमधून गुप्तपणे प्रवास केला. या दरम्यान त्यांनी सर्वसामान्य प्रवाशांना भेडसावणाऱ्या अनेक समस्या स्वतः अनुभवल्या. यातील सर्वात गंभीर घटना तेव्हा घडली, जेव्हा एका प्रवाशाने उतरण्याचा इशारा करूनही बस चालकाने 'फन वर्ल्ड' बस स्थानकावर बस थांबवली नाही. यावर तत्काळ कारवाई करत मंत्र्यांनी संबंधित चालक आणि वाहक या दोघांनाही निलंबित करण्याचे आदेश दिले. बसमध्ये मंत्री प्रवास करत असल्याचे समजताच दोघांचीबी भंबेरी उडाली.

## मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृतांची संख्या ९ वर

(पान १ वरून)

शोधकार्यामध्ये चौथ्या दिवशी इमारतीत अडकलेल्या ७ आणि इमारतीशेजारील ढिगाऱ्यात अडकलेल्या १ अशा ८ व्यक्तींचा मृत्यू झाला. तर इमारतीत अडकलेल्या भावेश वाणी यांचा ९ जुलै रोजी मृत्यू झाला होता. बचावकार्याच्या चौथ्या दिवशी अक्षय सावंत (वय ३५, मोशी), सुनील कोरके (वय ४०, आळंदी), सन्नी माने (वय ३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (वय २६, संजय गांधी नगर, मोशी), रणजीत पाटील (वय २२, मोशी) तसेच राहुल गायकवाड (वय ३४, मोशी) यांचा मृत्यू झाला. एक नागरिक इमारतीशेजारील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अडकून पडल्याने त्याठिकाणी निरंतर शोधमोहीम सुरू होती. अखेर चौथ्या दिवशी मध्यरात्री १ वाजता वामन कसबे (वय ५०, मोशी) यांचा शोध लागला. त्यांना तातडीने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात हलविण्यात आले.

मात्र, तपासणीअंती त्यांना मृत घोषित करण्यात आले. संपूर्ण बचावकार्यादरम्यान आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी प्रत्येक घडामोडीवर बारीक लक्ष ठेवून होते. दुर्घटनाग्रस्त इमारतीमध्ये सुरक्षित प्रवेश करण्यासाठी अनेक अडचणी येत होत्या. इमारत अस्थिर असल्याने ती पूर्ण कोसळून आत अडकलेल्या जीवितांना धोका पोहोचू नये, याची काळजी घेऊन बचावकार्य राबविण्यात येत होते. इमारतीचा वरचा मजला हटविण्यासाठी दोन अत्याधुनिक डिमोलिशन एक्सकॅव्हेटर यंत्रे मागविण्यात आली. अडकलेल्या सर्व आठही नागरिकांना बाहेर काढून तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, रुग्णालय प्रशासनाने या सर्वांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. दरम्यान, इमारतीशेजारील ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकाचा शोध घेण्यासाठी सर्चिंग ऑपरेशन निरंतर सुरू होते. यासाठी एनडीआरएफच्या श्वान पथकाचीही मदत घेण्यात आली. अखेर मध्यरात्री १ वाजता वामन कसबे यांचा शोध लागला. त्यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, रुग्णालय प्रशासनाने त्यांना मृत घोषित केले. या दुर्घटनेत अडकलेल्या सर्व नागरिकांचे शोधकार्य पूर्ण झाल्याने अखंडपणे तब्बल ८४ तास चाललेली ही बचावमोहीम मध्यरात्री थांबविण्यात आली. ◂ (तभा वृत्तसेवा)

## वारीत ख्रिश्चन धर्माचा प्रचार

(पान १ वरून)

बरे व्हाल, असे सांगून धर्मप्रचार केला जात असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पत्रकात येशूच्या प्रार्थनेमुळे आजार बरे झाले, नोकऱ्या मिळाल्या तसेच अपत्यप्राप्ती झाल्याचे अनुभव नमूद करण्यात आले होते.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त उपचारासाठी आलेल्या काही वारकऱ्यांनाही संबोधित करून ख्रिश्चन धर्म इतर धर्मांपेक्षा श्रेष्ठ असल्याचे सांगितले जात होते. संशय आल्याने फिर्यादीने संबंधितांना विचारणा केली. उपस्थित लोकांमध्ये ख्रिश्चन धर्माविषयी आकर्षण निर्माण व्हावे, या उद्देशाने भुलथापा देत 'कृपासनम' पत्रकांचे वाटप करण्यात आले. तसेच हिंदू धर्माचा जाणीवपूर्वक अपमान केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या तक्रारीवरून बंडगार्डन पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक शिंदे करत आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)



‘मातोश्री’वर काळी जादू करणारा बंगालचा जादूगार येत असतो, हे सर्वांना माहिती आहे आणि विनायक राऊत तर त्यात मास्टर आहेत. जादूटोण्याच्या विरोधात बोलायचे आणि स्वतः जादूगारांना जवळ ठेवायचे, ही यांची दुटप्पी भूमिका आहे.
**- संजय शिरसाट**, मंत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोमवार १३ जुलै २०२६ ३




आमिर खानचा तिसरा विवाह सोहळा काही दिवसांपूर्वी पार पडला. अशा काही गोष्टी जेव्हा घडतात तेव्हा या लोकांकडे ‘लव्ह जिहाद’चा ‘ब्रँड ॲम्बेसेडर’ म्हणून पाहायचे का? ही चर्चा हळूहळू वाढत चालली आहे. हिंदू समाज बांधवांनी अशा लोकांपासून सावध राहावे.
**- नितेश राणे**, मंत्री

# युक्रेनमुळे रशियाची नामुष्की

### । इंधनाच्या तुटवड्यामुळे ‘वर्क फ्रॉम होम’चे संकट । सरकारचा आदेश, तेल प्रकल्पातील उत्पादन ठप्प

**मॉस्को, १२ जुलै**

तेल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य करत युक्रेनने गेल्या आठवड्यात रशियावर केलेल्या जोरदार हल्ल्यामुळे देशभरात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक तेल प्रकल्पातील उत्पादनाचे काम सध्या ठप्प असल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठा अतिशय कमी आहे. पर्यायाने रशियन सरकारने कर्मचाऱ्यांना घरूनच काम (वर्क फ्रॉम होम) करण्याचा आदेश दिला आहे.

युक्रेनने अलीकडेच रशियन तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर मोठे हल्ले केले आहेत, ज्यामुळे देशातील इंधन संकट अधिकच गंभीर झाले आहे. पेट्रोल पंपावर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा असून, इंधन मिळणे कठीण झाले आहे. युक्रेनच्या सततच्या ड्रोन हल्ल्यांमुळे रशियाच्या सायबेरिया प्रदेशात शनिवारपासून ‘वर्क फ्रॉम होम’ सुरू झाले, तर इतर प्रांतातील कर्मचाऱ्यांना सोमवारपासून घरूनच काम करण्याचे आदेश देण्यात आले. अत्यंत आवश्यक असल्याशिवाय लोकांनी गाडीने प्रवास करू नये, असा सल्लाही दिला आहे. युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यांनी रशियन तेल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य केल्यानंतर या प्रदेशात इंधन संकट निर्माण झाले असताना ही घोषणा करण्यात आली आहे.

(वृत्तसंस्था)



रशियाची राजधानी मॉस्को येथील पेट्रोल पंपावर वाहनाच्या लागलेल्या रांगा

### कंपन्यांना आदेशाचे पालन करण्याची सक्ती

नोवोसिबिर्स्कच्या सायबेरियन प्रदेशाचे उपराज्यपाल कॉन्स्टँटिन खालझोव्ह यांनी एका आदेशावर स्वाक्षरी करताना सांगितले की, सर्व कंपन्यांनी अत्यावश्यक कर्मचारी वगळता इतरांना घरून काम करण्याची परवानगी देणे आणि इंधनाचा वापर कमी करणे आवश्यक आहे. आदेशाचे पालन करणे सक्तीचे असून, उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.

### ऑनलाईन बैठक घेण्यावर भर

टॉम्स्क या दुसऱ्या सायबेरियन प्रदेशाच्या उपराज्यपाल ओल्गा क्रिलोव्हा यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांना सरकारी दौऱ्यांचे काळजीपूर्वक नियोजन करण्याचा आणि चर्चेसाठी ऑनलाइन बैठकांसारख्या दूरस्थ पद्धतींचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. युक्रेनियन हल्ल्यांमध्ये तेल शुद्धीकरण कारखान्याचे मोठे नुकसान झाले, ज्यामुळे तेलाचा पुरवठा खंडित झाला. सध्या ९० टक्के भागात इंधनाचा तुटवडा आहे.

### इंधन भरण्यावर बंदी

काही भागांमध्ये पेट्रोल पंपांवर इंधन भरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. अनेक भागांमध्ये, वाहने पेट्रोल पंपांवर इंधनासाठी १२ तासांपर्यंत वाट पाहत आहेत. लोकांना त्यांच्या वाहनांचा वापर कमी करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# अत्यल्प पर्जन्यमानामुळे खरीप क्षेत्रात २१ टक्के घट

### । देशातील अनेक भागांत दुष्काळाचे सावट । महाराष्ट्रातही चिंताजनक स्थिती

**नवी दिल्ली, १२ जुलै**

एल निनोचा प्रभाव आणि मान्सूनच्या लहरीपणामुळे यंदा देशभरात खरीप हंगाम प्रभावित होताना दिसत आहे. अत्यल्प पर्जन्यमानामुळे देशातील खरीप क्षेत्रात २१ टक्के घट झाली असून, अनेक भागांत दुष्काळाचे सावट आहे. महाराष्ट्रातही चिंताजनक स्थिती आहे. देशातील ७३८ पैकी तब्बल ३७७ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा फारच कमी पाऊस झाला आहे. यातील सुमारे १०० जिल्ह्यांमधील शेती पूर्णतः पावसावर अवलंबून आहे.

जूनमधील संथ सुरुवातीनंतर मान्सून जुलैमध्ये वेगाने सावरला. यामुळे राष्ट्रीय पातळीवरील पावसाची तूट ४० टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर आली आहे. असे असूनही पावसाचे असमान वितरण खरीप पेरण्यांसाठी धोक्याचे बनले आहे. फटका बसलेल्या जिल्ह्यांपैकी अनेक जिल्हे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, गुजरात, उत्तरप्रदेश व बिहारसारख्या प्रमुख कृषी



राज्यांमधील आहेत. महाराष्ट्रात आतापर्यंत केवळ ५६ टक्के खरीप पेरण्या झाल्या. ४४ टक्के पेरण्या शिल्लक आहेत. अशा परिस्थितीत अर्थतज्ज्ञ कृषी क्षेत्रातील वाढ व अन्नधान्य महागाईवर धोका व्यक्त करीत आहेत.

‘क्रिसिल क्विकॉनॉमिक्स’ने प्रसिद्ध अहवालात पावसाचे असमान वितरण, खरिपाच्या संथ पेरण्या आणि एल निनोची स्थिती शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक असल्याचे म्हटले आहे. अलिकडच्या मुसळधार पावसाने काहीसा दिलासा नक्कीच दिला आहे, पण सध्या खरीप हंगामासाठी स्थिती पूर्णपणे सुरक्षित मानता येणार नाही. हवामान विभागाने जुलैमध्ये दीर्घकालीन सरासरीपेक्षा ६ टक्के कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. अशा परिस्थितीत जुलैचा दुसरा पंधरवडा कोरडा जाऊ शकतो.

(वृत्तसंस्था)

### महागाई वाढण्याची शक्यता

कमकुवत मान्सूनचा परिणाम टप्प्याटप्प्याने अर्थव्यवस्थेवर होतो. सुरुवात शेतीपासून होते. नंतर अन्नधान्याच्या किमती, ग्रामीण उत्पन्न, ग्राहकांचा खर्च आणि शेवटी महागाई व पतधोरणापर्यंत पोहोचतो. ग्राहक किंमत निर्देशांकात अन्नधान्याच्या वस्तूंचा वाटा ४० टक्के आहे. अशा वेळी महागाई नियंत्रणात राहील की चिंतेचा विषय बनेल याचे प्राथमिक संकेत मान्सून देतो. यंदा कमी पावसामुळे पेरण्या लांबल्याने सणांच्या काळात डाळी तसेच तांदूळ आणि गहूही महाग होणार, असेही संकेत मिळत आहे.

# रशियन तेल खरेदीत भारत जगात दुसरा

### महिनाभरात ४.५ अब्ज युरो किमतीचे इंधन आयात

**नवी दिल्ली, १२ जुलै**

इराण-अमेरिका यांच्या शांतता करार झाल्यानंतर आणि मध्यपूर्वेतील तणाव निवळल्यानंतर भारताची रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी सुरूच आहे. जून महिन्यात रशियाकडून ४.५ अब्ज युरो किमतीच्या कच्च्या तेलाची आयात करण्यात आली. या वाढीमुळे भारत चीननंतर रशियन तेल आणि वायूचा जूनमध्ये रशियाकडून विक्रमी प्रमाणात कच्चे तेल खरेदी केले. रशियाच्या एकूण तेल निर्यात कमाईत घट होऊनही, भारताने केलेली रशियन कच्च्या तेलाची खरेदी मे महिन्याच्या तुलनेत ३४ टक्क्यांनी वाढली. ही माहिती ‘सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर’च्या अहवालातून समोर आली आहे.

अहवालानुसार, भारताने जूनमध्ये रशियाकडून ४.५ अब्ज युरो किमतीचे कच्चे तेल खरेदी केले. याशिवाय ५.५ अब्ज युरो तेलाचा होता. यामुळे, भारत चीननंतर रशियन तेल आणि वायूचा जगातील दुसरा सर्वात मोठा खरेदीदार बनला.

अहवालानुसार, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या जामनगर तेल शुद्धीकरण प्रकल्पाला होणारा रशियन तेलाचा पुरवठा मे महिन्याच्या तुलनेत जूनमध्ये १५० टक्क्यांनी वाढला. त्याचवेळी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या पारादीप रिफायनरीला होणारी आयात १२६ टक्क्यांनी वाढली. बीपीसीएलच्या कोची रिफायनरी आणि नायरा एनर्जीच्या वडीनार रिफायनरीला होणारा रशियन तेलाचा पुरवठा अनुक्रमे ८३ टक्के आणि ४५ टक्क्यांनी वाढला.

(वृत्तसंस्था)

# न सांगता जोडीदाराचे फोन रेकॉर्ड करणे गुन्हाच

### । घटस्फोटासाठी पुरावा म्हणून ग्राह्य नाही । उच्च न्यायालयाचा निर्णय

**नवी दिल्ली, १२ जुलै**

पती किंवा पत्नीने एकमेकांच्या संमतीशिवाय त्यांच्यातील फोनवरील संभाषण गुपचूप रेकॉर्ड करणे हा थेट गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचा भंग ठरतो. त्यामुळे वैवाहिक वादाच्या खटल्यांमध्ये अशा प्रकारे नकळत केलेले कॉल रेकॉर्डिंग पुरावा म्हणून न्यायालयात ग्राह्य धरले जाऊ शकत नाही, असा निर्णय तेलंगणा उच्च न्यायालयाने दिला.

न्यायालयात सादर केल्या जाणाऱ्या अशा कागदपत्रांचा किंवा ऑडीओ क्लिपचा थेट संबंध चालू असलेल्या खटल्यातील वादाच्या मूळ मुद्द्यांशी असणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ ती माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध आहे, याच एकमेव कारणावरून ती



न्यायालयात पुरावा म्हणून स्वीकारली जाऊ शकत नाही, असे न्यायमूर्ती नमवरपू राजेश्वर राव यांच्या खंडपीठाने पतीकडून दाखल करण्यात आलेल्या दोन दिवाणी पुनरीक्षण याचिका फेटाळताना स्पष्ट केले. क्रूरतेच्या कारणावरून पतीने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. कौटुंबिक न्यायालयाने पतीने सादर केलेले कॉल रेकॉर्डिंग नाकारताना या इलेक्ट्रॉनिक पुराव्यासोबत आवश्यक असणारे अनिवार्य प्रमाणपत्र जोडलेले नव्हते. तसेच, ज्या मूळ मोबाईलमध्ये हे रेकॉर्डिंग केले गेले, तो उपलब्ध आहे की नाही किंवा सक्षम प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र मिळवण्याचा प्रयत्न झाला होता की नाही, याबाबत कोणतीही स्पष्टता नव्हती. या कॉल रेकॉर्डिंगची सत्यता ‘ट्रुथ लॅब्स’द्वारे तपासली गेली असून ते सीलबंद कव्हरमध्ये न्यायालयात सादर केले होते, असे असा युक्तिवाद पतीने केला होता. इतर कागदपत्रे थेट बँक आणि क्रेडिट कार्ड कंपन्यांच्या वेबसाईटवरून डाऊनलोड केल्याचे पतीने म्हटले होते.

(वृत्तसंस्था)

### प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक गोपनीयतेचा मूलभूत अधिकार

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अन्वये प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक गोपनीयतेचा मूलभूत अधिकार मिळालेला असून, जोडीदाराच्या नकळत केलेले रेकॉर्डिंग या अधिकारावर गदा आणणारे आहे, असे न्यायालयाने नमूद केले. पक्षकारांमधील संभाषणांच्या रेकॉर्डिंगबाबत, कनिष्ठ न्यायालयाने योग्यरित्या असा निष्कर्ष काढला की, दुसऱ्या पक्षाच्या संमतीशिवाय कॉल रेकॉर्ड करणे हा गोपनीयतेचा आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ अन्वये हमी दिलेल्या गोपनीयतेच्या अधिकाराचा भंग आहे, असे निरीक्षण न्यायमूर्ती नमावरपू राजेश्वर राव यांनी नोंदवले.

## चित्रपट वार्ता

### दिशा पाटणी निघाली हॉलिवूडला



**मुंबई :** अभिनेत्री दिशा पाटणी बॉलिवूडमध्ये बोटावर मोजण्याइतक्या चित्रपटात झळकली आहे. मात्र, तरीही आता तिचे नशीब फळफळले आहे. तिला आता हॉलिवूड चत्रिपट मिळाला आहे. ऑस्कर विजेतेने केविन स्पेसी यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेल्या ‘हॉलीगार्ड सागा : द पोर्टल ऑफ फोर्स’ या सुपरनॅचरल थ्रिलर चित्रपटातून ती हॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. नुकतीच ती अक्षय कुमारसोबत ‘वेलकम टू द जंगल’मध्ये झळकली होती. याशिवाय ती ‘आवारापन- २’ या चित्रपटातही झळकणार आहे. यात तिच्यासोबत इम्रान हाश्मी असेल.

### मेधा मांजरेकरांचे कर्करोगाशी दोन हात

**मुंबई :** अभिनेता, दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या पत्नी आणि



सुप्रसिद्ध अभिनेत्री मेधा मांजरेकर यांची एक भावूक पोस्ट समाज माध्यमांवर आली आहे. या पोस्टद्वारे मेधा मांजरेकर यांनी गंभीर आजाराविषयी खुलासा केल्याने त्यांचया चाहत्यांनाही जबर हादरा बसला. मेधा मांजरेकर यांनी लिहिले आहे की, मी अतिशय कठीण काळातून निघाले. पण, या प्रवासात मी एकटी नव्हते. काही अदृश्य हात मला दररोज सावरत होते. आता तो कठीण काळ संपत आला आहे. मेधा मांजरेकर यांनी पोस्टमध्ये किमोथेरपी, रेडिएशन याचा उल्लेख केल्याने त्यांना कर्करोगाशी लढा द्यावा लागत असल्याचा कयास नेटकऱ्यांनी लावला आणि मेधा यांच्या प्रकृतीविषयी तीव्र चिंताही व्यक्त केली.

### भर स्टेजवर साखरपुड्याची घोषणा



**मुंबई :** ‘धुरंधर २’ चित्रपटाची गायिका जॅस्मिन सॅंडलस हिने दिल्लीतील सुरू असलेल्या कॉन्सर्ट दरम्यान साखरपुड्याची घोषणा केली. होणाऱ्या नवऱ्याला ती स्टेजवर घेऊन आली. आणि आनंदाच्या भरात त्याच्या मिठीत सामावली. याप्रसंगी उपस्थित चाहत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला आणि या प्रसंगाचा आनंद घेतला. गायिकेनं भर कॉन्सर्टमध्ये केली साखरपुड्याची घोषणा; स्टेजवर होणाऱ्या नवऱ्याला घेऊन आली अन्.. आनंदाच्या भरात ती त्याच्या मिठीत धावत गेली. हा क्षण पाहून उपस्थित चाहत्यांनी टाळ्यांच्या आणि जल्लोषाच्या गजरात त्यांचे स्वागत केले. जॅस्मिन सँडलसने कॉन्सर्टदरम्यान चाहत्यांना सरप्राईज देताना होणाऱ्या शेखर चौधरी याची सर्वांसमोर ओळख करून दिली आणि आपण साखरपुडा केल्याची घोषणा केली.

# हिजबुलच्या कमांडरविरोधात ‘रेड कॉर्नर’ नोटीस जारी

**श्रीनगर, १२ जुलै**

जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या राज्य तपास यंत्रणेने (एसआयए) २०१३ च्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रकरणात मोठे यश मिळवले आहे. या यंत्रणेने बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना हिजबुल मुजाहिदीनचा घोषित दहशतवादी इम्तियाज अहमद कांडू उर्फ फयाजच्याविरोधात इंटरपोलची रेड कॉर्नर नोटीस जारी केली आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, हे प्रकरण उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील तरजू भागात २०१३ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याशी संबंधित आहे. ज्यात जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या चार जवानांचा मृत्यू झाला होता. एसआयएच्या म्हणण्यानुसार, रेड कॉर्नर नोटीस जारी केल्यामुळे आंतरराष्ट्रीय यंत्रणांना आरोपीला शोधणे, ताब्यात घेणे आणि भारतात प्रत्यार्पित करण्याच्या कायदेशीर प्रक्रियेत मदत होईल.

सोपोरमधील क्राल्टुंगचा



रहिवासी असलेला इम्तियाज कांडू हा २०१० पासून बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना हिजबुल मुजाहिदीनचा सक्रिय सदस्य आणि कमांडर होता. भारत सरकारने ऑक्टोबर २०२२ मध्ये त्याला दहशतवादी म्हणून घोषित केले. सुरुवातीला तरजू पोलिस ठाण्यात नोंदवलेला हा खटला २०२४ मध्ये विशेष तपास पथकाकडे (एसआयए) हस्तांतरित करण्यात आला. त्यानंतर साक्षीदारांची तपासणी आणि कटाचा उलगडा करून या संस्थेने जुलैमध्ये न्यायालयात सहा आरोपींविरुद्ध सविस्तर आरोपपत्र दाखल केले होते. २०१९ नंतर खोऱ्यातील अनेक दहशतवादी परदेशात परागंदा झाले.

(वृत्तसंस्था)

### फरार इम्तियाज कांडू १० प्रकरणांमध्ये वॉंटेड

या सहा आरोपींपैकी तारिक अहमद मीर आणि कयूम नझर हे दोघे सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत ठार झाले. जावेद अहमद मट्टू, रऊफ नझर आणि अहमदउल्ला मल्लाला अटक करण्यात आली. तर मुख्य आरोपी इम्तियाज कांडू अजूनही फरार आहे. तो पाकिस्तानात पळून गेल्याची शक्यता आहे. एसआयएच्या मते, तपासात केवळ या दहशतवादी हल्ल्यातच नव्हे, तर दहशतवादी नेटवर्कच्या व्यापक कारवायांमध्येही त्याची भूमिका उघड झाली आहे. इम्तियाज कांडू सुमारे १० प्रकरणांमध्ये हवा आहे. यात दहशतवादी हल्ले, १५ हून अधिक लोकांचा बळी, शस्त्रे आणि दारूगोळ्याची तस्करी, तसेच अमली पदार्थ–दहशतवादासाठी निधी पुरवण्यासारख्या गंभीर कारवायांचा समावेश आहे.

## ममतांना धक्का; अनुब्रता मंडल बंडखोर गटात

**कोलकाता, १२ जुलै**

तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर ऋतब्रता बॅनर्जी गटाने आपल्या जिल्हा समित्या आणि अध्यक्षांची यादी जाहीर केली आहे. या घोषणेतील सर्वात आश्चर्यकारक



नाव अनुब्रता मंडल यांचे आहे. बीरभूमचे ज्येष्ठ नेते अनुब्रता मंडल यांनी ममता बॅनर्जींची साथ सोडून बंडखोर प्रवेश केला आहे. या गटाने त्यांच्यावर बीरभूमच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. हा ममतांसाठी एक मोठा धक्का मानला जात आहे.

बंडखोर ऋतब्रता बॅनर्जी यांच्या गटाने केवळ जिल्हाध्यक्षांचीच घोषणा केली नाही, तर माजी राज्यसभा खासदार शांतनु सेन यांचाही आपल्या राज्य समितीत समावेश केला आहे. पाणिहाटीचे माजी आमदार निर्मल घोष हे देखील पक्षाच्या बैठकीत उपस्थित होते.

(वृत्तसंस्था)

# १४ देशांनी फेटाळला चीनचा दावा

### दक्षिण चिनी समुद्रावर २०१६ च्या निर्णयाला पाठिंबा

**मनिला, १२ जुलै**

लवादाने २०१६ मधील दिलेल्या निर्णयानुसार चीनने दक्षिण चिनी समुद्रावर केलेला दावा बेकायदेशीर आहे, असे अमेरिका, ब्रिटन आणि इतर १२ पाश्चात्य तसेच आशियाई देशांनी रविवारी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. या १४ देशांनी एका संयुक्त निवेदनाद्वारे, वादग्रस्त जलक्षेत्रातील प्रादेशिक स्थैर्याला धोका निर्माण करणाऱ्या आणि परिस्थिती अस्थिर करणाऱ्या कृती फेटाळून लावल्या.

२७ सदस्य असलेल्या युरोपियन युनियनने एका स्वतंत्र निवेदन जारी करून, हा निकाल वाद मिटवण्याच्या शांततापूर्ण प्रक्रियेतील ऐतिहासिक निर्णय असल्याचे म्हटले. मात्र, हा निकाल अवैध आणि शून्यवत असून, तो बंधनकारक नाही आणि चीन तो स्वीकारत नाही किंवा त्याला मान्यताही देत नाही, असे चीनने स्पष्ट केले आहे.

ही निवेदने संयुक्त राष्ट्रांच्या कायदाविषयक करारांतर्गत हेग येथे स्थापन करण्यात आलेल्या लवाद मंडळाने १२ जुलै २०१६ रोजी दिलेल्या निर्णयाच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात आलीत. संबंधित देशांनी हा निर्णय अंतिम आणि कायदेशीररीत्या बंधनकारक असल्याचे म्हटले. या लवाद प्रक्रियेत सहभागी होण्यास चीनने नकार दिला होता. फिलिपिन्सने २०१३ मध्ये ही प्रक्रिया सुरू केली होती. तत्पूर्वी, वादग्रस्त जलक्षेत्रात निर्माण झालेला पेचप्रसंग चीनने एका वादग्रस्त उथळ भागावर प्रत्यक्ष ताबा मिळवल्याने संपुष्टात आला होता.

चीनने २०१६ मधील हा निर्णय फेटाळला होता. दक्षिण चीन समुद्राच्या जवळपास संपूर्ण भागावर आपला दावा सांगणे आणि त्याचे समर्थन करणे सुरूच ठेवले आहे.

(वृत्तसंस्था)

## लॉरेन्सचे तीन शूटर्स जेरबंद

**नवी दिल्ली, १२ जुलै**

दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित तीन शूटर्सला रविवारी अटक केली आहे. हे शूटर्स एका मोठ्या गुन्ह्याची योजना आखत होते. राजधानीतील अनेक गुन्हेगारी घटनांमध्ये त्यांचा समावेश होता. गोपनीय माहितीच्या आधारे रोहिणी परिसरातील एका घरावर छापा टाकून लॉरेन्सच्या साथीदारांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून चार पिस्तूल आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. तिन्ही आरोपी परदेशातील एका टोळीच्या संपर्कात होते आणि दिल्लीत गोळीबार करण्याची योजना आखली होती. आरोपींचा दिल्ली, हरयाणातील गोळीबाराच्या घटनांमध्ये समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

# न्यायपालिकेच्या प्रतिष्ठेशी तडजोड अस्वीकार्ह

### सर्वोच्च न्यायालयातील असभ्य वर्तनावर बार असोसिएशन संतप्त

**नवी दिल्ली, १२ जुलै**

सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी एका पक्षकाराने केलेल्या असभ्य वर्तनाची चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित झाली. हा प्रकार न्यायपालिकेच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारा असून केंद्र सरकारने हस्तक्षेप करून न्यायालयातील रेकॉर्डिंग आणि समाज माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या चित्रफीतसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने (एससीबीए) केली आहे.

न्यायपालिकेच्या प्रतिष्ठेचा अपमान करणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या चित्रफीत समाज माध्यमावरून काढून टाकाव्या अशी



मागणी एससीबीएने निवेदनातून केली. न्यायालयीन कामकाजादरम्यान घडलेल्या घटनेवर बार असोसिएशनने तीव्र संताप व्यक्त केला. अशा घटना न्यायपालिकेच्या प्रतिष्ठेला आणि न्यायव्यवस्थेच्या पावित्र्याला गंभीर आव्हान देणाऱ्या आहे. सुनावणीदरम्यान एका पक्षकाराचे वर्तन पूर्णपणे अस्वीकार्य होते. न्यायालयीन कामकाजादरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरवापर, धमकावणे किंवा व्यत्यय आणणे हे न्यायिक प्रक्रियेवर परिणाम करते आणि कायद्याच्या राज्यावर थेट हल्ला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

(वृत्तसंस्था)

### असभ्य वर्तनासाठी कारवाई करावी

आपल्या अधिकृत निवेदनात, एससीबीएने म्हटले आहे की, न्या. के. व्ही. विश्वनाथन आणि न्या. आलोक आराधे यांच्या न्यायासनासमोर सुनावणीदरम्यान एका पक्षकाराचे वर्तन पूर्णपणे अस्वीकार्य होते. सर्व परिस्थितीत न्यायालयाची प्रतिष्ठा आणि आदर राखला पाहिजे. न्यायालयातील शिस्त आणि सभ्यता हे लोकशाही न्यायव्यवस्थेचा पाया आहेत आणि अशा वर्तनावर कायद्यानुसार कठोर कारवाई केली पाहिजे.

### काय आहे मागणी ?

एससीबीएने न्यायालयीन कामकाजाच्या चित्रफीत, रेकॉर्डिंग समाज माध्यमावर प्रसारित करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी केली. कामकाजाची चित्रफीत चुकीच्या पद्धतीने प्रसारित करून न्यायव्यवस्थेच्या प्रतिमेला धक्का पोहोचवला जात आहे. न्यायालयाच्या कामकाजाचे संदर्भाशिवाय प्रसारण केल्यास जनतेमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळू शकतो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# भट्टीच्या भगतांना ठेचा !

वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करीत भारतातील काही भरकटलेल्या (?), गरीब आणि शिक्षित पण अडाणी युवकांना जाळ्यात ओढून त्यांच्यामार्फत घातपाती कारवाया करता येतील काय, याची चाचपणी पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भाटी ऊर्फ भट्टी याने केल्याचा प्राथमिक पुरावा सापडला आहे. १० जुलैला अर्थात शुक्रवारी दहशतवादविरोधी पथकाने महाराष्ट्रात एकाचवेळी राज्यात १०२ ठिकाणी छापेमारी केली. केंद्रीय गुप्तचर संस्था आणि राज्यातील गुप्तचर संस्थांना मिळालेल्या माहितीच्या आधारे एटीएसने नेहमीच अतिसंवेदनशील आणि देशविघातक कारवायांमध्ये सक्रिय असलेल्या शहरांमध्ये धाडी टाकल्या. त्यांनी अशा अनेक कारवाया रोखल्या. गुरुवारी (ता. ९) रात्रीपासूनच दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत झाडाझडती घेतली. यामध्ये मुंबई, ठाणे, कुर्ला, बांद्रा, मीरा रोड, भाईंदर, सांगली, सातारा, छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, गडचिरोली व वर्धा या शहरांचा समावेश होता. छाप्यांमध्ये एकूण १११ पेक्षा जास्त 'भट्टीप्रेमीं'ना चौकशीसाठी ताब्यात घेतले. धर्मासाठी आंधळे होऊन काहीही करण्यासाठी तयार असलेल्या या युवकांच्या सोशल मीडिया हालचालींवर लक्ष ठेवून आणि अनोळखी प्लॅटफार्मचा वापर करीत त्यांच्याशी संवाद साधण्याचे काम शहजाद भट्टीची संघटना करीत असते. आर्थिक लाभ आणि धर्मविषयक संदेश देऊन युवकांचे स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्याचे काम यामार्फत केले जाते. १९९० नंतर पाकिस्तानने स्थानिक पातळीवर युवकांचे जबरदस्त जाळे निर्माण करीत जम्मू-काश्मीरला अशांत करण्याचे काम केले. हेच युवक नंतर स्लीपर सेलची भूमिका पार पाडत असतात. पहलगाम हल्ल्यासाठी आलेल्या दहशतवाद्यांना आश्रय देण्याचे काम अशाच स्लीपर सेलमधील सदस्यांनी केल्याचे उघड झाले आहे. आपल्याला साहाय्यभूत ठरेल, अशा राज्यांमध्ये कारवाया वाढविण्याचे काम शहजाद भट्टी करीत आहे. झारखंड आणि पंजाब ही याची ताजी उदाहरणे. कमी क्षमतेची शस्त्रे आणि स्फोटकांचा वापर करीत समाजात दहशत माजविणे आणि परिस्थितीचा अदमास घेण्याचे काम भट्टी करीत असतो. मे आणि जून महिन्यात पंजाबमध्ये पोलिसांवर गोळीबार केल्याच्या घटनांमागे शहजादची संघटना असल्याचे स्पष्ट झाले. गेल्या महिन्यात १७ जूनला झारखंडमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात झालेला बॉम्बस्फोटही भट्टीनेच घडवून आणल्याचा दाट संशय आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील छापेमारीच्या दोन दिवस अगोदर भट्टी तसेच पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित दोन मोड्यूल्सचा भंडाफोड केला. दिल्लीसह देशभरातील गर्दीच्या ठिकाणी पेट्रोल बॉम्बचा वापर करीत स्फोट घडविण्याची कुटिल योजना या सहा जणांनी आखल्याचे चौकशीत उघड झाले. हाच धागा पकडून दोन दिवसांनंतर राज्यात एटीएसला मोठी कारवाई करावी लागली. अशा लोकांचा देशद्रोह म्हणा की गद्दारी, भारताला त्रास होतच आला आहे. शेकडो वर्षांपासून हे चालत आलेले आहे आणि याचे पुरावे इतिहासातही आहेत. ज्या ताटात खाल्ले, त्याच ताटाला लाथ मारणारी ही प्रवृत्ती. ती आणखी बळावत चालली आहे, हा खरा चिंतेचा विषय. शिक्षणाने माणूस सुज्ञ होतो, भल्याबुऱ्याची त्याला जाणीव होते, असे जे म्हटले जाते, त्याला धर्मांध दहशतवादी अपवाद आहेत. डॉक्टर, इंजिनीयर झालेले युवकही दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी झाल्याची उदाहरणे डोळ्यासमोर आहेत. खरे तर हे अस्तनीत लपलेले विषारी साप आहेत. अज्ञानी, गरीब आणि भरकटलेले युवक म्हणत त्यांच्या देश आणि समाजविघातक कृत्यांवर पांघरूण घालण्याचे जे पाप काँग्रेसने दीर्घ काळ केले, त्याचे परिणाम आपण आता भोगत आहोत. शहजाद भट्टी हा पाकिस्तानी असून सध्या तो दुबईत व्यावसायिक म्हणून वावरत आहे. त्याचे ३३३ नावाने सोशल मीडियावर अकाऊंट असून त्याने आशियात फार मोठे डिजिटल नेटवर्क उभे केले आहे. तो अट्टल गुन्हेगार असून त्याच्यावर लाहोर आणि परिसरात चोरी, दरोडा, खून, लुटमारीचे शेकडो गुन्हे आहेत. माणूस म्हणूनही तो नीच असून त्याच्यावर २०१५ मध्ये बलात्काराचा गुन्हाही दाखल झालेला आहे. पोलिसांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी शहजादने दुबई गाठत प्रथम तेथे भंगाराचा व्यवसाय सुरू केला. नंतर हळूहळू त्याने दूध आणि कृषी उत्पादने विकण्याचे कामही सुरू केले. आज तो कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीचा मालक असून त्याला आता आयएसआयचे संरक्षण मिळाले आहे. २०१३ मध्ये जो शहजाद पाकिस्तानी पोलिसांसाठी मोस्ट वॉंटेड होता, तो आता पाकिस्तानच्या गळ्यातील ताईत झाला आहे. बलात्काराचा कलंक असलेल्या या शहजादने सोशल मीडियावरील आपल्या अकाऊंटचे नाव ३३३ असे मुद्दाम ठेवले आहे. अंकशास्त्रात ३ हा आकडा मन, शरीर आणि आत्मा यांना जोडणारा आणि सृजनाचे प्रतीक मानले जाते. तसेच मी तुमचा मार्गदर्शक असून देवदूत आहे, हे दर्शविण्यासाठीही ३३३ या आकड्याचा वापर केला जातो असे म्हणतात. याचाच अर्थ शहजाद भट्टी विशिष्ट धर्माच्या युवकांना आकर्षित करून त्यांच्यामार्फत भारतात अराजक निर्माण करण्याचा कट आखत होता किंवा आखतोय. जून महिन्यात दिल्ली पोलिसांनी आयएसआय संबंधित ज्या नऊ दहशतवाद्यांना अटक केली होती, त्यांनी टीटीएच या नव्या दहशतवादी गटाचा उल्लेख पोलिसांच्या चौकशीत केला होता. टीटीएचचा अर्थ होतो तो तेहरिक-ए-तालिबान हिंदुस्थान. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या धर्तीवर भारतातही असे नेटवर्क उभारण्याच्या मागे शहजादचाच मेंदू असल्याची शक्यता सुरक्षा संस्थांनी व्यक्त केली आहे. हे नेटवर्क तयार करण्यासाठी भट्टीने प्रथम पंजाब, दिल्ली, हरयाणा, राजस्थान आणि उत्तरप्रदेशकडे लक्ष केंद्रित केले आहे. झारखंड, महाराष्ट्र आणि बिहारातही त्याचे चाहते निर्माण झालेत. हे काम करण्यासाठी युवकांना भरपूर पैसे देण्याचे आणि विदेशात स्थायिक करून देण्याचे आमिषही दिल्याचे उघड झाले आहे. पण त्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत.

कारण आता देश बदलला आहे. तो घरात घुसून मारतो हे भट्टीच्या पाठीराख्यांनी पाहिले आहे. असे शहजाद भट्टीसारखे किती आले आणि मातीत मिसळलेः पण या देशाचे कुणीही वाकडे करू शकले नाही. कधीकाळी या देशात अल-कायदापासून तर अलिकडच्या पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या 'द रजिस्टन्स फ्रंट'सारख्या जवळपास १८ इस्लामिक नावे असलेल्या दहशतवादी संघटना कार्यरत होत्या. आज त्यांचे नामोनिशाण जवळजवळ मिटले आहे. याच दहशतवादी संघटनांच्या उच्छादामुळे जम्मू-काश्मीरसह संपूर्ण भारत तीन दशके हिंसाचाराच्या घटनांनी रक्तबंबाळ झाला होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या कठोर उपोययोजनांमुळे दहशतवादी संघटनांचे म्होरके यमसदनी गेले आहेत. कधीकाळी पाकिस्तानचा 'पोस्टर बॉय' बुऱ्हान वानीने अख्खे काश्मीर खोरे अनेक वर्षे वेठीस धरले होते. २०१६ मध्ये जुलै महिन्यात अनंतनाग जिल्ह्यातील कोकेरनाग येथे लष्कराने त्याचा फणा ठेचला आणि येथूनच सुरू झाली ती जम्मू-काश्मीर दहशतवादमुक्त करण्याची मोहीम. जे काश्मीर खोरे पाकिस्तानी, अफगाणी आणि अरब देशांतील दहशतवाद्यांनी बरबटले होते, ते आता मुक्तपणे श्वास घेत आहे. पैसे घेऊन दगडफेक करणारी पिलावळ आता बिळात लपून बसली आहेत. भट्टी आपला नाही; त्याच्या डावपेचांना साथ देणारे आपल्या देशात राहतात हे या घटनांत दिसले. भट्टीचा बंदोबस्त होईलच. भारतात राहून भट्टीसारख्या लोकांना साथ देणाऱ्यांना विनाविलंब ठेचले पाहिजे. भट्टीसारख्यांचे भगत शोधून संपवले पाहिजेत.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# बांगलादेशचे 'रेड कार्ड' !

अमेरिका- तेथे स्थायिक होणाऱ्या विदेशी नागरिकांना 'ग्रीन कार्ड' जारी करते, युरोपियन युनियन तेथे काम करणाऱ्या विदेशी नागरिकांना 'ब्लू कार्ड' जारी करते आणि चीन? आपल्या देशाचे मांडलिक होणाऱ्या देशांना 'रेड कार्ड' जारी करतो. बांगलादेशने नुकतेच 'चीनचे नागरिकत्व' म्हणजे रेड कार्ड घेतले आहे.

**भारताचे अपत्य :** बांगलादेश म्हणजे भारताचे अपत्य. भारताने अतिशय दूरदर्शीपणा दाखवित ५५ वर्षांपूर्वी पाकिस्तानचे दोन तुकडे केले आणि पूर्व पाकिस्तानला बांगलादेश म्हणून मान्यता दिली. १९७१ च्या त्या घटनेपासून भारत-बांगलादेश संबंध 'अतूट' होते. आता हे संबंध पूर्णपणे संपुष्टात आले असून, बांगलादेशने चीनचे 'पितृत्व' मान्य केले आहे.

**पहिला दौरा चीनचा :** बांगलादेशचे युवा पंतप्रधान तारीक रहेमान यांचा पहिला परदेश दौरा चीनचा झाला आणि त्यांनी चीनसोबत अनेक करारांवर सह्या केल्या, त्या भारतासाठी अतिशय संकटाच्या ठरणार आहेत.

**चीनचा हात :** बांगलादेशात दीड-दोन वर्षांपूर्वी शेख हसीना यांच्या सरकारविरोधात जो उठाव झाला, त्यामागे पाकिस्तान व चीन आहेत, असे म्हटले जात होते. यात चीनची भूमिका मुख्य व मोठी होती असेही मानले जात होते. त्यावर नंतरच्या घटनाक्रमाने शिक्कामोर्तब होत आहे.

**'रॉ' गाफील :** पाकिस्तान व चीन बांगलादेशात सत्ताबदलाचे कारस्थान आखत असताना, भारताच्या 'रॉ' या गुप्तचर संस्थेला याचा जराही मागमूस लागू नये हे खरोखरीच दुर्दैवी होते. पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर बांगलादेशातून पलायन करण्याची वेळ आल्यानंतर, भारत सरकारला या गंभीर संकटाची कल्पना आली. पण, तोपर्यंत वेळ निघून गेली होती. शेख हसीना यांना भारतात आश्रय देण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला, जो अतिशय योग्य असाच होता. पण, बांगलादेशात सत्तापरिवर्तनाचा पहिला टप्पा पूर्ण झाला होता. चीनचे कारस्थान सफल झाले होते.

**मांडलिक पंतप्रधान :** बांगलादेशात प्रारंभी काही काळ मोहम्मद युनूस या अर्थशास्त्री असणाऱ्या नेत्यास काळजीवाहू सरकारचे प्रमुख करण्यात आले. तेव्हापासूनच त्यांची पावले चीनच्या दिशेने पडू लागली होती. तेथे निवडणुकीनंतर तारीक रहेमान सत्तेवर आल्यानंतर चीनच्या दिशेने पडणाऱ्या पावलांची गती वाढली व आता पहिल्या विदेश दौऱ्यासाठी चीनची निवड करून तारीक रहेमान यांनी चीनचे मांडलिकत्व स्वीकारण्याची प्रक्रिया एकप्रकारे पूर्ण केली.

**'पाकिस्तानी पॅटर्न' :** पाकिस्तानवर आपली पकड मजबूत करण्यासाठी चीनने तेथे चायना-पाकिस्तान एकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणजे 'सीपीईसी' या नावाचा एक प्रकल्प सुरू केला. त्यात चीनने ४५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. रेल्वे मार्ग, रस्ते, वीज केंद्रे, विमानतळ आणि पाकिस्तानचे ग्वादर बंदर विकसित करण्याचा हा प्रकल्प राबवून चीनने पाकिस्तानला आपल्या पिंजऱ्यात बंद केले आहे. याशिवाय चीनने आपले लष्करी तंत्रज्ञान पाकिस्तानला देणे सुरू केले आहे.

**आता बांगलादेशातही :** चीनने आता बांगलादेशातही असाच प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारच्या प्रस्तावावर दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू असून, त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असे कळते. चीनचे कनमिंग बंदर बांगलादेशच्या मोंगला बंदराशी जोडले जाणार आहे. म्हणजे पाकिस्तानच्या ग्वादर बंदराशी आपले शहर जोडून चीनने अरबी सागराचा मार्ग मोकळा केला तर आता बांगलादेशच्या माध्यमातून त्याने बंगालच्या उपसागरात जाण्याचा मार्ग तयार करण्याचे ठरविलेले दिसते.

**भारताच्या सीमेलगत :** भारत-बांगलादेश सीमेलगत लालमोईरहट नावाचा हवाईतळ आहे. १९४५ मध्ये संपलेल्या दुसऱ्या महायुद्धापासून तो बंद पडून आहे. त्याच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव चीनने दिला असून, तो बांगलादेशने स्वीकारला आहे. भारतावर दबाव कायम ठेवण्यासाठी चीनने हा निर्णय घेतला असल्याचे मानले जाते. बांगलादेशात सत्ता परिवर्तन झाल्यापासून लगेचच चीनने या हवाई तळाचे नूतनीकरण करण्यास प्राधान्य दिले यावरून चीनसाठी हा प्रकल्प किती महत्त्वाचा आहे याची कल्पना करता येईल.

**तिष्ठा नदी प्रकल्प :** बांगलादेशचे पंतप्रधान तारीक रहेमान यांच्या चीन दौऱ्यानंतर जारी करण्यात आलेले संयुक्त निवेदन तर भारतासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. तिष्ठा नदीचे व्यवस्थापन, नवनिर्माण या साऱ्यासाठी चीन बांगलादेशला संपूर्ण सहकार्य देईल असे त्यात नमूद करण्यात आले आहे. यात कोणत्याही 'तिसऱ्या देशाने' चिंतित होण्याचे कारण नाही. हा प्रकल्प तिसऱ्या देशाच्या प्रभावापासून पूर्णपणे मुक्त असेल असेही चीन-बांगलादेश यांच्या संयुक्त निवेदनात म्हटले आहे.

**'पॉवर चायना' :** तिष्ठा नदी प्रकल्प राबविण्यासाठी चीनने आपल्या 'पॉवर चायना' या कंपनीची निवड केली आहे. पॉवर चायना ही सरकारी कंपनी असून, आशियातील अनेक देशांमध्ये आपले हात-पाय पसरण्यासाठी चीनने या कंपनीचा वापर केला आहे. पॉवर चायना कंपनी चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी- पीएलएचाच एक भाग असल्याचे मानले जाते. यावरून चीनच्या डोक्यात काय काय सुरू आहे याचा अंदाज बांधता येईल.

**अतिशय चिंताजनक :** तिष्ठा नदी भारत-बांगलादेश सीमेजवळून प्रवाहित होते. चीनने या नदीवर डोळा ठेवीत अनेकदा हसीना सरकारकडे नदीच्या विकासाचा प्रस्ताव दिला होता. पण भारताने वेळीच सावध होत, तो प्रत्येक वेळी हाणून पाडला होता. आता तेथे चीनचे समर्थक सरकार आले असल्याने चीनने तिष्ठा नदी विकास प्रकल्पाला हाती घेण्याचे ठरविले आहे. जे भारतासाठी गंभीर चिंता निर्माण करणारे ठरणार आहे. ही नदी भारताच्या सीमेलगत तर आहेच, शिवाय अतिशय संवेदनशील मानल्या जाणाऱ्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'च्या अगदी जवळ आहे. भारत आणि पूर्वोत्तर भारत यांना जोडणाऱ्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'वर चीनची पूर्वीपासून नजर आहे. चीनच्या दबावाखाली हसीना सरकारने तिष्ठा नदी प्रकल्पाच्या तांत्रिक सर्वेक्षणाला मंजुरी दिली होती, पण भारताच्या जोरदार विरोधानंतर ती थंड्या बस्त्यात ठेवण्यात आली होती.

**आणि पाकिस्तानही :** बांगलादेश ज्या पाकिस्तानच्या अत्याचारास कंटाळून वेगळा झाला, विभक्त झाला, त्या पाकिस्तानसोबत त्याने पुन्हा 'प्रेमालाप' सुरू केला आहे. व्यापार-व्यवसाय वाढविण्याचे करार केले जात असताना, त्यात आता एका नव्या कराराची भर पडणार आहे. प्रथमच पाकिस्तान-बांगलादेश 'जॉईंट मिलिटरी कमांड'- संयुक्त लष्करी आघाडी स्थापन करण्याबाबत विचार करीत असून, याबाबत दोन्ही देशांत होत असलेली चर्चा अंतिम टप्प्यात दाखल झाली आहे.

**लढाऊ विमाने :** चीनच्या सहकार्याने पाकिस्तानमधील कराची एरोनॉटिक केंद्रात जेएफ-१७ थंडर या लढाऊ विमानांचे उत्पादन केले जात आहे. मागील वर्षी झालेल्या भारत-पाकिस्तान चकमकीत पाकिस्तानने याच विमानांचा वापर केला होता. पाकिस्तानने आता ही विमाने बांगलादेशला विकण्याचा प्रस्ताव मांडला आहे. पहिल्या टप्प्यात १६ ते ४८ विमाने बांगलादेशला विकली जातील. या विमानांचे प्रशिक्षण बांगलादेशी वैमानिकांना देण्याची प्रक्रिया यापूर्वीच सुरू झाली आहे.

**चीनचा विळखा :** चीन भारताला विळखा घालण्याचे धोरण राबविणार आहे, असे तज्ज्ञांनी यापूर्वीच म्हटले होते. आता ते प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. भारताचा कट्टर शत्रू पाकिस्तानसोबत चीनने यापूर्वीच घट्ट युती केली आहे. भूतान चीनला मांडलिक झालेला आहे. एक काळ होता भारतीय लष्कराची एक ब्रिगेड भूतानच्या रक्षणासाठी तेथे तैनात होती. आता भूतानही भारताच्या विरोधात गेला आहे. नेपाळला चीनने केव्हाच आपल्या विळख्यात घेतले आहे. श्रीलंकेवरही चीनचा प्रभाव वाढत आहे. मालदीवमध्ये तैनात भारतीय सैन्याच्या दोन तुकड्या हटविण्यात चीन होता. तेथे चीनने आपल्या तुकड्या तैनात केल्या आहेत. फक्त बांगलादेश काय तो चीनच्या प्रभावापासून मुक्त होता. आणि दक्षिण आशियात भारताचा एकमेव विश्वासू साथीदार होता, मित्र होता. दुर्दैवाने त्याने भारताचा हात सोडून चीनचा हात धरला आहे. चीनचे 'रेड कार्ड' गळ्यात घालून बांगलादेश आता जगभर मिरविणार असे दिसते.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# भारत बनणार महासत्ता

गेल्या १० ते १२ वर्षांच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात देशाचा दबदबा वाढला असून आज भारताच्या शब्दाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या काळात भारतीय अर्थव्यवस्था खूपच झपाट्याने वाढली आहे. भारताने ४ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्याही पुढे झेप घेतली आहे. १० व्या क्रमांकावरून भारताने तिसऱ्या क्रमांकापर्यंत मजल मारली आहे. गोल्डमन सॅक्सच्या अहवालानुसार आगामी ४० ते ५० वर्षांत भारत ५२ लाख कोटी अमेरिकन डॉलर्सचा टप्पा पार करून दुसऱ्या क्रमांकावर येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, भविष्यात भारताची स्पर्धा प्रामुख्याने चीनसोबत राहील, असा जाणकारांचा अंदाज आहे.

गेल्या काही वर्षांच्या काळात डिजिटल पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. रस्त्यांचे जाळे विणण्यात भारत आज दुसऱ्या क्रमांकावर असून काही अपवाद वगळता जवळपास संपूर्ण भारत डिजिटल झाला आहे. १४७ कोटी लोकसंख्येच्या या देशात झालेली डिजिटल क्रांती पाहून पाश्चात्त्य देशही चकित आहेत. देशभरात राष्ट्रीय महामार्ग आणि एक्सप्रेस वेचे जाळे झपाट्याने विस्तारले आहेत. वंदे भारत आणि अमृत भारतसारख्या हायस्पीड गाड्यांच्या माध्यमातून रेल्वेचा चेहरामोहरा बदलत आहे. गेल्या १० वर्षांत लहान-सहान रेल्वेस्थानकांचा मोठ्या प्रमाणावर कायापालट झाला असून मेट्रो आणि मोनोरेलसारख्या सुविधा नागरिकांना पुरविण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे.

रॉरी पोर्टर नावाचा ब्रिटिश व्लॉगर भारताच्या वंदे भारतमधील सुविधा आणि स्वच्छता पाहून खूपच भारावला. त्याने आपल्या इन्स्टा अकाऊंटवर एक चित्रफीत प्रसारित करून भारत इतका श्रीमंत कधी झाला? असा प्रश्न उपस्थित केला आहे. युनायटेड किंगडममध्ये राहणारे लोक नक्कीच श्रीमंत असतील. कारण, त्यांची लोकसंख्या भारताच्या तुलनेत खूपच कमी आहे. परंतु, बदलत्या भारताची आजची परिस्थिती पाहून हे लोकही आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहात नाही.

आपत्ती काळात भेदभाव न करता भारत मदतीसाठी सदैव तत्पर असतो. कोरोना काळात भारताने अनेक देशांना लसींचा पुरवठा करून मानवतेचे दर्शन घडविले. नेहमी पाकिस्तानची बाजू घेऊन भारताला पाण्यात पाहणाऱ्या तुर्कीलासुद्धा भारताने आपत्ती काळात मोठी मदत केली आहे. अमेरिका-इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्याने भारताचा खनिज तेल पुरवठा खंडित झाला. अशा काळात तब्बल ४० देशांनी भारताला तेल पुरविण्यासाठी पुढाकार घेतला. यातील बहुतांश देशांना यापूर्वी भारताने भरीव मदत केलेली आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, अवकाश संशोधन, शस्त्रास्त्र निर्मिती, अन्नधान्य निर्यात आणि डिजिटल पायाभूत सुविधा यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये भारताने क्रांती केली आहे. भारताची डिजिटल पेमेंट प्रणाली अनेक देश स्वीकारत आहे. भारत जगातील सर्वांत मोठा जेनेरिक औषध पुरवठादार आहे. व्हॅक्सिन हब म्हणून भारताने आपली ओळख निर्माण केली आहे. शेतमाल निर्यातीतही भारत पुढे आहे. अनेक महानगरांमध्ये रात्री प्रवास करताना पाश्चिमात्य देशांत असल्याचा अनुभव येतो. ही सर्व क्रांती केवळ आणि केवळ इच्छाशक्तीच्या बळावर घडून आलेली आहे.

सरकारने कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना आणल्या. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना यासह अन्य अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत आहेत. अल्पभूधारकांसाठी पेन्शनची तरतूद करून लाखो गरीब शेतकऱ्यांच्या वृद्धापकाळाची काळजी घेण्यात आली आहे. राज्य सरकारही शेतकऱ्यांना विपन्नावस्थेतून बाहेर काढण्यासाठी अनेक योजना राबवीत आहे. नुकतीच महाराष्ट्र सरकारने सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करून लाखो शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. या योजनेचा लाभ सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून जवळपास ३६ हजार ५८५ कोटी रुपये निधीची तरतूद केली जाणार आहे. कुठलेच क्षेत्र विकास प्रवाहापासून वंचित राहू नये म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. यात नागरिकांनीही आपले योगदान देणे गरजेचे आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# धैर्यवान महिला आणि असंवेदनशील प्रशासन

भारतीय रेल्वे ही देशाची जीवनवाहिनी आहे. दररोज लाखो महिला रेल्वेने प्रवास करतात. रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विविध योजना राबवत असल्याचा दावा करत असले, तरी प्रत्यक्षात अनेकदा वेगळे चित्र दिसते. वाराणसी ते नागपूर प्रवासादरम्यान नागपूरच्या एका कुटुंबासोबत घडलेली घटना ही केवळ छेडछाडीची घटना नसून रेल्वे प्रशासन, तिकीट तपासणी व्यवस्था आणि रेल्वे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

या घटनेत सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे ७२ प्रवाशांची क्षमता असलेल्या आरक्षित डब्यात तब्बल ४०० हून अधिक अनधिकृत प्रवासी घुसले. हा केवळ नियमभंग नव्हता, तर सुरक्षिततेचा संपूर्ण बोजवारा होता. आरक्षित डब्यात ज्यांनी तिकीट काढले आहे, त्यांनाच प्रवेश असणे अपेक्षित असताना शेकडो विनातिकीट प्रवासी आत कसे आले? हा प्रश्न प्रत्येक रेल्वे अधिकाऱ्याने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

इतक्या मोठ्या संख्येने अनधिकृत प्रवासी डब्यात शिरल्यानंतर महिलांना उभे राहण्यासाठीही जागा नव्हती. रात्री डब्यातील दिवे बंद झाल्यानंतर काही समाजकंटकांनी महिलांची छेडछाड आणि आपत्तिजनक व्यवहार करून मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. अशा परिस्थितीत महिलांनी रेल्वे हेल्पलाईनवर तक्रार केली; रेल्वेच्या ट्विटरवर सुद्धा तक्रार केली मात्र मदत मिळाली नाही. परिस्थिती इतकी गंभीर झाली की, महिलांनी नैनी रेल्वे स्थानकावर इंजिनसमोर उभे राहून आंदोलन केले. एवढे टोकाचे पाऊल एखादी महिला सहज घेत नाही. जेव्हा व्यवस्था अपयशी ठरते, तेव्हाच नागरिकांना अशा प्रकारचे आंदोलन करावे लागते.

यावेळी रेल्वे पोलिसांनी घेतलेली भूमिका अधिक धक्कादायक होती. ''या चारशे लोकांमध्ये नेमकी छेडछाड कोणी केली ते सांगा,'' असा प्रश्न त्यांनी महिलांना विचारला. ही भूमिका न्याय्य म्हणता येणार नाही. अंधार, प्रचंड गर्दी आणि भीतीच्या वातावरणात नेमका आरोपी ओळखणे शक्य नसते. अशा वेळी पोलिसांनी आरोपींची नावे विचारण्यापेक्षा आरक्षित डब्यातील सर्व अनधिकृत प्रवाशांना तात्काळ खाली उतरवणे, डब्यात सुरक्षा निर्माण करणे आणि महिलांना संरक्षण देणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी होती. येथे रेल्वे पोलिस आणि तिकीट तपासनीस या दोघांचीही जबाबदारी होती. याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे नागपूरला पोहोचल्यानंतर पीडित महिलांनी लोहमार्ग पोलिसांकडे तक्रार केली असता, ''तक्रार उत्तर प्रदेशात जाऊन करा,'' असे सांगण्यात आल्याचा आरोप पीडित महिलांनी केलेला आहे. ही भूमिका अत्यंत खेदजनक आहे. आज देशात 'झीरो एफआयआर' ही संकल्पना अस्तित्वात आहे. तिकीट बुकिंग प्रणालीमध्ये सुद्धा बरेच बदल करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळेस एखाद्या कुटुंबातील लोक प्रवास करतात त्या वेळेला त्यांनी तिकीट आरक्षित करताना 'कुटुंब' असा जर पर्याय निवडला तर त्यांना सोबत किंवा जवळच्या जागा मिळावयास हव्या. प्रत्येक समस्येवर समाधान शोधून काढणे आवश्यकच असते परंतु त्याचबरोबर समस्या उद्भवणारच नाही हेही बघणे आवश्यक असते. सर्वप्रथम, आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवाशांचा प्रवेश पूर्णपणे बंद झाला पाहिजे. विना तिकीट कोणालाही रेल्वे स्थानकामध्ये प्रवेश करण्याची अनुमती द्यायला नको. वृद्ध किंवा रुग्णांसाठी रेल्वे विभागाने आपले सेवक ठेवावे. प्रत्येक मोठ्या स्थानकावर आरक्षित डब्यांच्या प्रवेशद्वारावर टीटीई, आरपीएफ आणि रेल्वे कर्मचाऱ्यांची संयुक्त तपासणी असावी. आरक्षित तिकीट किंवा वैध ओळखपत्र नसलेल्या व्यक्तीला डब्यात प्रवेशच मिळू नये.

प्रत्येक स्थानकावर गाडी सुटण्यापूर्वी आरक्षित डब्यांची तपासणी करून अतिरिक्त प्रवाशांना बाहेर काढले पाहिजे. डब्यांमधील प्रवेशासाठी पासवर्ड किंवा क्यूआर कोड स्कॅन करणे असाही पर्याय देता येईल. रात्रीच्या वेळेस आरपीएफचे गस्ती पथक प्रत्येक आरक्षित डब्यात नियमित फिरले पाहिजे. ते खरंच फिरले की नाही यासाठी डब्याच्या सुरुवातीला व शेवटी त्यांचे फेस स्कॅनिंग असले पाहिजे. हेल्पलाईन १३९ वर तक्रार आल्यानंतर पुढील स्थानकावर त्वरित कारवाई करणे बंधनकारक केले पाहिजे. डब्यांमध्ये असे क्यूआर कोड लागलेले असणे आवश्यक आहे जो स्कॅन केल्यास तक्रारदार महिलेचा डब्याचा क्रमांक, आसन क्रमांक ही माहिती संबंधित यंत्रणेला समजेल व आवश्यकता असल्यास पुढील स्थानकावर संबंधित अधिकारी त्याच ठिकाणी जाऊन आरोपीला ताब्यात घेतील. सर्व आरक्षित डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पॅनिक बटण आणि बॉडी-वॉर्न कॅमेऱ्यांसह गस्ती कर्मचारी उपलब्ध असावेत. रेल्वे पोलिस आणि जीआरपी यांना महिलांशी संबंधित तक्रारी हाताळण्यासाठी विशेष संवेदनशीलता प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पीडित महिलेला आरोपी शोधण्याची जबाबदारी देणे चुकीचे आहे; आरोपी शोधणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ कायद्याचा नाही, तर प्रशासनाच्या इच्छाशक्तीचा आणि कार्यक्षमतेचाही आहे. प्रवाशांनी आरक्षित तिकीट काढूनही सुरक्षित प्रवास मिळत नसेल, तर ती व्यवस्थेची गंभीर अपयशाची कबुली आहे. नागपूरच्या महिलांनी दाखवलेले धैर्य समाजासाठी प्रेरणादायी आहे; परंतु अशी वेळ कोणत्याही महिलेवर येऊ नये, ही जबाबदारी रेल्वे प्रशासन, टीटीई, आरपीएफ, जीआरपी आणि संपूर्ण शासनव्यवस्थेची आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर नेहमीप्रमाणे नुकत्याच झालेल्या पावसामुळे रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारक मेटाकुटीला आले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची चाळण झाल्याने छोटे-मोठे अपघात नित्याचे बनले आहेत. आपणाकडे रस्त्यांची खराब देखभाल हे खड्डे पडण्याचे मुख्य कारण बनले आहे. महामार्गावर ज्या ठिकाणी पाऊस पडण्याचे प्रमाण जास्त आहे अशा भागात रस्त्यावर खड्डे, चिखल आणि डबके निर्माण होतात. परिणामी वाहनचालकांना जीव मुठीत धरून वाहने चालवावी लागतात. सध्या सातारा ते कागल दरम्यान रस्त्याच्या सहापदरीचे काम सुरू आहे. यादरम्यान रस्त्यावरील खड्ड्यांकडे महामार्ग प्रशासन आणि ठेकेदार मात्र रस्त्याच्या दुरवस्थेकडे केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी खड्डे बुजवण्याचे काम केल्याचे दिसते. मात्र खड्ड्यात भरलेली डांबराअभावाची खडी उघडी पडल्याने वाहनचालकांना येथून मार्गस्थ होताना मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे वाहने नादुरुस्त होणे, दुचाकी घसरण्याचे, किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढले आहे. शासनाने मागील दोन तीन वर्षात खड्ड्यांच्या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना आखत असल्याचे दिवा स्वप्न वाहनचालकांना दाखविले आहे. रस्त्याच्या देखभालीसाठी कोटीच्या कोटी उड्डाणे होत असल्याचे शासन दाखवत आहे. मात्र पायाभूत सुविधा सुधारताना कुठेच दिसत नाहीत.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे

### अशैक्षणिक कामे आणि बेरोजगारी

दि. ९ जुलैला मुंबईच्या आझाद मैदानात शिक्षकांनी राज्यव्यापी शाळा बंद, सामूहिक रजा आंदोलन केले. या शिक्षकांची अशैक्षणिक कामातून मुक्तता करण्याची प्रामुख्याने मागणी होती. ही मागणी फक्त शिक्षकांचीच नव्हे तर राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या पालकांची सुद्धा आहे. मतदारयादी पुनरीक्षण आणि जनगणना या कामात देशातील सरकारी आणि अनुदानित शाळांतील दहा लाखांपेक्षा जास्त कर्मचारी गुंतले आहेत. महाराष्ट्रातील जवळपास पन्नास हजार शिक्षक सुद्धा या कामात कार्यरत आहेत. या कामाचा थेट दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो आहे हे सर्वश्रुत आहे, सर्वांना कळते आहे, अगदी शासनाला आणि अधिकाऱ्यांना सुद्धा. पण त्यावर पर्यायी उपाय शोधण्यापेक्षा शिक्षकांना धमक्या आणि शिक्षेच्या नोटीस पाठवल्या जात आहेत. हे सर्व शासन आणि समाज डोळसपणे बघतो आहे. मान्य आहे की उपरोक्त राष्ट्रीय कार्ये महत्त्वाची आहेत, परंतु त्या बदल्यात विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणे कुठला न्याय आहे? दुसरी बाजू बघितली तर राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या नियत कालिक श्रमशक्ती सर्वेक्षण मे २०२६ च्या अहवालानुसार कोट्यवधी नागरिक सध्या रोजगाराच्या शोधात आहे. देशातील ग्रामीण (५.१ टक्के) आणि शहरी (६.४ टक्के) भागातील बेरोजगारीचा दर वाढलेला आहे. यात ८० टक्क्यांपेक्षा जास्त पदवीधर तरुणांचे प्रमाण आहे. अर्थातच जागतिक अनिश्चितता, सेवा क्षेत्रातील संथ भरती, विकसित तंत्रज्ञानाची गती, कौशल्य आणि शिक्षणातील तफावत वगैरे बेरोजगारीचे काही कारणे आहेत.

राष्ट्रीय कार्ये आणि बेरोजगारी या दोन्ही बाबींचा रास्त विचार करता पात्र बेरोजगार युवकांना प्रशिक्षित करून मतदारयाद्या किंवा जनगणना यासारखे राष्ट्रीय कामे, जबाबदारी निश्चित करून सोपवायला पाहिजे. सेवेत कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा या युवकांना कामाची आणि मोबदल्याची फार आवश्यकता आहे. शासन त्यांची अनेक कामे खाजगी क्षेत्रामार्फत करवून घेतातच. अग्निवीर, होमगार्ड्स, शिक्षण सेवक, तासिका तत्त्वावरील प्राध्यापक आणि अनेक क्षेत्रांत पात्र बेरोजगार युवक कार्यरत आहेत आणि ते समर्थपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. याद्वारे शासनास नम्र विनंती आहे की अशैक्षणिक कामे पात्र बेरोजगारांना देण्यात यावीत. त्याद्वारे शैक्षणिक नुकसानही टाळता येईल तसेच बेरोजगारांना सुद्धा नियमित भरती होईस्तोवर काही प्रमाणात दिलासा मिळेल.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

### भटक्या श्वानांचा प्रश्नही मार्गी लावावा



तरुण भारतने रस्तोरस्ती अस्ताव्यस्त पडलेल्या बांधकाम साहित्याच्या प्रश्न हाती घेऊन प्रशासनास नियम बदलण्यास व तुरंत कारवाई करण्याकरिता भाग पाडले, याचा आनंद वाटला. तसेच गल्लोगल्ली, चौकाचौकात धुडगूस घालणाऱ्या भटक्या श्वानांचा व तथाकथित पशुप्रेमींचा बंदोबस्त करण्यास प्रशासनाला भाग पाडावे ही समस्त नागपूरकरांची इच्छा आहे.

**रवी वाघमारे**/ ९९६००१८०३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# सेवाधर्म हा सर्वोच्च धर्म : काशी जगद्गुरु

## शेळगीत आमदार पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

सेवाधर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म असून, जनतेच्या कल्याणासाठी मिळालेल्या संधीचा सदुपयोग करणे हे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. समाजात एकोपा, संस्कार आणि समर्पणाची भावना जोपासत सर्व समाजघटकांना न्याय देणारे कार्य व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत काशी जगद्गुरु श्रीश्रीश्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांनी आमदार बसवराज पाटील यांना आशीर्वाद दिले.

शेळगीचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्टच्या वतीने विधानपरिषद निवडणुकीत विक्रमी मतांनी विजयी झाल्याबद्दल आमदार बसवराज पाटील यांचा नागरी सत्कार करण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष जगदीश पाटील, विश्वस्त हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शैलेश पाटील आणि ॲड. केदार-पाटील यांनी हा सोहळा आयोजित केला होता. काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते सत्कार झाला. कार्यक्रमास श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच नागणसूर मठाचे श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक विश्वस्त डॉ. शैलेश पाटील यांनी केले. यावेळी भाजपाच्या शहराध्यक्ष रोहिणी तळवळकर, आमदार बसवराज पाटील आणि हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते, नगरसेवक अनंत जाधवनगरसेविका श्रीदेवी फुलारे यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राजशेखर हिरेहब्बू, पी. व्ही. मोतीपवळे, शिरीष उटगे, विश्वजीत नंदीमठ, बाबासाहेब यलशेट्टी, माधवराव पाटील टाकळीकर, सुनील टाकळीकर, प्रदीप दिंडेगावे, केदारनाथ उंबरजे, दिलीप पाटील, तुकाराम बिराजदार, सिद्धय्या स्वामी, शांतय्या स्वामी, शिवयोगी शास्त्री होळीमठ, शिवानंद मेंडके, दिलीप कल्याणी, राजशेखर पाटील, चंद्रकांत रमणशेट्टी, नागनाथ बाळशेट्टी, सिद्धाराम धप्पाधुळे, सोमनाथ चौगुले, अशोक काशीद, बसवराज इटकळे, नागेश यलशेट्टी, विनीत पाटील, प्रशांत शिवगुंडे, शुभम पाटील, बबलू इनामदार, नितीन लंगडे, केदार-चौगुले उपस्थित होते.

# सोलापूरची श्रावणी सूर्यवंशी बेस्ट डायव्हर ऑफ इंडिया

## राष्ट्रीय स्पर्धेत दोन पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

७९व्या सिनियर नॅशनल एक्वेटिक चॅम्पियनशिप २०२६ मध्ये येथील श्रावणी प्रताप सूर्यवंशी हिने डायव्हिंग प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना एक सुवर्ण आणि एक रौप्य पदकासह बेस्ट डायव्हर ऑफ इंडिया हा सर्वोच्च बहुमान पटकावला आहे.

चेन्नई येथील एस.आर.एम. विद्यापीठाच्या डॉ. टी. पी. पारिवेंधर एक्वेटिक कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी श्रावणीने ३ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग प्रकारात तिने



१६६.२० गुण मिळवत महाराष्ट्रासाठी पहिले सुवर्ण पदक निश्चित केले. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या हायबोर्ड डायव्हिंग प्रकारात श्रावणीने १८६.५० गुणांची कमाई करत रौप्य पदक आपल्या नावावर केले. आजवरची उत्कृष्ट काम गिरी आणि या राष्ट्रीय स्पर्धेतील या दोन पदकांच्या जोरावर तिला स्पर्धेतील सर्वोत्तम महिला खेळाडू म्हणून बेस्ट डायव्हर ऑफ इंडिया ची प्रतिष्ठित ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

### महाराष्ट्राला सांघिक उपविजेतेपद

श्रावणीने मिळवलेल्या या दोन पदकांमुळे महाराष्ट्राला ''डायव्हिंग वूमन ओव्हरऑल रनर्स'' (सांघिक उपविजेतेपद) ही टीम ट्रॉफी मिळवण्यात यश आले. महाराष्ट्राला हे सांघिक यश मिळवून देण्यात श्रावणीचा वाटा अत्यंत मोलाचा ठरला. तिला आंतरराष्ट्रीय कोच श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# रखमाबाई हत्तुरे महाविद्यालयात ११ वी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अध्यक्ष प्र. मुख्याध्यापक तथा प्राचार्य रमेश दिंडोरे व प्रमुख अतिथी म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, शिक्षक बसवराज कोरे, भारत राऊत उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते सरस्वती मातेच्या व रखमाबाई हत्तुरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फुग्यांची आरास व रांगोळी काढण्यात आली.

यावेळी प्रा. लक्ष्मीकांत पनशेट्टी, प्रा. श्रीनिवास कोलप्याक, प्रा. प्रशांत हारके, प्रा. संतोष टकले, प्रा. शुभांगी सगरे, प्रा. सोमशेखर रामपुरे, प्रा. कल्पना देशमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन स्नेहल स्वामी हिने केले तर आभार ऐश्वर्या ख्याड यांनी मानले.

## वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघातर्फे सभासद नातवंडांचा गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १२ जुलै-**

येथील वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने सभासदांचे जे पाल्य (नातवंडे) मार्च/एप्रिल ०२६ मध्ये झालेल्या पहिली ते पदवी परीक्षेत यश संपादन केले आहेत त्यांचा संस्थेच्यावतीने भेटवस्तू देऊन गौरविण्यात येणार आहे. गौरव सोहळ्याची तारीख वेळ स्थळ नंतर कळविण्यात येईल. तरी सभासदांनी सचिन सोळसे (८७६६५७२००९) यांच्याशी साधावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष निलकंठप्पा कोनापूरे कार्याध्यक्ष राजेंद्र मायनाळ सचिव बाबासाहेब कुलकर्णी व महिला आघाडीच्या पुष्पा गुंगे यांनी केले आहे.

# कृष्णराज पताळे, युवराज गायकवाड व देवदत्त पटवर्धन अजिंक्य

### प्रताप क्रीडा मंडळाच्या रत्नाई चषक राज्य बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. १२ जुलै-**

येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या रत्नाई चषक राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत खुल्या १० वर्षांखालील गटात कृष्णराज पताळे, १५ वर्षांखाली गटात युवराज गायकवाड व खुल्या गटात देवदत्त पटवर्धन यांनी अजिंक्यपद पटकाविले.

श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जयंती निमित्त स्मृतीभवनच्या महर्षी हॉल येथे आयोजित केलेल्या स्पर्धेच्या उद्घाटन उपाध्यक्ष पोपट भोसले-पाटील, सचिव बिभीषण जाधव,सर्व संचालक, राष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू अनन्या बाळापुरे, सरिस्का बावळे, सई बावळे, सार्थक राऊत, श्रीराम राऊत, ओम राऊत, विनय रणसुंबे, आर्यन माने देशमुख, विनीत



रणसुंबे, आदिनाथ हवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यात पाचशे पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. स्पर्धा प्रमुख अभिजीत बावळे यांनी प्रस्ताविक केले. या स्पर्धेत ३० कॅश प्राईज, ६० ट्रॉफीज, ६० मेडल तसेच प्रत्येक गटात २० पेक्षा अधिक बक्षिसे देण्यात आली. प्रथम क्रमांकास रु.१००१ रु, द्वितीय ८०१ रु, तृतीय ७०१ रु, चौथा ६०१ रु, पाचवा ५०१ रु, सहा ते दहा क्रमांकास सन्मानचिन्ह व अकरा ते वीस क्रमांकास मेडल अशी बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेचे पंच म्हणून उदय वगरे, विजय पंगुडवाले, प्रज्वल गोरे, नितीन अग्रवाल, अमर शिंदे, अनिता बाळापुरे, कर्णाक्षी जाधव, राहुल बोराटे, शिवशंकर पांढरे, मिलिंद माने देशमुख, प्रियंका पाटील यांनी काम पाहिले. निकाल वाचन किरण सूर्यवंशी व राजकुमार पाटील यांनी केले.

**स्पर्धेतील गटनिहाय प्रथम पाच**

**१० वर्षे :** कृष्णराज पताळे, अजिंक्य कांबळे, जय राठी, हर्षवर्धन अरकल, शिवरत्न गोरे. माळशिरस तालुका : स्मित काटकर, प्रणव भोसले, अभय जगताप, विक्रम भोसले,आरुष माने.

**१५ वर्षे :** युवराज गायकवाड, विहान कोंगारी, राजवर्धन काळे, प्रणव मजगे, आयुष उपाडे, माळशिरस तालुका :

सार्थक राऊत, विनय रणसुंबे, अनन्या बाळापुरे, श्रीराम राऊत, सानवी वाघमोडे.

**खुला :** देवदत्त पटवर्धन, प्रसन्न जगदाळे, शौर्य साळुंखे, आदिराज म्हेत्रे, अभिराज पवार. माळशिरस तालुकाः

अनिरुद्ध गुरव, प्रतीक इंगळे, समाधान सूर्यवंशी, अनिल सोनवणे, ओम राऊत.

# क्रिकेटच्या मैदानावर रंगला रस्ता सुरक्षेचा सामना



## प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी 'सेफ रोड, सेफ व्हेईकल, सेफ ड्रायव्हर'चा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै -**

क्रिकेटच्या मैदानावरील सुरक्षा साधनांप्रमाणेच दैनंदिन जीवनात रस्त्यावर प्रवास करताना हेल्मेट वापरणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे. क्रिकेटमध्ये जशी स्वतःच्या रक्षणासाठी खबरदारी घेतली जाते, तशीच खबरदारी रस्त्यावरही घेतली पाहिजे, असे प्रतिपादन महामार्ग सुरक्षा पथक पाकणीचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे यांनी केले.

विहान क्रिकेट अकॅडमी यांच्या वतीने इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबीर समारोपप्रसंगी ते बोलत होते. खेळाडू व पालकांना मार्गदर्शन करताना त्यांनी ''सेफ रोड, सेफ व्हेईकल, सेफ ड्रायव्हर'चा (सुरक्षित रस्ता, सुरक्षित वाहन, सुरक्षित चालक) हा महत्त्वपूर्ण संदेश दिला. ते म्हणाले, ''वेळेचे महत्त्व ओळखा आणि शिस्त पाळा. आपल्याला जे एवढे सुंदर मैदान मिळाले आहे, त्यावर मनापासून मेहनत करा; त्याचे फळ तुम्हाला एक दिवस नक्कीच मिळेल,'' असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी पालकांनाही आपल्या मुलांना पूर्ण पाठिंबा देण्याचे आवाहन केले आणि खेळाडूंच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विशेषतः टिळक सरांचे उदाहरण देताना ते म्हणाले की, वयाच्या ८१व्या वर्षीही सर रोज एखाद्या तरुणाच्या उत्साहाने मैदानावर हजर असतात, हा आदर्श सर्वांनी समोर ठेवावा. या कार्यक्रमाला ज्येष्ठ क्रिकेट प्रशिक्षक अशोक टिळक, माजी रणजीपटू प्रवीण देशेट्टी, योगेश कोंपल, प्रशांत बाबर आदी उपस्थित होते.

### रस्ता सुरक्षेचे नियम पाळण्याची शपथ

कार्यक्रमादरम्यान, तरुण खेळाडूंना आणि पालकांना संबोधित करताना स.पो.नि. जीवन निरगुडे यांनी स्पष्ट केले की, रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता, प्रत्येक नागरिकाने स्वतःहून वाहतूक नियमांचे पालन करणे कर्तव्य मानले पाहिजे. दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर हा फॅशन किंवा दंडापासून वाचण्यासाठी नसून स्वतःच्या जीवाच्या सुरक्षेसाठी आहे, हे त्यांनी क्रिकेटमधील सुरक्षा साधनांचे (उदा. हेल्मेट, पॅड्स) उदाहरण देत अतिशय सोप्या शब्दांत पटवून दिले. शेवटी उपस्थितांनी रस्ता सुरक्षेचे नियम पाळण्याची शपथ घेतली.

# शिक्षकांच्या चार दिवसीय राज्य प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण व अभ्यासक्रम २०२६ अंतर्गत; जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका आणि खाजगी शाळांमध्ये इयत्ता तिसरी व चौथीला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे चार दिवसीय प्रशिक्षणा राज्यातून २०० शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या सभागृहामध्ये हे प्रशिक्षण पार पडले. जेथे शिक्षकांनी विविध प्रात्यक्षिक उपक्रम (कृती) आणि चर्चांमध्ये उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदवला. प्रशिक्षणादरम्यान डायटची विशेष टीम सातत्याने उपस्थित होती. याप्रसंगी उपसंचालक इब्राहिम नदाफ, डायटचे विभागप्रमुख गजेंद्र जमादार, शिक्षण विस्तार



अधिकारी अतहरपरवेझ दफेदार, स्कूल बोर्डाच्या सुपरवायझर नीलोफर सय्यद आणि मुख्य अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व सोशल उर्दू प्रायमरी स्कूलचे मुख्याध्यापक डॉ. आसिफ इकबाल उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी प्रशिक्षण शिबिराची अत्यंत बारकाईने पाहणी केली. या प्रशिक्षण शिबिरात राज्यस्तरीय मार्गदर्शक म्हणून महमूद नवाज जागीरदार देखील उपस्थित होते.

जिल्हास्तरीय मार्गदर्शक मिन्हाजुद्दीन काझी, जावेद काझी, शाहीन शेख आणि इरफान पटेल यांनी वेगवेगळ्या विषयांवर अतिशय प्रभावीपणे मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती याविषयी अत्यंत चांगल्या प्रकारे अवगत केले. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल डायटच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सर्व प्रशिक्षित शिक्षकांनी या प्रशिक्षणाचे भरभरून कौतुक केले. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी महमूद नवाज जागीरदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# राजेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त पत्रकारांच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

स्व. राजेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या सामाजिक बांधिलकीतून प्रख्यात गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांनी आयोजिलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील महालक्ष्मी बँक्वेट हॉलमध्ये झालेल्या या शिबिरात प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी सहभाग घेत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. याचे उद्घाटन सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे व ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. सूर्यप्रकाश कोठे, ज्येष्ठ पत्रकार राकेश टोळ्ये, पत्रकार समाधान वाघमोडे, सिद्धाराम पाटील, राजकुमार शास्त्री, राजकुमार नरोटे, डिजिटल मीडिया संघटनेचे अध्यक्ष विजयकुमार बाबर, यल्लादास गड्डम, व्यंकटेश चिलका आणि श्रीनिवास चिलका यांची प्रमुख उपस्थिती होती.

### पत्रकारांनी तणावपूर्ण कार्यपद्धतीत मानसिक आरोग्य जपावे

यावेळी ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर यांनी ''धावपळीच्या जीवनात ताणतणाव व्यवस्थापन'' या विषयावर मार्गदर्शन केले. पत्रकारितेच्या तणावपूर्ण कार्यपद्धतीत मानसिक आरोग्य कसे जपावे याविषयी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी प्रास्ताविक केले. श्री. खेलबुडे यांनी डॉ. कोठे यांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक करत पत्रकारांसाठी मेडिक्लेम योजनेच्या दृष्टीने एखाद्या रुग्णालयासोबत टायअप करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. शिबिरामध्ये लिव्हर फंक्शन टेस्ट, हिपॅटायटिस-बी, हिपॅटायटिस-सी, रँडम ब्लड शुगर, संगणकीकृत नेत्र तपासणी तसेच फॅब्रोस्कॅन अशा अत्याधुनिक तपासण्या मोफत करण्यात आल्या. त्यामुळे पत्रकारांना एकाच ठिकाणी सर्वंकष आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध झाली. सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे यांनी केले, तर वासुदेव इप्पलपल्ली यांनी आभार मानले.

**जाहीर नोटीस**

विधानभवन पुणे-४११००१
क्र.आरटीएस/रि/सो/१६२/२०२५
दिनांक २५/०६/२०२६
संगणक क्र. २०२५/०१६२

**अतिरिक्त विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर**

१. **राजेंद्र काशिनाथ लिंगाडे** - **अर्जदार**
रा. मु पो.कुरुल, ता मोहोळ जि.कोल्हापूर
विरुद्ध

१. **श्रीपती भानुदास डुणे**
२. **महिपती भानुदास डुणे**
३. **ज्ञानोबा भानुदास डुणे**
४. **सुभद्रा मारुती माळी**
५. **सुदाम मारुती माळी**
६. **राजेंद्र भगवान डुणे**
७. **सुरेश मारुती ननवरे (मयत वारस)**
७अ. **संगिता सुरेश ननवरे माळी**
७ब. **अनिकेत सुरेश ननवरे माळी**
७क. **अमृता सुरेश ननवरे माळी**
वरील सर्व रा. मु.पो. कुरुल,
ता. मोहोळ, जि. सोलापूर
— **जाब देणार**

मौज कुरुल तालुका मोहोळ, जि. सोलापूर येथील जमीन गट नं ५४४ पैकी यासी क्षेत्र ० हे. ४६ आर + पोटखराब ० हे. १३ आर असे एकूण क्षेत्र ० हे. ५९ आर आर यांसी ही मिळकत प्रस्तुत प्रकरणी फेरतपासणी अर्जाची विषय मिळकत असून याबाबत अपर जिल्हाधिकारी, सोलापूर बी.एन.डी/अ/०२/२०२० दि.२०/०६/२०२५ अन्वये दिलेल्या निर्णयाविरुद्ध रिव्हिजन अर्ज या न्यायालयात दाखल आहे. सदर रिव्हिजन अर्जाचे अनुषंगाने सर्व जाबदार यांना नोंदणीकृत पोहच डाकद्वारे अर्जदार यांनी नोटीसा बजावणेची कार्यवाही केलेली आहे.

तथापि, सदर रिव्हिजन अर्जातील उक्त नमूद केलेप्रमाणे जाबदेणार ३ व ६ यांना नोंदणीकृत पोहच डाकद्वारे नोटीसा पाठविण्यात आलेल्या होत्या. मात्र संबंधितांना नोटीस बजावणी झालेली नसल्याचे दिसून येत आहे. उक्त नमूद जाबदार ३ व ६ यांना वर्तमानपत्राद्वारे जाहीर समन्स काढण्यासाठी दि. २४/०६/२०२६ रोजी सादर केलेला विनंती अर्ज मंजूर करणेत येत आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे अर्जदार यांनी दाखल केलेल्या उपरोक्त **रिव्हिजन अर्जाची पुढील सुनावणी दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अतिरिक्त विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयात, विधान भवन (कौन्सिल हॉल) पुणे-४११००१ येथे नेमण्यात आली आहे.**

तरी उपरोक्त तारखेस जाबदार तसेच जाबदार यांचे मयत वारस यांनी न्यायालयात समक्ष अथवा आपले कायदेशीर प्रतिनिधी मार्फत सुनावणीसाठी हजर रहावे. प्रस्तुतची नोटीस माझ्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

**ठिकाण : पुणे-१**
**दिनांक : २९/०६/२०२६**

(शिक्का)

**सही/-**
**(कविता द्विवेदी)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी**
**मुख्य कार्यालय : पाटील प्लॉट, निकीता हॉटेल शेजारी, बार्शी, जि. सोलापूर**
**रजि.नं. एमएससीएस/सी आर/११८८/२०१५**

**१२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस सन २०२५-२६**

श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मुख्य कार्यालय पाटील प्लॉट, निकिता हॉटेल शेजारी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर पिन- ४१३४०१ संस्थेचे **चेअरमन श्री. संतोष रावसाहेब ठोंबरे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी बोलावण्यात आली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित राहावे.

**-: सभेपुढे येणारे विषय :-**

१) मागील सर्वसाधारण सभा दि. ३१/०७/२०२५ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व नफा वाटणीस मंजुरी देणे.
३) सन २०२५-२०२६ च्या लेखा परीक्षण अहवालाची नोंद घेणे व पूर्तता अहवालाची माहिती घेणे.
४) सन २०२६-२०२७ अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२६-२०२७ साठी लेखा परीक्षकाची नेमणूक करणे व फी बाबत विचार करणे व मंजुरी देणे.
६) सन २०२५-२०२६ मध्ये संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांस दिलेल्या कर्जास मंजुरी घेणे तसेच वसुलीबाबत माहिती घेणे.
७) लाभांश देणेबाबत.
८) डिव्हीडंड २०२३ अनपेड राखीव निधीला वर्ग करणे बाबत.
९) मयत व फरार कर्ज व सूट दिलेली कर्ज खाते निर्लिखित करणे बाबत.
१०) संचालक मंडळाच्या निवडणुकीबाबत.
११) मा. चेअरमन यांच्या पूर्व परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांचा विचार करणे.

**ठिकाण :- बार्शी**
**दिनांक :- ३०/०५/२०२६**

**संचालक मंडळाच्या आदेशावरुन**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी**

**सूचना :-**
१) कोरमअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
२) वार्षिक अहवाल व जमाखर्च पत्रके याबाबत काही प्रश्न असल्यास दि. २३/०७/२०२६ पर्यंत आणून द्यावेत. नंतर आलेल्या प्रश्नाचा विचार केला जाणार नाही.
३) सभेसंदर्भात कामकाजाविषयी माहिती व रेकॉर्ड संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.



# अर्जेंटिना सहाव्यांदा उपांत्य फेरीत

## स्वित्झर्लंडवर ३-१ ने विजय, आता इंग्लंडशी सामना

**कॅन्सस सिटी, १२ जुलै**

अर्जेंटिनाने अतिरिक्त वेळेत स्वित्झर्लंडला ३-१ ने हरवून फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. लिओनेल मेस्सीच्या कॉर्नरवर ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टरने १० व्या मिनिटाला एका शानदार हेडरने अर्जेंटिनाचा पहिला गोल केला. १० खेळाडूंसह खेळत असूनही स्वित्झर्लंडने आपला निर्धार कायम ठेवला आणि ७२ व्या मिनिटाला ब्रील एम्बोलोने गोल करून सामना १-१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर, अतिरिक्त वेळेच्या ११२ व्या मिनिटाला ज्युलियन अल्वारेझने १८ यार्डांवरून एका शानदार गोलने अर्जेंटिनाला आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या शेवटच्या क्षणी लॉटारो मार्टिनेझने तिसरा गोल करून ३-१ असा विजय निश्चित केला. या विजयासह, अर्जेंटिनाने सलग दुसऱ्यांदा विश्वचषक उपांत्य फेरी गाठली आहे. तेथे त्यांचा सामना इंग्लंडशी होईल.

सामन्याच्या आकडेवारीमध्ये अर्जेंटिनाचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले. संघाने ५३ टक्के चेंडूचा ताबा राखला, तर स्वित्झर्लंडकडे ४० टक्के ताबा होता. अर्जेंटिनाने संपूर्ण सामन्यात २२ शॉट्स मारले, जे स्वित्झर्लंडच्या ११ शॉट्सच्या दुप्पटीहून अधिक होते. अर्जेंटिनाचे ७ शॉट्स लक्ष्यावर होते, तर स्वित्झर्लंडला केवळ ५ शॉट्स मारता आले. पासिंगमध्येही अर्जेंटिना आघाडीवर होता. संघाने ६५९ पास पूर्ण केले आणि ८९ टक्के पासिंग अचूकता साधली, तर स्वित्झर्लंडने ४६१ पाससह ८४ टक्के पासिंग अचूकता साधली. आकडेवारी दर्शवते की अर्जेंटिनाने संपूर्ण सामन्यात चेंडूवर अधिक चांगले नियंत्रण ठेवले आणि सतत दबाव टाकला, ज्यामुळे अखेरीस ३-१ असा विजय मिळवून उपांत्य फेरीत स्थान मिळवले. अल्वारेझला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)



विश्वचषक उपांत्यपूर्व फुटबॉल सामन्यादरम्यान स्वित्झर्लंडचा फॅबियन रायडर (२२) आणि अर्जेंटिनाचा क्रिस्टियन रोमेरो (१३) चेंडूसाठी झुंज देताना.

### स्वित्झर्लंडची झुंझार खेळी

**स्वित्झर्लंडसाठी हा पराभव निराशाजनक होता. सुरुवातीला एक गोल स्वीकारल्यानंतर संघाने उल्लेखनीय पुनरागमन केले आणि डॅन डोच्या गोलमुळे सामना बरोबरीत आणला. तथापि, ७२ व्या मिनिटाला ब्रील एम्बोलोला मिळालेल्या रेड कार्डमुळे स्वित्झर्लंडला १० खेळाडूंसह खेळावे लागले, ज्यामुळे आव्हान आणखी कठीण झाले. असे असूनही, स्विस संघाने अतिरिक्त वेळेपर्यंत अर्जेंटिनाला कडवी झुंज दिली, परंतु अखेरीस एका खेळाडूची कमतरता त्यांना महागात पडली. अर्जेंटिनाने अतिरिक्त वेळेत आपल्या संख्याबळाचा फायदा उचलत दोन गोल केले आणि ३-१ असा विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.**

# बेलिंगहॅमच्या जादूने इंग्लंड उपांत्य फेरीत

## नॉर्वेचा २-१ ने पराभव

**मियामी, १२ जुलै**

जगातील सर्वोत्तम फुटबॉलपटू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अर्लिंग हॉलंडकडून, इंग्लंडविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीत दमदार कामगिरी करून आपल्या संघाला उपांत्य फेरीत नेण्याची अपेक्षा होती. पण तसे झाले नाही आणि इंग्लंडने नॉर्वेला २-१ ने हरवून फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

दोन गोल करून ज्युड बेलिंगहॅम इंग्लंडच्या विजयाचा नायक ठरला. एका गोलच्या पिछाडीवरून पुनरागमन करून इंग्लंडने हा विजय मिळवला. दोन्ही संघांमध्ये एक जबरदस्त लढत झाली, पण अखेरीस इंग्लंडने बाजी मारली.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघ चांगला खेळले. दोघांनीही संधी निर्माण केल्या. नॉर्वेने पहिला गोल केला, पण इंग्लंडने प्रतिहल्ला करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. ३६ व्या मिनिटाला अँड्रियास श्जेल्डरूपमुळे नॉर्वेने गोल केला. या सामन्यात हॉलंड उत्कृष्ट कामगिरी करेल अशी सर्वांना अपेक्षा होती, पण तो शांत होता आणि अँडर्सने नॉर्वेचा एकमेव गोल केला.

इंग्लंडला बरोबरी साधण्याची गरज होती आणि ते प्रयत्न करत राहिले. पहिल्या हाफच्या अतिरिक्त वेळेत बेलिंगहॅमने गोल करून खाते उघडले. अँथनी गॉर्डनने त्याला अचूक पास दिला आणि बेलिंगहॅमने नॉर्वेचा गोलकीपर अर्जन नायलांडला चकवून बरोबरीचा गोल केला.

दुसऱ्या हाफमध्ये नॉर्वे आघाडी घेईल अशी अपेक्षा होती आणि त्याची जबाबदारी हॉलंडने घेतली. त्यांना संधी मिळाल्या, पण पंचांनी त्या नाकारल्या. टॉर्बजॉर्न हेगेमने जवळजवळ गोल केलाच होता, पण हॉलंडच्या एलिट अँडरसनसोबत झालेल्या धडकेमुळे तो गोल अवैध ठरवण्यात आला. डेव्हिड मोलरचा हेडरही गोल होऊ शकला नाही. अखेरीस, हॉलंडला मैदानाबाहेर पाठवण्यात आले.

९० मिनिटे संपली होती आणि स्कोअर १-१ असा बरोबर होता. सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये जाईल असे वाटत होते, पण बेलिंगहॅमने इंग्लंडसाठी पुन्हा एकदा जादू केली. मॉर्गन रॉजर्सचा शॉट नॉर्वेच्या गोलकीपरने वाचवला आणि त्यानंतर बेलिंगहॅमने हेडर मारून चेंडू जाळ्यात टाकला व इंग्लंडसाठी विजयी गोल केला. ◂(वृत्तसंस्था)



नॉर्वे आणि इंग्लंड यांच्यातील सामन्यादरम्यान, इंग्लंडचा नोनी माडुएके (२०) आणि नॉर्वेचा डेव्हिड मोलर वोल्फ चेंडूवर ताबा मिळवताना

# इतिहासात प्रथमच उपांत्य फेरीत अव्वल ४ मानांकित संघ

## तीन युरोपियन, एक दक्षिण अमेरिकन संघ



**लंडन, १२ जुलै**

२०२६ फिफा विश्वचषक आता सर्वांत रोमांचक टप्प्यावर पोहोचला आहे. उपांत्य फेरीतील चार संघ निश्चित झाले असून, विश्वचषकाच्या ९६ वर्षांच्या इतिहासात यापूर्वी कधीही न घडलेला एक विक्रम प्रस्थापित झाला आहे. प्रथमच, फिफा क्रमवारीत अव्वल असलेले चार संघ- फ्रान्स (क्रमांक १), अर्जेंटिना (क्रमांक २), स्पेन (क्रमांक ३), आणि इंग्लंड (क्रमांक ४)- एकत्र अंतिम चारमध्ये पोहोचले आहेत.

उपांत्यपूर्व फेरीत, फ्रान्सने मोरोक्कोला २-० ने, स्पेनने बेल्जियमला २-१ ने, इंग्लंडने नॉर्वेला अतिरिक्त वेळेत २-१ ने आणि गतविजेत्या अर्जेंटिनाने स्वित्झर्लंडला ३-१ ने हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. आता, जागतिक फुटबॉलमधील चार सर्वांत बलाढ्य संघ विजेतेपदासाठी आमनेसामने येतील. उपांत्य फेरीतील चार संघांपैकी तीन युरोपियन आहेत, तर अर्जेंटिना हा दक्षिण अमेरिकन देश आहे.

१९३० मध्ये विश्वचषक सुरू झाल्यापासून, फिफा क्रमवारीत अव्वल चार संघ एकत्र उपांत्य फेरीत पोहोचण्याची ही पहिलीच वेळ आहे.

सहसा, विश्वचषकात एखाद्या मोठ्या संघाला अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागते, परंतु यावेळी, सर्व प्रमुख दावेदारांनी अपेक्षा पूर्ण करत अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### १९९२ मध्ये झाली क्रमवारीची सुरुवात

- फिफाने १९९२ मध्ये अधिकृतपणे पुरुषांची जागतिक क्रमवारी सुरू केली.
- ही क्रमवारी पद्धत लागू झाल्यापासून गेल्या आठ विश्वचषकांमध्ये (१९९४ ते २०२२), अव्वल चार संघ कधीही उपांत्य फेरीत पोहोचले नाहीत.
- प्रत्येक वेळी, गट फेरीत किंवा बाद फेरीच्या टप्प्यात एखाद्या मोठ्या संघाला अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागले आहे (उदा. २०२२ मध्ये दुसऱ्या क्रमांकावरील बेल्जियम संघ गट फेरीतच बाहेर पडला होता).
- उत्तर अमेरिकेत होत असलेल्या या विश्वचषक स्पर्धेत फ्रान्स, अर्जेंटिना, स्पेन आणि इंग्लंड यांनी आपापले सामने जिंकून हा अभूतपूर्व विक्रम प्रस्थापित केला आहे.

# चुकलेल्या पासने नॉर्वेचे स्वप्न भंगले

**मियामी, १२ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्यपूर्व फेरीत इंग्लंडकडून अतिरिक्त वेळेत २-१ ने झालेल्या नॉर्वेच्या पराभवानंतर, सर्वाधिक चर्चेत असलेला निर्णय गोलबद्दल नसून, सामन्याची दिशा बदलणाऱ्या एका निर्णयाबद्दल आहे. सोशल मीडियावर याला स्पर्धेतील ''सर्वांत मोठी चूक'' म्हटले जात आहे. नॉर्वेचा स्ट्रायकर अलेक्झांडर सोर्लोथने, एका निर्णायक क्षणी, अर्लिंग हॉलंडला पास देण्याऐवजी थेट शॉट मारण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय संघाला महागात पडला.

पहिल्या हाफच्या शेवटच्या क्षणांमध्ये नॉर्वे १-० ने आघाडीवर होता. संघाला एका वेगवान प्रति-हल्ल्याची संधी मिळाली होती. इंग्लंडचा फक्त एकच बचावपटू, जॉन स्टोन्स, नॉर्वेच्या दोन्ही खेळाडूंसमोर होता आणि हालंड पूर्णपणे मोकळ्या जागेत धावत होता. सोर्लोथला हॉलंडला पास देऊन आघाडी २-० पर्यंत वाढवण्याची सुवर्णसंधी मिळाली होती. पण त्याने ड्रिबल करत स्वतःच शॉट मारण्याचा प्रयत्न केला.

इंग्लंडचे बचावपटू लगेच परतले आणि त्याचा कमकुवत शॉट गोलकीपर जॉर्डन पिकफोर्डला हुकवला. या निर्णयामुळे हॉलंड मैदानावर निराश दिसला आणि त्याने आपली नाराजी व्यक्त केली. काही मिनिटांनंतर संपूर्ण सामन्याचे चित्रच पालटले.

जर नॉर्वेने त्याच क्षणी दुसरा गोल केला असता, तर इंग्लंडला पुनरागमन करणे अत्यंत कठीण झाले असते. पण तसे झाले नाही आणि काही मिनिटांनंतरच ज्युड बेलिंगहॅमने बरोबरीचा गोल केला. बेलिंगहॅमने अतिरिक्त वेळेत दुसरा गोलही केला आणि इंग्लंडने २-१ ने विजय मिळवून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. यामुळेच सोर्लोथच्या निर्णयाला सोशल मीडियावर सामन्यातील सर्वांत मोठा टर्निंग पॉइंट म्हणून वर्णन केले जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

### पराभव होऊनही हॉलंडने सर्वांची मने जिंकली

विश्वचषकातून बाहेर पडूनही, अर्लिंग हॉलंडने आपल्या संघाच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त केला. तो म्हणाला की या मोहिमेने जगात नॉर्वेसाठी एक नवीन ओळख निर्माण केली आहे. आम्ही नॉर्वेला जागतिक फुटबॉलच्या नकाशावर पक्के स्थापित केले आहे. हीच गोष्ट मला सर्वांत जास्त भावते. मला आशा आहे की आता आम्ही युरो आणि विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धांमध्ये सातत्याने पोहोचू. हालंडने बेलिंगहॅमचीही मुक्तकंठाने प्रशंसा केली.



## ‘माझ्याशी नीट बोला’

# लिओनेल मेस्सीचा पंचांशी वाद

**कॅन्सस सिटी, १२ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ मधील अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड यांच्यातील सामना केवळ फुटबॉलच्या मैदानातील डावपेचांपुरता मर्यादित नव्हता, तर त्यात प्रचंड नाट्यमयताही पाहायला मिळाली. निर्धारित ९० मिनिटांच्या अखेरीस दोन्ही संघ १-१ असे बरोबरीत होते, तर स्वित्झर्लंड १० खेळाडूंसह खेळत होता. अखेरीस, अर्जेंटिनाने अतिरिक्त वेळेत दोन झटपट गोल करून सामना जिंकला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला.

या सामन्यात लिओनेल मेस्सीला एकही गोल करता न येण्याची ही पहिलीच वेळ होती. स्विस बचावपटूंनी प्रत्येक संधी हाणून पाडली, ज्यामुळे मेस्सी निराश झाला होता. सामन्याच्या पहिल्या सत्रात पोर्तुगीज पंच जोआओ पेड्रो पिन्हेरो यांच्याशी झालेल्या वादातून त्याची नाराजी स्पष्ट दिसत होती. मेस्सीने चालू विश्वचषकातील प्रत्येक सामन्यात गोल केला होता, पण उपांत्यपूर्व फेरीत त्याला गोल करता आला नाही.

ही घटना स्वित्झर्लंडला फ्री किक मिळण्याच्या अगदी आधी घडली. मेस्सी अर्जेंटिनाच्या बचाव भिंतीचा एक भाग होता. त्यानंतर पंच पिन्हेरो यांनी त्याला ठरावीक अंतरावर मागे हटण्याची सूचना दिली. पंचाच्या बोलण्याच्या पद्धतीमुळे मेस्सी अजिबात खूश नव्हता आणि तो संतापला. मेस्सीने पंचाला सडेतोड उत्तर दिले, ''माझ्याशी नीट बोला. माझा अनादर करू नका. माझ्याशी नीट बोला, मी तुमच्याशी नीट बोललो आहे.'' जगातील महान खेळाडूंपैकी एक मानला जाणारा मेस्सी, स्वित्झर्लंडच्या मजबूत बचावाला भेदण्यासाठी अर्जेंटिनाला संघर्ष करावा लागत असताना, त्या क्षणी माघार घेण्याच्या मनःस्थितीत नव्हता.



### सामन्यातील इतर वाद

सामन्याच्या दुसऱ्या हाफमध्ये पंच पिन्हेरो संपूर्ण वेळ वादाच्या केंद्रस्थानी राहिले. व्हिडिओ असिस्टंट रेफरीच्या हस्तक्षेपानंतर स्विस खेळाडू ब्रील एम्बोलोला ‘डायव्हिंग’ (बनावट फाऊल) केल्याबद्दल रेड कार्ड दाखवून बाहेर पाठवल्यामुळे विरोधी संघ आणि चाहत्यांकडून त्यांच्यावर टीका झाली. ◂(वृत्तसंस्था)

# तिरंदाजी विश्वचषकात धीरज, कीर्ती कांस्य पदकापासून वंचित

**माद्रिद, १२ जुलै**

भारतीय रिकर्व्ह मिश्र जोडी धीरज बोम्मादेवरा आणि कीर्ती शर्मा यांना ३-१ अशी आघाडी घेता आली नाही आणि रविवारी तिरंदाजी विश्वचषकाच्या चौथ्या टप्प्यात इटलीकडून ३-५ ने पराभूत झाल्यामुळे त्यांना कांस्यपदकापासून वंचित राहावे लागले. अंताल्या विश्वचषक विजेता धीरजसाठी हा विश्वचषक निराशाजनक ठरला. गेल्या महिन्यात तिसऱ्या टप्प्यात त्याने कुमकुम मोहदसोबत रिकर्व्ह मिश्र सांघिक सुवर्णपदक जिंकले होते, परंतु त्याला माद्रिदहून रिकाम्या हाताने परतावे लागले.

रिकर्व्ह प्रकारात भारताच्या आशा आता पूर्णपणे कीर्तीवर अवलंबून आहेत, जी वैयक्तिक उपांत्य फेरीत स्पर्धा करेल. हा सामना जिंकल्यास १९ वर्षीय कीर्तीला तिचे पहिले विश्वचषक पदक जिंकण्याची संधी मिळेल. कीर्तीने गेल्या महिन्यात अंताल्या येथे विश्वचषकात पदार्पण केले होते. भारताने आतापर्यंत विश्वचषकाच्या अंतिम टप्प्यात दोन पदके जिंकली आहेत, त्यापैकी दोन्ही पदके शनिवारी कंपाऊंड प्रकारात जिंकली. महिला संघाने कांस्य पदक जिंकले, तर प्रथिका प्रदीपने रौप्य पदक पटकावले. पहिल्यांदाच एकत्र खेळणाऱ्या धीरज आणि कीर्तीने पहिला सेट ३८-३८ असा बरोबरीत सोडवला. दुसऱ्या सेटमध्येही त्यांनी आपला खेळ कायम ठेवत केवळ दोन गुण गमावले आणि ३८ गुण मिळवले. रॉबर्टा डी फ्रान्सिस्को आणि मॅटेओ बोरसानी या इटालियन जोडीने ३७ गुण मिळवून भारतीय जोडीला ३-१ अशी आघाडी मिळवून दिली.

इटालियन जोडीने तिसरा सेट ३९-३७ असा जिंकून सामना ३-३ असा बरोबरीत आणला. भारतीय संघ चौथ्या आणि निर्णायक सेटमध्येही चांगली कामगिरी करू शकला नाही. इटालियन संघाने चार परफेक्ट १० गुण मिळवून ४०-३७ असा विजय मिळवला आणि कांस्य पदक पटकावले. ◂(वृत्तसंस्था)



# लॉर्ड्सवर यास्तिकाचे ऐतिहासिक शतक

## भारताचे इंग्लंडसमोर ४५७ धावांचे लक्ष्य

**लंडन, १२ जुलै**

यष्टीरक्षक-फलंदाज यास्तिका भाटिया लॉर्ड्सवर कसोटी शतक झळकावणारी पहिली महिला क्रिकेटपटू ठरली. तिच्या या कामगिरीमुळे भारताने एकमेव कसोटीच्या तिसऱ्या दिवशी आपला दुसरा डाव ७ गडी बाद ३४१ धावांवर घोषित केला आणि इंग्लंडसमोर ४५७ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले.

रविवारी भोजनानंतरच्या सत्रात ९१ धावांवर फलंदाजी करत असलेल्या यास्तिकाने विश्रांतीनंतरच्या पहिल्याच षटकात आपले शतक पूर्ण केले. इस्सी वोंगच्या गोलंदाजीवर एक धाव घेत तिने आपले संस्मरणीय पहिले कसोटी शतक पूर्ण केले. तिने १५८ चेंडूंचा सामना करत १४ चौकारांसह ११३ धावा केल्या. दुपारच्या सत्रानंतर तिच्या स्वतःसह तीन गडी बाद झाले. दीप्ती शर्मा आणि यास्तिका बाद झाल्यानंतर, ऋचा घोषने आक्रमक नाबाद अर्धशतक झळकावले. तिने ५२ चेंडूंमध्ये आठ चौकारांसह नाबाद ५० धावा केल्या. इंग्लंडची फिरकी गोलंदाज सोफी एक्लेस्टोन सर्वांत यशस्वी गोलंदाज ठरली, तिने ३३.३ षटकांत ११८ धावा देऊन पाच बळी घेतले.

भारताने १५४ धावांवर एक गडी बाद असताना खेळ पुन्हा सुरू केला. लॉरेन बेलने (२७ धावांत दोन बळी) स्मृती मंधानाला ७० धावांवर बाद केले. त्यानंतर बेलने जेमिमा रॉड्रिग्सला (०३) बाद केले. कर्णधार हरमनप्रीत कौरलाही (१६) चांगल्या सुरुवातीचा फायदा घेता आला नाही आणि ती एक्लेस्टोनच्या गोलंदाजीवर बाद झाली. तिने ३४ चेंडूंमध्ये १६ धावा केल्या. यास्तिकाने शानदार शतक झळकावून भारताला मजबूत स्थितीत आणले. ◂(वृत्तसंस्था)



# परिस्थितीशी जुळवून घेण्यात अपयशी : अय्यर

**साउथहॅम्प्टन, १२ जुलै**

ब्रिटनमधील परिस्थितीशी जुळवून घेण्यात आलेल्या अपयशामुळे आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध मालिकांमध्ये पराभव पत्करावा लागला. असे असले तरी यामुळे मला भविष्यात एक चांगला कर्णधार बनण्यास मदत होईल, असे मत भारताचा नवा टी-२० कर्णधार श्रेयस अय्यरने व्यक्त केले.



भारताच्या टी-२० विश्वचषक विजयानंतर सूर्यकुमार यादवच्या जागी कर्णधार बनलेल्या अय्यरची सुरुवात खराब झाली. संघ आयर्लंडकडून ०-२ ने पराभूत झाला आणि त्यानंतर पावसामुळे पहिला सामना रद्द झाल्याने इंग्लंडविरुद्धची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका ०-४ ने गमावली. इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या सामन्यातील पराभवानंतर अय्यर पत्रकारांशी बोलत होता. तो म्हणाला, अपेक्षांना सामोरे जाणे फारसे कठीण नाही. मला कर्णधारपदाची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. भारतीय संघाचे कर्णधारपद भूषवण्याचे आणि सर्वोच्च स्तरावर जबाबदारी स्वीकारण्याचे स्वप्न प्रत्येक जण पाहतो. मला दबावाखाली खेळायला नक्कीच आवडते.

दबावाखाली चांगली कामगिरी करणे आणि या सामन्यांमधून शिकणे मला भविष्यात नक्कीच अधिक चांगले बनवेल. हा माझा सध्याचा विचार आहे. या मालिकेबद्दल लोक काय विचार करतात याकडे मी फारसे लक्ष देत नाही, कारण चांगले आणि वाईट हे खेळाचाच एक भाग आहे. संघाने सकारात्मक मानसिकता राखणे महत्त्वाचे आहे, कारण भविष्यातील यशाची तीच गुरुकिल्ली असेल, असा विश्वास अय्यरने व्यक्त केला. ते म्हणाले, भविष्यात, मी माझ्या खेळाडूंना, विशेषतः परदेशातील परिस्थितीत, सुधारणा करण्यास कशी मदत करू शकेन याबद्दल मला खूप सकारात्मक राहावे लागेल. ते म्हणाले, आम्हाला माहित आहे की आम्हाला ऑस्ट्रेलियामध्ये (पुढील टी-२० विश्वचषक) खेळावे लागेल. त्याआधी, आम्हाला इतर अनेक ठिकाणी खेळावे लागेल. या परिस्थितीत चांगली कामगिरी करू शकेल असा संघ तयार करणे हे आमचे ध्येय आहे. ही आमची भविष्यासाठीची योजना आहे.

शनिवारी भारताने पाचवा आणि अंतिम टी-२० सामना ५६ धावांनी गमावला आणि अय्यर यांनी कबूल केले की दौर्यादरम्यान त्यांचा संघ परिस्थितीशी लवकर जुळवून घेऊ शकला नाही. ते म्हणाले, आम्ही एका मैदानावरून दुसर्या मैदानावर जात राहिलो आणि सतत आव्हानांना सामोरे गेलो. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १११ जणांचे रक्तदान

**पिलीव, दि. १२ जुलै-**

ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त निमगाव (म) ता. माळिशरस येथे बाबुराव बोत्रे-पाटील ग्रामविकास प्रतिस्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात १११ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन सरपंच सुभाष साठे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्त समितिचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण मगर होते. शिबिरात जास्तीत जास्त रक्तदान केल्याबद्दल लक्ष्मण घाडगे व कालिदास मगर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, अशोक मगर, नागनाथ मगर, सर्जेराव पवार, प्रताप मगर, विश्वनाथ मगर, राज मगर, दादासाहेब पवार, मल्हारी मगर, विजय मगर, सुरेंद्र मगर उपस्थित होते.



## पिलीव येथे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सन्मान

**पिलीव, दि. १२ जुलै-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील पाचवी व आठवीमधील शिष्यवृत्तीधारक गुणवंत विद्यार्थ्यांचा माळिशरस पंचायत समितीच्या उपसभापती मनीषा पाटील यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. या परीक्षेत पाचवीमधील प्रित गांधी, आठवीमधील समृद्धी जगदाळे, श्रावणी तावरे, रुद्र यादव, राजवर्धन पाटील हे विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. या सर्वांचा त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत माळिशरस पंचायत समितीच्या उपसभापती मनीषा मदने-पाटील, माजी सरपंच अमोल मदने, शाळा व्यवस्थापन समीतीचे सदस्य संजय पाटील, पत्रकार अतुल नष्टे, मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक मासाळ, विभाग प्रमुख शेगर, विभाग प्रमुख जमदाडे यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. यावेळी माजी सरपंच अमोल मदने, शाळा व्यवस्थापन समीती सदस्य संजय पाटील, जमदाडे, झाडे, शेगर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास वाघमारे, जाधव, देवकर, कदम, काळे, मगर, ढोले, पवार, भैस, ज्युनिअर विभाग प्रमुख सचिन पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन शेगर यांनी तर आभार झाडे यांनी मानले.

## गौडगाव विभागात नद्या-नाले कोरडे; तरीही खरीपाची मोठ्या क्षेत्रात पेरणी

**गौडगाव, दि. १२ जुलै-**

गौडगाव परिसरात अद्यापही पुरेसा पाऊस पडलेला नाही. नद्या-नाले कोरडे आहेत. मात्र तरीही शेतकऱ्यांनी खरिपाची पेरणी धाडसाने केली आहे. गौडगांव परिसरात जेमतेम पेरणीकरिता आवश्यक ओलावा झाल्याने भालगाव, गौडगाव, आळजापूर, संगमनेर, रऊळगांव, रुई व झरेगांव या गावामध्ये रामभरोसे पेरणी झाली आहे. येत्या १५ दिवसांत मोठा पाऊस नाही पडल्यास हातचे गेले अन् पदरचेही गेले, अशी भयानक स्थिती शेतकऱ्यांची होणार आहे.

## भानुदास बायनी यांचे निधन



**सोलापूर, दि. १२ जुलै-**

जुना विडी घरकुल येथील रहिवासी भानुदास मल्लय्या बायनी (वय ७५) यांचे दि. ११ जुलै रोजी रात्री १०.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर दि. १२ जुलै रोजी दुपारी १ वाजता जोडबसवण्णा चौक येथील पद्मशाली स्मशानभूमीत अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. दैनिक तरुण भारतचे जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी यांचे ते वडील होत. त्यांच्या अंतिम संस्कारावेळी समाजातील प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शिलाबाई काटे



**बार्शी, दि. १२ जुलै-**

बार्शी पंचायत समितीचे माजी सभापती युवराज काटे यांच्या मातोश्री शिलाबाई भाऊसाहेब काटे (वय ६४) यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर खामगांव (ता. बार्शी) या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### प्रा. अशोक बनसोडे



**सांगोला, दि.१२ जुलै-**

श्रीधर कन्या प्रशाला व ज्यु.कॉलेज, नाझरे (ता.सांगोला) येथील प्रा.अशोक मार्तंड बनसोडे (वय-५६) यांचे शनिवार दि.११ जुलै रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, दोन बहिणी असा मोठा परिवार आहे.

# मंगळवेढ्याच्या शेतकऱ्यांवर महावितरणचा दुजाभाव?

### शेजारच्या तालुक्यांना ५ तास, मंगळवेढ्याला केवळ २ तास वीज

### नदीकाठच्या शेतकऱ्यांचा संताप



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ जुलै -**

सोलापूर जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाई व अल-निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी पंपांच्या वीजपुरवठ्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश जारी केला आहे. मात्र या आदेशात मंगळवेढा तालुक्यावर अन्याय झाल्याची भावना नदीकाठच्या शेतकऱ्यांमध्ये तीव्र झाली आहे. शेजारच्या तालुक्यांत नदीकाठच्या कृषी पंपांना दररोज ५ तास वीजपुरवठा होत आहे. मात्र मंगळवेढा तालुक्यात नदीकाठच्या शेतकऱ्यांना केवळ २ तास वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मंगळवेढा तालुक्यातील उचेठाण, बठाण, माचणूर, सिद्धापूर, अरळी या भीमा नदीकाठावरील परिसरात मोठ्या प्रमाणावर ऊस, द्राक्ष, केळी तसेच भाजीपाला पिकांची लागवड आहे. या भागातील बंधाऱ्यांवरच हजारो एकर शेती अवलंबून आहे. उचेठाण बंधाऱ्यावरून मंगळवेढा शहरासह भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेलाही पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे या बंधाऱ्यांवरील पाण्याचा वापर आधीच मोठ्या प्रमाणात होत आहे. यावर्षी उजनी धरणातून पाणी उशिरा सोडल्याने नदीकाठचा भाग आधीच संकटात सापडला होता.

त्यातच आता कृषी पंपांसाठी वीजपुरवठा केवळ दोन तासांवर आणल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले आहे. उजनी धरणात सध्या समाधानकारक पाणीसाठा असून वीर धरणातील पाणीही भीमा नदीपात्रात सोडले आहे. त्यामुळे नदीपात्रात पाण्याची उपलब्धता असतानाही मंगळवेढा तालुक्यालाच कमी वीजपुरवठा देण्यामागचे कारण काय, असा प्रश्न शेतकरी विचारत आहे.

काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांनी अन्य तालुक्याप्रमाणे मंगळवेढा तालुक्यालाही कृषी पंपांसाठी पाच तास वीजपुरवठा द्यावा. जिल्ह्यातील दोन तालुक्यांसाठी वेगवेगळे निकष लावल्याने शेतकऱ्यांमध्ये सरकारच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण होत असल्याचे म्हटले आहे. सिद्धापूर येथील शेतकरी अनिल बिराजदार यांनी निसर्गाच्या कृपेने हिरवीगार झालेली पिके वाळवून सरकारला शेतकऱ्यांच्या चिताच रचायच्या आहेत का? असा सवाल विचारला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे तालुक्यातील नदीकाठच्या शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे.

### आमच्यावरच अन्याय का?

मंगळवेढा सोडून सर्वत्र चार-पाच तास वीज दिली जाते, मग आमच्यावरच हा अन्याय का? लोकप्रतिनिधींच्या मागण्यांनाही सरकार प्रतिसाद देत नाही का? तालुक्यातील शेतकऱ्यांवर सरकारने सूडाची भावना ठेवली आहे का, असा प्रश्न आम्हाला पडला आहे.

अनिल बिराजदार. शेतकरी, सिद्धापूर.

### लोकप्रतिनिधींच्या मागणीकडेही दुर्लक्ष

खासदार प्रणिती शिंदे, आमदार समाधान आवताडे, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण तसेच शिवसेना कामगार सेनेचे राजकुमार स्वामी यांनी मंगळवेढा तालुक्यातील कृषी पंपांना इतर तालुक्यांप्रमाणे पाच तास वीजपुरवठा देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. मात्र अद्याप या मागणीवर कोणताही सकारात्मक निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

## हूमेरा पठाणचा मंथन परीक्षेत राज्यात २२ वा क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१२ जुलै -**



मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ मध्ये बार्शी येथील महाराष्ट्र विद्यालयाची विद्यार्थीनी हुमेरा पठाण हिने २५६ गुण मिळवत केंद्रात ५ वा, सोलापूर जिल्ह्यात १४ वा आणि राज्यात २२ वा क्रमांक मिळवला.

मंथन वेल्फेअर फाउंडेशन, अहिल्यानगर आणि मंथन सामान्य ज्ञान परीक्षा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ बार्शी येथील माऊली लॉन्स येथे पार पडला. समारंभात राज्यभरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला.

यावेळी आमदार राजेंद्र राऊत, कार्यक्रमाचे आयोजक नवले, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी हुमेरा पठाण हिचा शाळा प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे तसेच धर्मादाय निरीक्षक भूषण चोबे यांच्याहस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

## वैराग पोलिसांकडून ग्राम सुरक्षा दलाला काठी, शिट्टी वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १२ जुलै-**

ग्रामीण भागातील सुरक्षा रक्षकांना रात्रीच्या गस्तीदरम्यान स्वतःचे संरक्षण करता यावे, या उद्देशाने वैराग पोलिस ठाण्याच्या वतीने शनिवारी (दि. ११) ग्राम सुरक्षा दलाच्या जवानांना काठी आणि शिट्टीचे वाटप करण्यात आले.

ग्राम सुरक्षा दलाचे जवान रात्री जीव धोक्यात घालून गस्त घालत असतात. अंधारात एखादी संशयास्पद हालचाल दिसल्यास किंवा चोरांशी सामना झाल्यास, या जवानांकडे स्वतःच्या रक्षणासाठी कोणतेही साधन नव्हते. पोलिसांकडून मिळालेली काठी त्यांना स्वसंरक्षणासाठी बळ देईल, तर शिट्टीचा एकाच वेळचा मोठा आवाज संपूर्ण गावाला जागे करण्यासाठी आणि इतर सुरक्षा रक्षकांना मदतीसाठी तात्काळ एकत्र आणण्यासाठी प्रभावी ठरेल.

हे वाटप जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली वैराग पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अमूल कादबने यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ग्राम सुरक्षा दलाचे जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच वैराग पोलिस ठाण्याच्या गोपनीय विभागाचे किसन कोलते, पोलिस कॉन्स्टेबल आकाश पवार, गणेश चव्हाण, शब्बीर पठाण, रुपेश सातपुते यांच्यासह विविध गावांतील पोलिस पाटील आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते. वैराग पोलिसांच्या या तत्परतेबद्दल आणि ग्रामीण भागातील जनतेला सुरक्षिततेची हमी देणाऱ्या या उपक्रमाबद्दल संपूर्ण परिसरातून कौतुक केले जात आहे.

### ‘गुन्हेगारांवर वचक आणि ग्रामस्थांना सुरक्षा



काठी आणि शिट्टी ही केवळ साधने नसून, गुन्हेगारांमध्ये धडकी भरवणारे आणि ग्रामस्थांना सुरक्षिततेचा दिलासा देणारे शस्त्र आहे. ग्राम सुरक्षा दलाच्या खंबीर साथीने वैराग पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नागरिकांनीही कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा.

**अमूल कादबने,** पोलिस निरीक्षक, वैराग पोलिस ठाणे.

## रिक्त पदांमुळे मंगळवेढा ग्रामीण रुग्णालय सलाईनवर

### विविध 13 पदे रिक्त; कर्मचाऱ्यांची तारेवरची कसरत

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १२ जुलै -**

मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात एकूण १३ विविध पदे रिक्त आहेत. परिणामी येथील कर्मचाऱ्यांना सेवा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. पुणे आरोग्य विभागाच्या उपसंचालकांनी तात्काळ रिक्त पदे भरावीत अशी मागणी होत आहे.

मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात दैनंदिन ३५० ते ४०० रुग्ण येत असतात. येथील बेड संख्या ३० आहे. सध्या नैसर्गिक वातावरणात बदल झाल्याने नागरिक व लहान बालके आजारी पडत आहेत. आहे. कार्यरत कर्मचाऱ्यांना आपली ड्यूटी करुन उर्वरीत कालावधीतही अतिरिक्त काम करावे लागत आहे. परिणामी त्यांची मानसिकता ढासळत चालली आहे. नर्सिंग पदे ४, मेडिकल ऑफिसर १, सफाई कामगार १, ऑफिस लिपीक १, सहाय्यक अधिक्षक १,शिपाई १, कक्षसेवक १, चालक १,औषध निर्माण अधिकारी १ आदी पदे रिक्त आहेत. मध्यंतरी खा.प्रणिती शिंदे



यांनी ग्रामीण रुग्णालयास भेट दिल्यानंतर रिक्त पदांची माहिती जाणून घेतली; मात्र अद्यापही कर्मचारी रिक्त पदे भरली गेली नाहीत.

सध्या सर्वच शासकीय कार्यालयात संगणकीय कामकाज सुरु आहे. येथे केवळ तीन संगणक असल्यामुळे कामकाजाच्या नोंदी करणे तारेवरची कसरत बनत आहे. पुरेशा प्रमाणात संगणक मिळाल्यास कामाला गती मिळेल.

रुग्णालयात वर्षभरात १ हजार ६ महिलांच्या डिलीव्हरी केल्याने जिल्ह्यात मंगळवेढा ग्रामीण रुग्णालय अव्वल ठरले आहे. येथे डिलीव्हरीसाठी येणाऱ्या महिलांची संख्या सोयी सुविधामुळे दिवसेंदिवस वाढत आहे. अजून काही साधनांचा अभाव असल्याने ती साधने मिळाल्यास अजूनही डिलीव्हरी केसेस वाढण्याची शक्यता आहे.

## मंद्रूपच्या समस्यांसाठी उपमुख्यमंत्र्यांना साकडे

### जिल्हा उपाध्यक्ष जोडमोटे यांनी दिले निवेदन

**दक्षिण सोलापूर,**
**तभा वृत्तसेवा, दि. १२ जुलै-**

मंद्रूपच्या शाळा परिसरात मोठ्या प्रमाणात बनावट दारू विक्री करण्यात येत आहे. यामुळे लहान बालकांच्या मनावर व शिक्षणावर परिणाम होत आहे. तसेच बनावट दारूच्या व्यसनी गेल्यामुळे अनेक तरुणांचे संसार उध्वस्त होत आहे. तरुणांच्या अकाली निधनामुळे वैधव्य प्राप्त झालेल्या कुटुंबाची दयनीय अवस्था होत आहे. त्यामुळे बनावट दारू विक्रीवर बंदी घालण्यात यावे. यासह मंद्रूप मधील अनेक समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गुरूनाथ जोडमोटे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन दिले.

यावेळी जिल्हा अध्यक्ष उमेश पाटील, सुयेश जोडमोटे, श्रीमंत डोमनाळे व शिवानंद घाले आदी उपस्थित होते.



मंद्रूप व जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अवैद्य व बनावट दारूची विक्री होत आहे. त्यामुळे व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांच्या कुटुंबाना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे बनावट दारू विक्रीवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पावसाळा सुरू झाल्यानंतरही महावितरणकडून मोठ्या प्रमाणात भारनियमन करण्यात येत असल्यामुळे पिके जळून चालली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. म्हणून वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी जोडमोटे यांनी केली आहे. तसेच मंद्रूपला मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवत आहे. पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी गाव तलावाची दुरुस्ती करून त्यामध्ये उजनी धरणातील कॅनॉलचे पाणी सोडण्याची मागणी जिल्हा उपाध्यक्ष गुरूनाथ जोडमोटे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

## मोटरसायकल चालकास अडवून एक लाख ८९ हजाराची लुट

### पिलीव घाटात दरोडा; माळशिरस पोलिस ठाण्यात गुन्हा



**तभा वृत्तसेवा**
**माळशिरस दि. १२ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडीच्या हद्दीत पिलीव घाटाच्या सुरुवातीस मोटारसायकल चालक आनंद भागवत यांना अडवून २० हजार ७० हजार रुपये, सोने व त्यांच्या खात्यावरील ९९ हजार जबरदस्तीने दोघांच्या खात्यावर घेण्यात आले. ही घटना ११ जुलै रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली.

११ जुलै रोजी आनंद भागवत (रा. शिंगणापूर चौक म्हसवड) हे मोटार सायकल क्र. एम एच ५३/ ३९१३ वरून पिलीव येथील काम संपवून पंढरपूर सातारा रस्त्याने चालले होते. सुळेवाडी गावच्या हद्दीत पिलीव घाटाचे सुरुवातीस त्यांना पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीवरील चालकाने गाडी आडवी करुन थांबवले. गाडीतील दोन महिला व तीन पुरुषांनी मारहाण करून भागवत यांना स्विफ्ट गाडीत बसवले. गाडीतही मारहाण करुन त्यांना पानीव ता. माळशिरस येथील वस्तीवर नेले. त्यांच्याजवळील मोबाईल काढून घेऊन व खिशातील वीस हजार रुपये रोख व हातातील सात ग्रॅम सोन्याची अंगठी काढून घेतले. चाकूचा धाक दाखवून मोबाईलमधून त्यांच्या खात्यातील ९९ हजार रुपये दोन व्यक्तींच्या नावावर पाठवले. असे एकूण १ लाख ८९ हजार लुटले. त्यानंतर त्या दोन महिलांपैकी एका महिलेने त्यांच्या जवळ उभा राहून जबरदस्तीने व्हिडिओ तयार केला. पोलिसांत तक्रार केल्यास व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली.

याबाबत आनंद भागवत यांच्या फिर्यादीवरुन माळशिरस पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वाती पवार करीत आहेत.

### तासात सहा आरोपी ताब्यात

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधीक्षक विजय कबाडे , उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष वाळके, गुन्हा अन्वेषणचे पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी फिर्यादीने दिलेल्या वर्णनावरून दोन महिला व चार पुरुष अशा सहा आरोपींना ताब्यात घेतले. अशा प्रकारची लूट झाली असल्यास संबंधितांनी माळशिरस पोलिस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी केले आहे०.



## सोमेश्वर हायस्कूल विद्यार्थ्यांना एम.के.फाउंडेशनतर्फे वह्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १२**

श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री सोमेश्वर हायस्कूल हत्तूर येथे एम. के. फाउंडेशन यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शंभुराजे भरले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी एम. के. फाउंडेशनचे या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाबद्दल कौतुक केले. यावेळी स्वप्नील हसापुरे, विवेकानंद हिरेमठ, सुधाकर बिराजदार, शुभांगी धसाडे, बाबूराव अवताडे, विठ्ठल डोगे यांच्यासह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एम. के. फाउंडेशनतर्फे दरवर्षी गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यात येते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ओबीसी महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व त्याअंतर्गत कार्यरत १४ महामंडळांच्या वतीने ओबीसी समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी आणि सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी विविध कर्ज योजना राबवल्या जात आहेत.

यामध्ये १ लाखांपर्यंतची थेट कर्ज योजना, २० टक्के बीज भांडवल, तसेच वैयक्तिक, गट, शैक्षणिक व महिला स्वयंसिद्धी कर्ज व्याज परतावा योजनांचा समावेश आहे. पात्र उमेदवारांनी या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक एस. एन. झुंजारे यांनी केले आहे.



## विविध वृत्त....

### बोगस शाळांचा शोध घेण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : जिल्ह्यात बोगस शाळा कार्यरत आहेत का? याचा शोध घेण्याची मागणी सामाजिक व विद्यार्थी संघटनांतून होत आहे. गतवर्षी बोगस शाळा आढळल्याने मोठी खळबळ माजली होती. माध्यमिक शिक्षण विभागाला कारवाई करावी लागली. यावर्षीही बोगस शाळांचा शोध घ्यावा. काही ठिकाणी बोगस शाळा कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाने जिल्हा परिसरात कुठे बोगस शाळा सुरू आहेत का? याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण, गावोगाव इंग्रजी माध्यमाच्या पीजी, केजी व स्कूल सुरू आहेत. या स्कूलनी शिक्षण विभागाची रितसर परवानगी घेतली आहे का? याचा शोध घ्यावा. ग्रामीण भागात खाजगी इंग्रजी माध्यम शाळांचे पीक फारच फोफावले असून, यात विद्यार्थी, पालकांची फसवणूक होऊ नये; पर्यायाने, शैक्षणिक नुकसान होऊ नये, अशी भूमिका सामाजिक व विद्यार्थी संघटनांनी मांडली आहे. माध्यमिक शिक्षण विभागाने जिल्ह्यात कुठे बोगस शाळा आहेत का? याचा शोध घ्यावा. कारण, १५ जूनला शाळा सुरू होण्याच्या तोंडावर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने पत्र काढून पालकांनी आपल्या पाल्यास प्रवेश देताना शाळा अधिकृत नोंदणी झालेली आहे का? हे पाहण्याचे आवाहन केले होते. यासंदर्भात, पालकांनी जागरूक राहून प्रवेश घेतले का? हे सुद्धा शिक्षण विभागाने पाहण्याची गरज आहे. शिक्षण विभागानेही शोध घेऊन बोगस शाळांची माहिती प्रसारित करावी, अशी मागणी होत आहे.

### श्री खाटू श्याम मंदिरात भजन

लातूर दि. १२ जुलै : योगिनी एकादशीच्या निमित्ताने शहरातील कव्हा नाका परिसरापासून जवळच असलेल्या कोलू रोड येथील श्री खाटू श्याम मंदिरात शुक्रवारी, दि. १० जुलै रोजी सायंकाळी भक्तिमय भजन संध्या पार पडली. यावेळी टाळ-मृदंगाच्या गजरात आणि सुमधुर भजनांच्या तालावर भाविक तल्लीन झाले होते. संपूर्ण मंदिर परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

# लातूर येथे सहकार संकुल इमारतीचे भूमिपूजन उत्साहात

## सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध : बाबासाहेब पाटील



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १२ जुलै : सहकार चळवळ ही आपल्या राज्याची वेगळी ओळख आहे. राज्यातील लाखो संसार सहकारामुळे उभे राहिले आहेत. बदलत्या काळानुसार सहकाराचे स्वरूप बदलत असून या क्षेत्राला अधिक बळकट करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. तसेच, सहकार चळवळीने ग्रामीण भागासह संपूर्ण राज्याच्या प्रगतीला मोठा हातभार लावला आहे. सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लातूर जिल्ह्यातील सहकारी संस्था व बँकांना अधिक सक्षम करण्यासाठी आणि सहकार विभागाच्या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध होण्यासाठी 'सहकार संकुल' उपयुक्त ठरेल, असा विश्र्वास पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला.

लातूर येथे सहकार संकुल इमारतीचे भूमिपूजन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील अध्यक्षतेखाली आणि लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला विधान परिषद सदस्य तथा मुख्य प्रतोद आमदार विक्रम काळे, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, नगरसेवक विक्रांत गोजमगुंडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तम माने, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सूरज पाटील, विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता रूपा राऊळ, अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सहकार चळवळीमुळे आजवर राज्यात मोठा रोजगार निर्माण झाला. असून ही चळवळ जिवंत राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सहकारी चळवळीचे माध्यम असलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना केवळ पारंपारिक व्यवसायापुरते मर्यादित न ठेवता, त्यांच्या माध्यमातून किराणा दुकानांपासून ते जेनेरिक औषध दुकानांपर्यंत विविध नवे उद्योग व व्यवसाय सुरू करण्याची परवानगी शासनाने दिली आहे. यामुळे सहकार क्षेत्रातून रोजगाराची नवनवीन दालने खुली होणार आहेत. बदलत्या काळात सहकार क्षेत्रात अमूलाग्र बदल होत असून, राज्याला १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यात सहकार चळवळ महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्र्वास सहकार मंत्री श्री. पाटील यांनी व्यक्त केला. राज्य शासनाने आणलेल्या अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच लातूर येथे उभारण्यात येणारे सहकार संकुल हे लातूरच्या वैभवात भर घालणारे आणि सहकार चळवळीला अधिक सक्षम करणारे ठरेल, असेही ते म्हणाले.

सहकार चळवळ बळकट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरु करून केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या माध्यमातून शेतकरी व सहकारी संस्थांच्या हिताचे मोठे निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्राला सहकाराची समृद्ध परंपरा आहे. राज्य शासनही सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करीत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्यात सहकार संकुल उभारून सहकार विषयक विविध कार्यालये एकाच छताखाली आणण्याचे काम सुरू आहे. सहकारी संस्थांसाठी सर्व सेवा एकाच ठिकाणी मिळणार असून यामुळे वेळेची बचत आणि सेवांमध्ये सुलभता निर्माण होईल. संकुलाचे काम दर्जेदार, गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे. कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यावेळी म्हणाले.

राज्य शासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतील काही अटी वगळण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून, याचा लाभ लाखो शेतकऱ्यांना होईल, असा विश्र्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

शेतकऱ्यांना आधार देणाऱ्या सहकारी संस्थांसाठी उभारण्यात येणारे सहकार संकुल वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, असे आमदार विक्रम काळे यावेळी म्हणाले.

प्रास्ताविक विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले. सहायक निबंधक गडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## स्वार्थी पत्रकारांपासून सावध राहण्याचे आवाहन



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १२ जुलै : गेल्या काही दिवसापासून रेणापूर शहरासह तालुक्यातील काही पत्रकार आम्ही सगळे एक आहोत असे भासवून पत्रकारितेचा गैरवापर करून पत्रकारिता क्षेत्राला अशोभनीय कार्य करीत आहेत तेव्हा पत्रकारितेला बदनाम करणाऱ्या अशा स्वार्थी पत्रकारापासून अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि व्यवसायिकांनी सावध राहावे असे आवाहन रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे यांनी केले आहे.

रेणापूर तालुक्यातील पत्रकार एक आहेत असे भासवून काही पत्रकार स्वतःच्या हितासाठी आर्थिक व साहित्याची मागणी करीत असल्याचे प्रकार रेणापूर तालुक्यातील विविध कार्यालय चर्चिले जात आहेत याबाबत रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील पत्रकाराची तातडीची बैठक होऊन सविस्तर चर्चा झाली.

पत्रकाराकडून समाजाच्या मोठ्या अपेक्षा असताना काही पत्रकार वैयक्तिक स्वार्थासाठी सर्व पत्रकार सोबत आहेत, असे दर्शवून स्वतःचे हित साधत असतील तर ही बाब अत्यंत निंदनीय आहे. अशा प्रकारची पत्रकारिता गेल्या काही दिवसापासून रेणापूर तालुक्यात बोकाळली असून अशा प्रकारास सर्वच पत्रकार सहमत नाहीत. तेव्हा रेणापूर तालुक्यातील अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि व्यवसायिकांनी जागृत राहून अशा पत्रकारापासून अलिप्त रहावे असेही आवाहन नामदेव शिंदे यांनी केले आहे. या बैठकीस रफिक शिकलकर, चंद्रकांत कातळे, सिद्धार्थ चव्हाण, शेख निजाम, गंगासिंह कदम, बालाजी कटके, ईश्र्वर बद्दर, कोंडीराम काळे, भरत भोसले, आर डी अपसिंगेकर यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

## अ.भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने लातूर आरटीओ कार्यालयावर भव्य मोर्चा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : लातूर आरटीओ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचार व चुकीच्या कारवाईच्या निषेधार्थ अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आरटीओ कार्यालयाकडून वाहनधारकांची केली जाणारी अडवणूक व आर्थिक लुट थांबविण्यात यावी अशी मागणी वारंवार करूनही संबंधित विभागाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन हा आगळा वेगळा मोर्चा काढण्यात आला.

मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करून वाहनधारकांची अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची गाढवावरून धिंड काढण्याची जाहीर धमकी दिल्यामुळे भेदरलेला एकही अधिकारी मोर्चास सामोरा आला नाही. त्यामुळे संतप्त मोर्चेकऱ्यांनी तब्बल दोन तास आरटीओ कार्यालयासमोर ठिय्या धरला. शेवटी पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून आरटीओ अधिकाऱ्यांना मोर्चासमोर आणले. त्यावेळी अध्यक्ष खंडापूरकर यांनी अधिकाऱ्यांना एक महिन्यात कामकाजात सुधारणा नाही केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा दिला.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने आयोजित केलेल्या या मोर्चामुळे बराच काळ आरटीओ कार्यालय परिसरातील वातावरण तणावपूर्ण बनले होते. या मोर्चात राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य पृथ्वीराजसिंह पाटील खंडापूरकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा विधी विभाग एड. राणीताई स्वामी, राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर काशीबाई हांडे, शिवा काळे, नेताजी जाधव, पृथ्वीराज पवार, नागेश जाधव, सुनील शिंदे, अजय राठोड, किरण मुंडे, रामभाऊ जवळगे, अमोल भालेराव, वैभव घोबाळे, रेखा खंदाडे, साक्षी भातलवंडे ,विशाखा हातागळे , संकेत भोसले, शितल तमलवार, सुनील कदम, महेश पाटील, यांसह परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, वाहनधारक - वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोटरी क्लब दिव्यांगांसह पर्यावरण, आरोग्याच्या उपक्रमांवर देणार भर : डॉ. गोरे




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : रोटरी वर्ष २०२६-२७ मध्ये आंतरराष्ट्रीय रोटरीकडून प्राप्त झालेले विविध उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्याचे नियोजन असून दिव्यांग, पर्यावरण, शेती, शिक्षण, आदिशक्ती आणि आरोग्य यावर विशेष भर दिला जाईल. माझ्यासारख्या दिव्यांग व्यक्तीला अध्यक्षपदाची जी जबाबदारी दिली आहे, ती मी माझ्या कार्यकुशलतेने पूर्ण करण्याचा नक्कीच प्रयत्न करीन, अशी ग्वाही रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे नूतन अध्यक्ष डॉ. माधव गोरे यांनी दिली.

येथील भालचंद्र ब्लड बँकेमध्ये क्लबचा २०२६-२७ चा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी आयपीडीजी सुधीर लातुरे, नूतन सहाय्यक प्रांतपाल डॉ. राजगोपाल तापडिया, मावळते अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार आणि नूतन सचिव डॉ. घनश्यााम ताडेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. यानंतर प्रा. आशिष क्षीरसागर यांनी

मावळते अध्यक्ष व सचिव यांना कॉलर प्रदान केले.

या वेळी सुधीर लातुरे यांनी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये लातूर होरायझनने आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगत मावळते अध्यक्ष डॉ. बिरादार यांच्या कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमात रो. विश्र्वनाथ निगुडगे, नरेश कोरे, रो. विजय कोळी, मनोज सूर्यवंशी, दत्ता बेडके आदींचा सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय रोटरीचे कार्य जगभरातील तब्बल २१० राष्ट्रांमध्ये सुरू आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चा विचार केल्यास, यामध्ये एकूण ११ महसुली जिल्ह्यांचा समावेश होतो. तसेच, लातूर शहरामध्ये सध्या एकूण ०६ रोटरी क्लब सक्रियपणे कार्यरत आहेत.

नूतन कार्यकारिणीचा पदभारः रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनच्या नूतन अध्यक्षपदी डॉ. माधव गोरे आणि सचिवपदी डॉ. घनश्याम ताडेवार यांनी अधिकृतरीत्या पदभार स्वीकारला.. विविध क्षेत्रांत कार्याचा संकल्पः आगामी वर्षात दिव्यांग कल्याण, पर्यावरण संरक्षण, शेती विकास, शिक्षण, महिला सक्षमीकरण (आदिशक्ती) आणि आरोग्य या क्षेत्रांत प्रभावी काम करण्याचे क्लबचे नियोजन आहे.

कार्यक्रमात लातूर शहरातील विविध रोटरी क्लबच्या अध्यक्ष व सचिवांसह मान्यवरांचा विशेष सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. मावळत्या अध्यक्षांचे कौतुकः मावळते अध्यक्ष डॉ. गुणवंत बिरादार यांनी वर्षभरात राबवलेल्या सामाजिक उपक्रमांबद्दल मान्यवरांनी त्यांची प्रशंसा करत डिस्ट्रिक्ट ३१३२ मधील कार्याचा गौरव केला.

## अनुसूचित जाती आरक्षणाचे दोन गटात उपवर्गीकरण करा : सचिन बगाडे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. परंतु, आरक्षण वर्गीकरण कृती समितीने त्याचे दोन गटात उपवर्गीकरण करण्याची मागणी लातुरात आयोजित पत्रकार परिषदेत शनिवारी केली. यावेळी समितीचे निमंत्रक सचिन बगाडे, संयोजक अरविंद पाटोळे, नागेश गायकवाड आदी उपस्थित होते.

आरक्षण वर्गीकरण मुद्द्याला घेऊन बगाडे व त्यांचे सहकारी पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात आपली भूमिका मांडत असून, त्यानुसार त्यांनी शनिवारी लातूर पत्रकार परिषद घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना बगाडे म्हणाले, राज्यात अनुसूचित जाती सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या एकसंघ नसून त्या विविध स्तरांत विभागल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून, मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे काळाची गरज आहे. कर्नाटक सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व या निकषावर आधारित दोन गटांची प्रभावी रचना केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींचे दोन गट उपवर्गीकरणात करणे आवश्यक आहे. त्यात वंचित अनुसूचित जाती आणि इतर अनुसूचित जाती असा त्याचा प्रवर्ग असावा, असे बगाडे यांनी सांगितले.

उपवर्गीकरणाची सविस्तर मांडणी करताना बगाडे म्हणाले,अनुसूचित जातीसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणापैकी सहा टक्के आरक्षण वंचित अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवावे, उर्वरित सात टक्के आरक्षण इतर अनुसूचित जातीसाठी ठेवण्यात यावे. जर एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गटातील उमेदवारास संधी देण्यात यावी. शैक्षणिक प्रवेशात दोन्ही गटांना प्रत्येकी सहा टक्के आरक्षण लागू करावे. उपवर्गीकरणानंतर पहिली रिक्त जागा वंचित अनुसूचित जातीसाठी देण्यात यावी. आरक्षणाची दोन गटात विभागणी झाल्यानंतर समाजातील विषमता कमी करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होईल, असा दावाही यावेळी बगाडे यांनी केला.

## जोरदार पावसापूर्वी शहरातील नालेसफाई करा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : पावसाळ्याच्या सुरुवातीच्या पावसानंतर लातूर शहरातील अनेक भागांत पाणी साचणे, नाल्या व गटारे तुंबणे, रस्त्यांवर चिखल व खड्डे निर्माण होणे, तसेच वाहतूक विस्कळीत होण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. पुढील जोरदार पावसापूर्वी लातूर महानगरपालिका हद्दीतील सर्व १८ प्रभागांमध्ये नालेसफाई, पाणी निचरा, रस्ते दुरुस्ती आणि पावसाळी पूर्वतयारीची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी आम आदमी पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष आश्रि्वन नलबले यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ही समस्या केवळ काही भागांपुरती मर्यादित नसून संपूर्ण शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते, नाले, गटारे, ड्रेनेज लाईन्स आणि पाणी साचणारे संवेदनशील भाग यांची तातडीने पाहणी करणे आवश्यक असल्याचे नलबले यांनी म्हटले आहे. सध्या पाऊस नसला तरी पुढील जोरदार पावसापूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडे पुरेसा वेळ आहे. मात्र, ही कामे रखडल्यास पुन्हा पाणी साचणे, वाहतूक कोंडी, चिखल, खड्डे आणि अपघाताचा धोका निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.

या निवेदनावर आम आदमी पार्टीचे जिल्हा संघटक फिरोज शेख, जिल्हा संघटक मुकेश सोनवणे, महिला शहराध्यक्ष श्रीदेवी कोलेवाड, शहर सहसचिव इरशाद शेख तसेच इतर कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहीम सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १२ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यामध्ये मतदारयादी अद्ययावत करण्यासाठी 'विशेष सखोल पुनरीक्षण' कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग करणे आवश्यक असून, जर मतदारांचे मॅपिंग झाले नाही तर त्यांना सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या वेळी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोरील सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. या कामासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षकांना ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कामाकरिता कार्यमुक्त केले असून, अस्पष्ट फोटो गोळा करून अद्ययावत करणे व डीएसई नोंदींची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. या विशेष मोहिमेअंतर्गत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन आणि डिजिटायझेशनची कामे पूर्ण करणार आहेत. मतदारांना या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी सर्व बीएलओ रोज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आपापल्या मतदान केंद्रांवर उपस्थित राहणार आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



# संक्षिप्त...

## २० जुलै पासून सामुदायिक श्री.गुरुचरित्र सारामृत पारायणासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १२ जुलै : गुरुतत्त्व प्रदीप उदगीर आयोजित सामुदायिक श्री. गुरुचरित्र सारामृत पारायण, श्री गुरुचरित्र कथामृत व नाम भक्ती सोहळा कार्यक्रमाचे उदगीर मध्ये २० जुलै २०२६ ते २३ जुलै २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आले असून आपल्या उदगीर नगरीत, उदगीर महाराज, श्री दत्तप्रभू व संत कवी प.पूज्य दासगणू महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने हा सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे स्थळ नगरेश्र्वर आर्य वैश्य मंगल कार्यालय चौबारा रोड उदगीर येथे पारायण वाचन सेवा निशुल्क असून वाचकास ग्रंथ प्रसाद रूपाने समितीतर्फे देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची रूपरेषा रुद्र अभिषेक सकाळी ७:३० ते ८:३०, श्री गुरुचरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण सकाळी ९ते १२ ,भिक्षा, नैवेद्य आरती व प्रसाद दुपारी १२:०० ते २:००, श्री गुरुचरित्र कथामृत आरती व प्रसाद दुपारी ३:०० ते ६:३०, जन्मोत्सव( दत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नरसिंह सरस्वती )कथामृत अंतर्गत २०/७/२०२६ रोजी सायंकाळी अशी या धार्मिक कार्यक्रमाची रूपरेषा असेल असे संयोजकाच्या वतीने कळविण्यात आले आहे. ज्या दानशूर भाविक भक्तांना गुरुचरित्र पारायण सोहळ्यात सहभाग नोंदणी, नित्य अन्नदान, पेयजल सेवा (चार दिवस), जन्मोत्सव सेवा, कथा पश्र्चात आरती व प्रसाद, तांबूल प्रदान सेवा, रुद्र अभिषेक, माध्यान्ह आरती ,कथा पश्र्चात आरती या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे.त्यासाठी संपर्क क्रमांक ९४ २२ ६५ १८ २३, श्री गोपाळ जोशी,८८८८७६७६५६ राजेश्र्वरी देशपांडे,९४२३३५१४६१. मेघशाम कुलकर्णी.८२०८१४२१७३ निवृत्ती जवळे. यांच्याशी संपर्क साधावा

## लातूर कॉलेज ऑफ फार्मसीला एमएसबीटीईचे 'उत्कृष्ट' मानांकन

तभा वृत्तसेवा

औसा दि.१२ जुलै : महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (एमएसबीटीई), मुंबई यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी झालेल्या संस्था अवेक्षणात श्री वेताळेश्र्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर या महाविद्यालयाला 'उत्कृष्ट' मानांकन प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक प्रमोद नाईक यांनी अभिनंदन पत्राद्वारे महाविद्यालयाच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत संस्थेला शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यातही शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रगती अशीच कायम राहावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

महाविद्यालयाचे दरवर्षी शैक्षणिक सर्वेक्षण करण्यात येते. या प्रक्रियेत शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम, उपलब्ध भौतिक सुविधा, अनुभवी प्राध्यापकांचे योगदान, टीमवर्क तसेच संस्थेचा सकारात्मक प्रतिसाद आदी निकषांवर मूल्यांकन केले जाते. या सर्व बाबींमध्ये महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे हे मानांकन प्राप्त झाल्याचे संस्थेचे सचिव वेताळेश्र्वर बावगे यांनी सांगितले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्र्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, संचालिका डॉ. माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# उदगीरला १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभारावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ. संजय बनसोडे यांची मागणी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १२ जुलै : उदगीर शहर हे एक लाख लोकसंख्येचे कर्नाटक सिमेवरील महत्वाचे शहर आहे. उदगीर हे कर्नाटकातील बिदर तसेच लातूर या दरम्यान आरोग्य सेवेसाठी अत्यंत महत्वाचे ठिकाण असुन सद्यस्थितीत उदगीर येथे २०० खाटांचे सामान्य रुग्णालय कार्यरत असून, त्या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन ३०० खाटापर्यंत करण्याचा प्रस्ताव आपल्या कार्यालयात सादर केलेला आहे. सद्यस्थितीत उदगीर येथील सामान्य रुग्णालयामध्ये दरदिवशी १५०० बाह्य रुग्ण सेवा घेतात. तसेच दरमहा स्वभाविक सिजरियन आशा एकूण ४०० प्रसूती घेतात. सध्याची रुग्णांची जागा रुग्ण संख्येच्या तुलनेत अत्यंत अपुरी पडत आहे. त्याअनुषंगाने उदगीर येथील सामान्य रुग्णालयासाठी १०० खाटांचे स्त्री रुग्णालय नव्याने मंजूर करावे अशी लेखी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देवुन याबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना आरोग्य विभागाच्या सळबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



सदर १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उदगीरला झाले तर उदगीर शहर व परिसरातील महिलांना दर्जेदार आणि विशेष आरोग्य सेवा उपलब्ध होतील.

उदगीर व जळकोट तालुक्यासह सीमावर्ती भागातील हजारो महिलांना स्त्रीरोग, प्रसूती आणि नवजात शिशू उपचारांसाठी लातूर, धाराशिव किंवा हैदराबाद येथे जावे लागते. यामुळे वेळ, पैसा आणि गैरसोयींचा मोठा सामना करावा लागतो. ही अडचण लक्षात घेऊन उदगीरमध्ये स्वतंत्र १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभारण्याची मागणी आ. संजय बनसोडे यांनी केली आहे.

या रुग्णालयामध्ये अत्याधुनिक प्रसूती कक्ष, सिझेरियन शस्त्रक्रिया सुविधा, नवजात शिशू अतिदक्षता विभाग (छखउण), स्त्रीरोग शस्त्रक्रिया विभाग, सोनोग्राफी, रक्तपेढी, प्रयोगशाळा तसेच अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर व प्रशिक्षित परिचारिकां उपलब्ध होतील व त्यामुळे मतदार संघातील माता भगिनींची सोय होणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे.

आ. संजय बनसोडे यांनी यापूर्वी उदगीरमध्ये ट्रॉमा केअर सेंटर, ऑक्सिजन प्लांट, ओपीडी इमारत, २०० खाटांचे सामान्य रुग्णालय, अत्याधुनिक रुग्णवाहिका आदी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. आता महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वतंत्र स्त्री रुग्णालयाची उभारणी ही काळाची गरज असल्याचे त्यांनी या रुग्णालयाची मागणी केली आहे.

हे रुग्णालय उभारल्यास उदगीरसह जळकोटसह परिसरातील हजारो महिलांना वेळेत आणि दर्जेदार उपचार मिळतील. प्रसूतीसाठी दूरवर जाण्याची गरज कमी होईल, आर्थिक खर्चात बचत होईल आणि ग्रामीण भागातील महिलांनाही आधुनिक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील असा विश्र्वास आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

# चॉकलेटच्या बहाण्याने अल्पवयीनवर अत्याचार

## पोक्सो अंतर्गत उदगीर पोलिसात एकावर गुन्हा




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १२ जुलै : मुखेड तालुक्यातील एका १५ वर्षीय मुलगी दुकानाला गेली असता चॉकलेट देण्याच्या बहाण्याने जबरदस्तीने दुचाकीवर बसून शहरातील अवलकोंडा रोडवरील एका महाविद्यालयाचे पाठीमागे घेऊन जाऊन बळजबरीने अत्याचार केले याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात एकाविरुध्द पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून अमोल लक्ष्मण कोकाटे (रा.नाईक चौक उदगीर) यांच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, १० जुलै रोजी सकाळी ७:३० ते ९:३० च्या दरम्यान फिर्यादीची १५ वर्षीय मुलगी ही दुकानला गेली असताआरोपीने चॉकलेट देण्याचे बहाण्याने दुचाकीवर जबरदस्तीने बसवुन अवलकोंडा रोड, जयहिंद कॉलेजच्या पाठीमागील मोकळ्या जागेत नेले. तेथे तिच्यावर अत्याचार केला. घडलेला प्रकार कोणाला सांगितला तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी गजानन भातलवंडे व पोलिस निरीक्षक दिलीप गाडे यांनी भेट देऊन माहिती घेतली.

## महात्मा गांधी इंग्लिश स्कूलमध्ये मोफत सर्वरोग निदान,आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा

औसा दि.. १२ जुलै : तालुक्यातील उजनी येथील महात्मा गांधी इंग्लिश स्कूल (सीबीएसई) आणि लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेची माजी विद्यार्थिनी स्वर्गीय श्रेया शैलजा किशोर जाजू हिच्या वाढदिवस स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाले.यावेळी जवळपास ७०० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

संस्थेचे कोषाध्यक्ष पद्मकुमार जंगमे, सौ.वर्षा जंगमे आणि कु. साक्षी जंगमे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे सचिव किशोर जाजू, संचालक डॉ.बाळासाहेब गंगणे, वसुदेव ओझा, रामेश्र्वर ओझा, रवी जोशी, घनश्याम जाजू आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये शाळेतील विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच उजनी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने जनरल मेडिसिन, कान-नाक-घसा, नेत्ररोग, बालरोग, स्त्रीरोग व प्रसूती, त्वचा व गुप्तरोग तसेच मानसोपचार विभागाशी संबंधित विविध आजारांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले.शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून त्यांना योग्य त्या आरोग्यविषयक सूचना देण्यात आल्या.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या व्यवस्थापन समितीसह, मुख्याध्यापिका आशाराणी ओझा, समन्वयक लक्ष्मी देशभ्रतार, नवनाथ स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर येथील डॉक्टरांचे विशेष सहकार्य



लाभले. दरम्यान प्रत्येक वर्षी माजी विद्यार्थिनीच्या स्मरणार्थ शाळेच्या वतीने विविध माध्यमातून आरोग्याचा जागर केला जात आहे. तो असाच पुढे सुरू ठेवण्याचा संकल्प यावेळी संचालक डॉ.बाळासाहेब गंगणे यांनी केला. शाळेच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.

# सातत्यपूर्ण प्रयत्नातून यश साकारते : बोरगावकर

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १२ जुलै : येथील लाल बहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शैक्षणिक, स्पर्धा परीक्षा आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसह विविध पुरस्कारांनी सन्मानित शिक्षकांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासूणे तहसीलदार राम बोरगावकर पोलीस निरीक्षक दिलीप गाडे शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हूरदळे व्यंकटराव गुरमे शिवाजीराव बिराजदार हा सत्कार सोहळा कौळखेड रोड वरील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात संपन्न झाला.यांत शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत १०० टक्के गुण मिळविणाऱ्या १२ विद्यार्थ्यांचा तसेच ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या ७३ विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याशिवाय पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा, नववी एन.एम.एम.एस. परीक्षा तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. विविध पुरस्कार प्राप्त शिक्षिका सुप्रिया बुधे, नीता मोरे आणि अनिता येलमटे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.तसेच अनिता येलमटे यांच्या अक्षरवाटा या साहित्यकृतीचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार राम बोरगावकर म्हणाले, कोणतेही यश किंवा अपयश अंतिम नसते. यशाचे खरे मोजमाप आपल्या मनातील जिद्द, चिकाटी आणि निर्धारावर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने सातत्याने प्रयत्नशील राहून आपले ध्येय गाठावे.पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश देताना सांगितले की, गुणवंत विद्यार्थी स्वतः च्या अभ्यासाची जबाबदारी स्वतः घेतो. त्याच्यामध्ये दृढ इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालक आणि शिक्षकांचे योगदान तितकेच महत्त्वाचे असते. शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची खरी पायाभरणी करते आणि त्यातूनच आदर्श नागरिक घडत असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात मधुकर वट्टमवार यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे योग्य नियोजन, नियमित परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुळखेडे लक्ष्मी चव्हाण प्रास्ताविक मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे वैयक्तिक गीत उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे तर आभार नेमट यांनी मानले .रूपाली थोरात यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महाराष्ट्र महाविद्यालयात वन महोत्सव उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

निलंगा: पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि निसर्ग संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र महाविद्यालयात विद्यापीठाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने वन महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन परिसरात वड, पिंपळ, लिंब, आवळा अशा विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. विजय पाटील निलंगेकर साहेब उपस्थित होते यावेळी बोलताना त्यांनी आपल्या मनोगतात वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट करताना वृक्ष

हे केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाहीत तर भविष्यातील पिढ्यांसाठी मानवी जीवनाचा आधार आहेत त्यामुळे प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे असे आवाहन केले.

वन महोत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने करण्यात आले होते व त्यासाठी उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, प्रा.प्रशांत गायकवाड राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.विठ्ठल सांडूर, प्रा. शिवरुद्र बदनाळे प्रा. श्रीकृष्ण दिवे, राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी डॉ. सचिन बसूदे, विद्यार्थी,विद्यार्थिनी आदींनी प्रयत्न केले

# येरोळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील -NM² रिक्त पदे तात्काळ भरा : तुळसाबाई लोंढे यांची मागणी

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १२ जुलै : तालुक्यातील येरोळ प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सहाय्यक परिचारिका प्रसूती सेविका -छ्च यांची पदे रिक्त असल्याने आरोग्य सेवांवर परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद सदस्या सौ. तुळसाबाई जगदीप लोंढे यांनी जिल्हा आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिराजदार यांच्या कडे तात्काळ भरती करण्याची मागणी केली आहे.




येरोळ झक्उ अंतर्गत अनेक गावांची आरोग्य सेवा चालते. -छ्च् पदे रिक्त असल्याने गरोदर मातांची तपासणी, लसीकरण, घरभेटी आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम रखडले आहेत. पावसाळ्यात साथीचे आजार वाढण्याची शक्यता असल्याने मनुष्यबळाची कमतरता मोठी अडचण ठरत आहे.

जि.प. सदस्या सौ. तुळसाबाई लोंढे म्हणाल्या, येरोळ केंद्र हे परिसरातील महिलांसाठी आधार आहे. -छ्च् नसल्याने प्रसूतीच्या वेळी महिलांना लातूरला धावावे लागत आहे. शासनाने तातडीने भरती करून ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुरळीत करावी.

स्थानीय नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. डॉक्टर आहेत पण नर्स नाही. त्यामुळे वेळेवर उपचार मिळत नाहीत अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

जिल्हा परिषद प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन येरोळ झक्उ मधील रिक्त पदे भरावीत अशी मागणी जोर धरत आहे.

## एसटी वाहकाला शिवीगाळ, तरुणाला चोप देत गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जुलै : शहरातील गजबजलेल्या महात्मा गांधी चौकात एसटी बसच्या चालक आणि वाहकाला शिवीगाळ करणाऱ्या एका तरुणाला या कर्मचाऱ्यांनी चोप दिल्याची घटना नुकतीच घडली.

या प्रकारानंतर संबंधित तरुणाला थेट गांधी चौक पोलिस ठाण्यात नेण्यात आले. भर चौकात हा राडा झाल्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मारहाणीचा हा प्रकार पाहण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी उसळल्याने या गोंधळात महात्मा गांधी चौकातील वाहतूकही काही काळासाठी विस्कळीत झाली होती.

# शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकरी पेरणी योग्य पावसाच्या प्रतीक्षेतच

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १२ जुलै : तालुक्यात सर्वसाधारणपणे जूनमध्ये पेरणी करण्याचा पिढ्याण पिढ्या चालत आलेली परंपरा तालुक्यात आहे. मृग नक्षत्रात पेरणी केल्यास धान्य चांगले उगवते, पिकाची वाढ चांगली होते, रोगप्रतिकारशक्ती पिकात येते व वेळोवेळी पावसाचा शिडकावा झाला की उत्पन्नही चांगले मिळते. मात्र या वर्षी मृग नक्षत्र पावसाची वाट पहाण्यातच निघून गेले. तालुक्यात केवळ आकाश ढगांनी भरगच्च होत आहे मात्र पाऊस पडत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. तालुक्यात पेरण्या रखडल्या आहेत. जो काही थोडा थोडका पेरा झाला आहे तो जेमतेम ओलाव्यावर पुढे पाऊस पडेल या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी केला आहे,

मात्र वर्तमान परिस्थिती पहाता केलेली पेरणी वाया जाण्याची शक्यता अधिक दिसत आहे. उडीद मुगाचा मोसम गेल्याने त्याचा पेरा होऊ शकरणार नाही.काही शेतकऱ्याकडे एक महिना पुरेल इतका चारा साठा उपलब्ध आहे,तर काही शेतकऱ्यांकडे चाराच नाही. पाणी टंचाई भासू नये म्हणून प्रशासनाकडून आवश्यक उपाय योजना केल्या गेल्या पाहिजेत. असे शेतकऱ्यातुन बोलले जात आहे. शिरुर अनंतपाळ तालुक्यातील व परिसरातील शेतकरी हे मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत असून सर्व शेतकरी बांधवांच्या नजरा या आभाळाकडे लागल्या आहेत. जून महिना संपला व जुलै महिना सुरू होऊन दहा दिवस उलटले तरी अजून मोठा पाऊस झाला नसल्याने शेतकरी चिंता व्यक्त करीत आहेत.



जून महिन्यात वेगवेगळ्या तारखेपर्यंत पाऊस पडेल असा अंदाज तज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.

परंतु जून महिनाही गेला, तज्ञांचे भाकीत फोल ठरले असे शेतकरी सांगत आहेत. रिमझिम पडलेल्या पावसावर काही शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे. तर काही शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत असून काही शेतकऱ्यांची पावसामुळे पेरणी लांबली आहे. शिरूर अनंतपाळ तालुक्यात मान्सून दाखल झाला असला तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. गेल्या काही दिवसांपासून हलक्या स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळत असल्याने काही भागांत शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. मात्र तालुक्यातील अनेक शिवारांमध्ये अद्याप पेरणी झालेली नसून शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पेरणीला शेत तयार ,पण ओलाव्याविणा माती कोरडी.त्यामुळे शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकरी सध्या मोठ्या चिंतेत आहे.

# अंबाजोगाई तालुक्यात खून!

## घाटनांदूरमध्ये भररस्त्यात तीक्ष्ण हत्याराने वार करुन तरुणाला संपवले



**अंबाजोगाई :** तालुक्यातील घाटनांदूर येथील अण्णाभाऊ साठे चौकात शनिवारी रात्री एका तेवीस वर्षीय तरुणाची तीक्ष्ण हत्यारे आणि दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची भयानक घटना उघडकीस आली आहे. ज्ञानेश्वर वाकडे (वय २३, रा. पट्टीवडगाव) असे या मृत तरुणाचे नाव असून या जीवघेण्या हल्ल्यात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. भररस्त्यात घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे परिसरात मोठी दहशत पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ज्ञानेश्वर वाकडे हा शनिवारी रात्री आपल्या एका मित्रासोबत दुचाकीवरून घाटनांदूर येथून पट्टीवडगाव या आपल्या गावाकडे जाण्यासाठी निघाला होता. हे दोघे अण्णाभाऊ साठे चौकात आले असता काही जणांनी त्यांची दुचाकी अचानक अडवली. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी ज्ञानेश्वर आणि त्याच्या मित्रावर तीक्ष्ण हत्यारे, दगड आणि विटांनी अमानुष हल्ला चढवला. या भयंकर मारहाणीत रक्ताच्या थारोळ्यात पडून ज्ञानेश्वरचा मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेला मित्र या हल्ल्यात गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. हा जीवघेणा हल्ला कोणत्या कारणास्तव झाला हे अद्याप समजू शकलेले नाही. कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणाऱ्या या घटनेने सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# थकीत रक्कम न दिल्याने खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षांच्या घराबाहेर आत्महत्येचा प्रयत्न

## कुटुंबाचा रुग्णालयात नेण्यास विरोध

**माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील वारोळा येथील रहिवासी नवनाथ गणपत पवार यांनी आर्थिक व्यवहारातील लाखो रुपयांची थकीत रक्कम मिळत नसल्याचा आरोप करत टोकाचे पाऊल उचलले.दि १० जुलै शुक्रवार रोजी सकाळी ९:३०** वाजण्याच्या सुमारास माजलगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जगन्नाथ जाधव (छत्र बोरगावकर) यांच्या स्वामी विवेकानंद नगर येथील निवासस्थानासमोर विषारी द्रव्य प्राशन करून नवनाथ पवार यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली.या प्रकारामुळे माजलगाव शहरात एकच खळबळ उडाली.

**या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार,माजलगाव तालुक्यातील वारोळा तांडा येथील नवनाथ पवार यांनी अनेक वर्षांच्या मैत्री व विश्वासाच्या नात्यामुळे खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जाधव यांना मोठी आर्थिक मदत केल्याचा दावा केला आहे.मात्र वारंवार मागणी करूनही संबंधित रक्कम परत मिळाली नसल्याने न्याय मिळावा या मागणीसाठी त्यांनी दि १५ जून २०२६ पासून आपल्या कुटुंबासह दिपक जाधव यांच्या घरासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. यावेळी काही लोकांनी मध्यस्थी करून प्रकरण मिटवले होते परंतु तरीही दिपक जाधव हे पैसे देत नसल्याने दि १० जुलै शुक्रवार रोजी जाधव यांच्या निवासस्थानासमोर सकाळी** ९:३० वाजण्याच्या सुमारास नवनाथ पवार यांनी कुटुंबीयां समवेत येऊन विषारी औषध प्राशन केल्याचे सांगण्यात आले आहे.

**उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास कुटुंबीयांचा विरोध :**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.मात्र विष प्राशन केलेल्या नवनाथ पवार यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास त्यांच्या कुटुंबीयांनी तीव्र विरोध केला. "आमची थकीत रक्कम मिळावी, अन्यथा आमचा माणूस मेला तरी हरकत नाही," अशी आक्रमक भूमिका कुटुंबीयांनी घेतल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.सुमारे पाऊण तास चाललेल्या गोंधळानंतर महिला पोलिसांच्या उपस्थितीत पोलिसांनी नवनाथ पवार यांना ताब्यात घेऊन बळजबरीने रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

**आर्थिक व्यवहारातून टोकाचे पाऊल :**

नवनाथ पवार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. या घटनेमुळे माजलगाव शहरात मोठी खळबळ उडाली असून आर्थिक व्यवहाराच्या वादातून एवढे टोकाचे पाऊल उचलले गेल्याने विविध स्तरांतून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान,या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत

# आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सिरसाळा येथे ग्रामीण विकासाचा प्रत्यक्ष अनुभव

## ग्लोबल विकास ट्रस्ट मध्ये सात दिवसीय प्रशिक्षण



**बीड :** शहरातील आदित्य कृषी महाविद्यालय बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक उपक्रम कार्यक्रमांतर्गत सात दिवसीय निवासी एन.जी.ओ. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा येथील 'ग्लोबल विकास ट्रस्ट' अंतर्गत कार्यरत कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात नेहमीच विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रावरील संशोधन आणि कार्यानुभावाची माहिती मिळावी, या उद्देशाने या सात दिवसीय निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षणादरम्यान ग्लोबल विकास ट्रस्टचे अधिकारी डॉ. प्रवीण मांजरे यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांची कार्यपद्धती, ग्रामीण विकासातील त्यांचे योगदान, शेतकरी प्रशिक्षण उपक्रम, महिला सक्षमीकरण आणि विविध शासकीय कृषी विकास योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची संधी मिळाली.

# गजानन महाराजांच्या पालखी सोबत चोरटे कसे ?

## गर्दीचा फायदा घेत 48 ग्रॅम सोन्याची चैन लंपास

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात गजानन महाराज पालखी सोहळ्यात दर्शनासाठी आलेल्या एका ज्येष्ठ व्यावसायिकाच्या गळ्यातील तब्बल 48 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 303(2) अन्वये गुन्हा क्रमांक 290/2026 दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुभाष भगवानराव डोंगरे (वय 81, रा. मंगळवार पेठ, अंबाजोगाई) हे 10 जुलै 2026 रोजी दुपारी सुमारे 2 ते 3 वाजण्याच्या दरम्यान साठे चौक परिसरात गजानन महाराज पालखीचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. यावेळी मोठ्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील 48 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरून नेल्याची तक्रार त्यांनी दिली.

### अंबाजोगाई शहर पोलिसांचा धडाकेबाज ॲक्शन मोड सुरू!

# एका दिवसात गुटखा माफिया आणि मटका चालकावर कारवाई

**अंबाजोगाई :** पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारल्यापासून अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेली धडक मोहीम अधिक तीव्र होताना दिसत आहे. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांनी पुन्हा एकदा दमदार कारवाई करत प्रतिबंधित गुटखा तस्करी आणि कल्याण मटका जुगार या दोन स्वतंत्र प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करून संबंधित आरोपींवर कारवाई केली आहे.

**पहिली कारवाई :** प्रतिबंधित गुटखा वाहतूक उघड

दिनांक 10 जुलै 2026 रोजी मध्यरात्री सदरबाजार नाका, अंबाजोगाई येथे पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. यावेळी नसरोद्दीन अल्लाउद्दीन शेख (वय 52) याच्या ताब्यातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित पान मसाला व गुटखा जप्त करण्यात आला.

या कारवाईत सुमारे ₹34,412 किमतीचा गुटखा तसेच ₹70,000 किमतीची मोटारसायकल असा एकूण ₹1,04,412 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 123, 223, 274 व 275 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**दुसरी कारवाई :** छत्रपती, शिवाजी महाराज चौकात मटका अड्ड्यावर धाड

याच दिवशी दुपारी छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबाजोगाई येथे पोलिसांनी आणखी एक धाड टाकत रोहित जयभीम काकडे (वय 30) याला कल्याण मटका जुगार चालविताना रंगेहाथ पकडले.

आरोपीकडून ₹5,100 रोख रक्कम तसेच मटका जुगाराची नोंद असलेल्या चिठ्ठ्या जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, 1887 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध धंद्यांना पोलिसांचा इशारा

पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाई शहर पोलिसांनी अवैध व्यवसायांविरोधातील कारवाईचा वेग वाढविला असून, शहरातील गुटखा, मटका, जुगार व इतर बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे या कारवायांवरून स्पष्ट होत आहे.

अंबाजोगाई शहरात कायदा मोडणाऱ्यांवर पोलिसांचा करडा वचक निर्माण होत असून, नागरिकांनीही अशा अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने श्री संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे बीड शहरात स्वागत!



बीड (प्रतिनिधी):- श्रीक्षेत्र मुक्ताई नगर येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवलेल्या श्री संत मुक्ताई यांच्या पालखी सोहळ्याचे शनिवार दि.11 जुलै रोजी बीड शहरात आगमन झाले. यावेळी सुभाष रोड येथील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने या पालखी सोहळ्याचे ढोल-ताशा, फटाक्याची आतिषबाजी आणि वारकर्यांना आल्पोपहार देवून बीड शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी भव्यदिव्य स्वागत केले. श्री संत मुक्ताई यांच्या पालखीची महाआरती झाल्यानंतर पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज, सुधाकर महाराज, बीड शहर वाहतुक शाखेचे पो.निरीक्षक वैभव पाटील व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. श्री संत मुक्ताई यांची पालखी गत 318 वर्षापासून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. गेल्या अनेक वर्षी पासून श्री संत मुक्ताईंची पालखी ही शहरात मुक्कामी असते. आज शुक्रवार दि.16 जून रोजी पालखी सोहळ्यातील वारकर्यांचे बीड शहरात आगमन झाले असता सुभाष रोडवरील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने भव्य दिव्य स्वागत केले. साठे चौक ते माळीवेस चौका पर्यंत मनमोहक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दरवर्षी प्रमाणे आदर्श मार्केट व्यापारी संघटनेकडून वारकर्यांना आल्पोपहार दिला गेला. श्री संत मुक्ताई यांच्या पादुकांची महाआरती संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांच्या हस्ते करण्यात आली.

# एसटी’ सेवा बंद,रस्ता खराब : सात गावांतील ग्रामस्थ संतप्त



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई आगारातील जुन्या व नादुरुस्त बसांमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन आमदार नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे आगाराला नव्याने पाच ‘राजमाता जिजाऊ’ बस मंजूर झाल्या आहेत. मात्र, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई तालुक्यातील श्रीपतरायवाडी, कोळकानडी, माकेगाव, हिवरा, सोमनाथ बोरगाव, धानोरा खुर्द आणि आपेगाव या सात गावांतील ग्रामस्थांनी ‘एसटी’ बस सेवा बंद असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या मार्गावरील बस सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खासगी वाहनांचे वाढलेले भाडे आणि रस्त्याची दुरवस्था यामुळे ग्रामीण भागातील ग्रामस्थांची आर्थिक व मानसिक कोंडी होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संबंधित ग्रामस्थ लवकरच आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. याशिवाय, प्रशासनाने वेळेत सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल तसेच आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# परळी रेल्वे विकास समितीने दक्षिण मध्य रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांची घेतली भेट

## दक्षिण मध्य रेल्वेच्या खासदारांच्या बैठकीत रेल्वेसंबंधी मागण्यांचे दिले निवेदन

**परळी वैजनाथ( प्रतिनिधी):** दक्षिण मध्य रेल्वेची सुमारे दोन वर्षांनंतर नांदेड विभागातील खासदारांची मुख्य व्यवस्थापकांसमवेत बैठक नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती.

परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी आणि रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी परळी रेल्वे विकास समिती, मराठवाडा जनता विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी दक्षिण मध्य रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांच्यासह

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकरावजी चव्हाण,खासदार डॉ.अजित गोपछडे,परभणीचे खासदार बंडू जाधन यांना भेटून निवेदन सादर केले.



दक्षिण मध्य रेल्वेच्या महसूल देणाऱ्या महत्त्वाच्या स्थानकांपैकी परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा समावेश असूनही दक्षिण मध्य रेल्वे दुजाभाव करूनअपेक्षित सुविधा उपलब्ध नसल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये परळी वैजनाथ जंक्शनचे मध्य रेल्वेमध्ये हस्तांतरण, स्थानकावर पिट लाईन मंजूर करणे आणि ज्योतिर्लिंग वैद्यनाथ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पर्यटक माहिती केंद्र उभारणे यांचा समावेश आहे.

याशिवाय मुंबई-लातूर एक्सप्रेस,मछलीपट्टणम-बिदर एक्सप्रेस आणि हैदराबाद-बिदर इंटरसिटी या रेल्वेगाड्यांचा परळी/नांदेडपर्यंत विस्तार करण्याची मागणी करण्यातआलीआहे. चार ज्योतिर्लिंगांना जोडणारी ‘ज्योतिर्लिंग एक्सप्रेस’ सुरू करण्याबरोबरच सिकंदराबाद-जम्मू तवी, कन्याकुमारी-उधमपूर, रामेश्वरम- ओखा आणि हैदराबाद- अजमेर या नव्या रेल्वे सेवा परळी मार्गे चालविण्याचाही प्रस्ताव देण्यात आला आहे. परळी वैजनाथ मार्गे पुणे, मुंबई आणि हैदराबाद यांना जोडणारी वंदे भारत एक्सप्रेस सुरू करावी, तसेच कोल्हापूर-धनबाद आणि कोल्हापूर-नागपूर या रेल्वेगाड्या दररोज धावाव्यात,अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. शहरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर जलालपूर परिसरात नवीन रेल्वे उड्डाणपूल उभारावा,अशी मागणी करण्यात आली आहे. मानवत-पाथरी-सोनपेठ-परळी आणि घाटनांदूर-अंबाजोगाई-जा मखेड-दौंड या महत्त्वाच्या रेल्वे मार्ग प्रकल्पांसाठी तसेच घाटनांदूर येथे लुटमार व चोरीच्या घटना वारंवार घडत आहेत त्यांना आळा बसण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल व लोहमार्ग पोलिसांची घाटनांदूर येथे आऊटपोस्टसाठी विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची मागणीही निवेदनात केली आहे. यावेळी परळी रेल्वे विकास समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक जी.एस.सौंदळे सर,मुख्य समन्वयक कैलास तांदळे,श्रीकांत पाथरकर, मुकेश भूतडा आदी उपस्थित होते.

# बीडच्या नगर रोडवरील बावळे कॉम्प्लेक्सचा स्लॅब कोसळला एसबीआय बँकेचे एटीएम सुविधाचे की दुर्घटनेचे सेंटर ?

**बीड :** बीड शहरातील नगर रोडवरील पोलिस पेट्रोल पंपाजवळील बावळे कॉम्प्लेक्समधील SBI एटीएमचा स्लॅब दोन दिवसापूर्वी अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. सुदैवाने घटनेच्या वेळी एटीएममध्ये कोणताही ग्राहक नसल्याने जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेने शहरातील जुन्या व धोकादायक इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याची दखल घेऊन नगरपालिका काही ॲक्शन घेणार आहे का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. वाढती लोकसंख्या आणि ग्राहकांच्या सोयीसाठी राष्ट्रीयकृत बँकासह विविध बँकांनी जागोजाग एटीएम मशीनची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. हे एटीएम अनेक वर्षांपासून एकाच इमारतीमध्ये आहे. बावळे कॉम्प्लेक्स मधील या घटनेनंतर एटीएमच्या छताचा मोठा भाग कोसळून लोखंडी सळ्या उघड्या पडल्या. काही क्षणांचा फरक पडला असता तर मोठी दुर्घटना घडली असती, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# परळीचे सुपुत्र किरण गित्ते (IAS) यांच्या ऐतिहासिक नियोजनातून त्रिपुरात 1.21 लाख कोटींची विक्रमी गुंतवणूक!

## 'डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह 2026' मध्ये जागतिक कंपन्यांसह 10 देशांच्या राजदूतांची उपस्थिती; गित्ते साहेबांच्या धोरणात्मक नेतृत्वाचे देशपातळीवर कौतुक.

**परळी (प्रतिनिधी) :** परळीचे सुपुत्र आणि त्रिपुरा शासनाचे उद्योग व वाणिज्य सचिव, माननीय श्री. किरण गित्ते साहेब (IAS) यांच्या दूरदृष्टी, उत्कृष्ट नियोजन आणि प्रशासकीय कौशल्यातून त्रिपुरा राज्याने औद्योगिक क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे. गित्ते साहेबांच्या मुख्य नियोजनातून आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय 'डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२६' अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला. या परिषदेच्या माध्यमातून त्रिपुरा राज्यामध्ये तब्बल १,२१,३०३+ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक गुंतवणुकीचे उद्दिष्ट असणारे ३४२ हून अधिक सामंजस्य करार (MoUs) करण्यात आले आहेत. ईशान्य भारताला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनवण्याच्या या मोहिमेचे मुख्य सूत्रधार म्हणून किरण गित्ते साहेबांच्या नावाचा आणि नेतृत्वाचा गौरव होत आहे.

केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि जागतिक दिग्गजांची उपस्थिती

या भव्य परिषदेचे उद्घाटन त्रिपुराचे माननीय मुख्यमंत्री प्रा. (डॉ.) माणिक साहा यांच्या हस्ते झाले. तर भारत सरकारचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री. पियुष गोयल आणि ईशान्य प्रदेश विकास व दळणवळण मंत्री श्री. ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

**विशेष म्हणजे, किरण गित्ते साहेबांच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावरील १० देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त या परिषदेला प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये:**

**बांगलादेश:** उच्चायुक्त महामहिम श्री. एम. रियाझ हमीदुल्ला व सहायक उच्चायुक्त श्री. झिकुल हसन फहद

**फिलीपिन्स:** वाणिज्यदूत सुश्री मेलिसा ॲन तेलान

**तिमोर-लेस्ते:** राजदूत महामहिम श्री. कार्लिटो न्युनेस

**लाओस:** राजदूत महामहिम श्रीमती विथया झायवोंग

**कझाकस्तान:** उपराजदूत श्री. डारखान सेतेनोव्ह

**चिली:** राजदूत महामहिम श्री. जुआन रोलँडो अँगुलो मॉन्साल्वे

**नेपाळ:** प्रभारी डॉ. सुरेंद्र थापा व आर्थिक सल्लागार श्री. रवींद्र जंग थापा

**उझबेकिस्तान:** आर्थिक सल्लागार श्री. अब्दुलअजीज अब्दुखालिलोव्ह

**दक्षिण आफ्रिका:** उप उच्चायुक्त श्री. सेड्रिक चार्ल्स क्रॉली

**जपान (JETRO):** वरिष्ठ संचालक सुश्री हारुका मारुयामा यांचा समावेश होता.

देशातील पहिल्या क्रमांकाच्या सुधारणांचे 'कॅबिनेट सचिवालयाकडून' कौतुक



परिषदेत बोलताना भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन आणि कॅबिनेट सचिवालयाचे विशेष सचिव श्री. केशव कुमार पाठक यांनी त्रिपुरा राज्याचे विशेष कौतुक केले. 'अनुपालन कपात आणि नियमनमुक्ती उपक्रमा'अंतर्गत सर्व ५१ प्राधान्यक्रमाच्या सुधारणा पूर्ण करणारे त्रिपुरा हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. गित्ते साहेबांच्या मार्गदर्शनाखाली नोकरशाहीतील अडथळे दूर करून 'एक-खिडकी मंजुरी' (Single Window Clearance) आणि डिजिटल प्रशासनामुळे राज्याने 'व्यवसाय सुलभतेत' (Ease of Doing Business) देशात अव्वल स्थान मिळवले असून इतर राज्यांसाठी त्रिपुरा आदर्श बनले असल्याचे त्यांनी सांगितले.

गुगल, सेल्सफोर्ससह नामांकित कंपन्यांची मोठी भागीदारी

या कॉन्क्लेव्हमध्ये राज्यातील आणि देशाबाहेरील १,२०० हून अधिक संस्थांमधून २,००० हून अधिक मोठे गुंतवणूकदार सहभागी झाले होते. यामध्ये आयटीसी वेलकम ग्रुप, जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO), गुगल (Google), सेल्सफोर्स (Salesforce), लुलू ग्रुप इंटरनॅशनल, मॅक्लेक, अंबुजा निओटिया, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, एनएलसी इंडिया, जीआयझेड जर्मनी यांसारख्या बलाढ्य कंपन्यांशी आयटी, एआय, हॉस्पिटॅलिटी, वैद्यकीय शिक्षण आणि ऊर्जा क्षेत्रासाठी १० प्रमुख विशेष करारांची देवाणघेवाण झाली.

**क्षेत्रनिहाय गुंतवणुकीचे सविस्तर वर्गीकरण (१,२१,३०३+ कोटी):**

**किरण गित्ते साहेबांनी तयार केलेल्या क्षेत्र-विशिष्ट (Sector-specific) धोरणामुळे सर्वच विभागांना मोठी गुंतवणूक मिळाली आहे:**

**उद्योग आणि वाणिज्य:** रु. ३०,००० कोटी

**ऊर्जा क्षेत्र (TSECL - १८,१०० कोटी + TREDA - १२,९८० कोटी):** एकूण रु. ३१,०८० कोटी

**शहरी पायाभूत सुविधा:** रु. १५,७४२ कोटी

**माहिती तंत्रज्ञान (IT & AI):** रु. १३,२४८ कोटी

**पर्यटन व परिवहन (पर्यटन - १२,३०३ कोटी + परिवहन - ३,०५६ कोटी):** एकूण रु. १५,३५९ कोटी

**आरोग्य व वैद्यकीय शिक्षण:** रु. ४,००० कोटी

**उच्च शिक्षण व शालेय शिक्षण:** रु. ३,५६८ कोटी

**बांबू, रबर, अगरवुड लागवड व प्रक्रिया:** रु. १,७०० कोटी

**कृषी, फलोत्पादन, मत्स्य आणि पशुधन (ARDD):** रु. ४,५५३ कोटी

परळीकरांसाठी आणि महाराष्ट्रासाठी गौरवास्पद कामगिरी!

त्रिपुरा मंत्रिमंडळातील सर्व प्रमुख मंत्री अनुक्रमे श्री. रतनलाल नाथ (ऊर्जा व कृषी), श्रीमती संताना चकमा (उद्योग), श्री. सुशांत चौधरी (पर्यटन), श्री. टिंकू रॉय (कामगार), श्री. शुक्ला चरण नोतिया (सहकार) आणि श्री. अनिमेश देबबर्मा (वन) यांनी गित्ते साहेबांच्या या संपूर्ण नियोजनाचे आणि गुंतवणुकीच्या धोरणाचे स्वागत केले आहे.

एका छोट्याशा राज्यात थेट जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांना आकर्षित करून १.२१ लाख कोटींचा टप्पा पार करून देणारे मुख्य आयोजक हे परळीचे सुपुत्र श्री. किरण गित्ते राहिल्यामुळे, संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात त्यांच्या या ऐतिहासिक प्रशासकीय कामगिरीचे प्रचंड कौतुक होत असून परळीची मान देशात उंचावली आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या संदर्भात आज मोर्चे

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१२ जुलै -**

अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात येत्या १७ जुलै रोजी लोहारा तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय तालुकास्तरीय बैठकीत घेण्यात आला. बैठकीस तालुक्यातील विविध गावांतील अनुसूचित जाती समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मोर्चाच्या नियोजनासाठी शहरातील बौद्ध विहार येथे नगरसेवक जालिंदर कोकणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी रवीकिरण बनसोडे, हर्षल कोकणे, मुकेश सोनकांबळे, उत्तम भालेराव, प्रा. गणेश कांबळे, गजेंद्र डावरे, काकासाहेब भंडारे, तानाजी गायकवाड, तानाजी माटे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत उपस्थितांनी आरक्षणाचे उपवर्गीकरण झाल्यास अनुसूचित जाती समाजात फूट पडण्याची भीती व्यक्त केली. राज्य सरकारच्या भूमिकेमुळे समाजात मतभेद निर्माण होऊन सामाजिक ऐक्याला धक्का बसू शकतो, अशी चिंता व्यक्त करत या निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला.

अनुसूचित जाती समाजाच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने १७ जुलै रोजीच्या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त...



### वडगाव सिद्धेश्वर प्रशालेतील विद्यार्थ्यांना टिफिन बॅगचे वाटप

**धाराशिव, दि.१२ जुलै -**

भारत विकास परिषदेच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हा परिषद प्रशाला, वडगाव सिद्धेश्वर येथील इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले. परिषदेच्या संपर्क, सहयोग, संस्कार, सेवा आणि समर्पण या पंचसूत्रीअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ. सचिन रामढवे यांनी भारत विकास परिषदेच्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व पर्यावरण विषयक उपक्रमांची माहिती देत 'भारत की खोज' स्पर्धा परीक्षेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मुख्याध्यापिका ज्योती राऊत यांनी परिषदेच्या या शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमास सचिव सुहास हिंदाणे, उपाध्यक्ष प्रशांत कावरे, सिद्धार्थ विठ्ठलदास, प्रांत संपर्क प्रमुख नरेंद्र पाठक, डॉ. दिपाली रामढवे, तृप्ती कठारे, मिताली विठ्ठलदास, श्वेता जेवळीकर, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### घरासमोरून मोटारसायकल लंपास; एकावर गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.१२ जुलै -**

परंडा तालुक्यातील पाचपिंपळा येथे घरासमोर उभी केलेली सुमारे २० हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची काळ्या रंगाची मोटारसायकल (एमएच २५ बीबी ७८९६) चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी गणेश रमेश खैरे (वय २८, रा. पाचपिंपळा, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० जुलै रोजी सकाळी १० ते ११ जुलै रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या घरासमोर उभी असलेली मोटारसायकल चोरीस गेली. या प्रकरणात मुजा भगवान मोरे (रा. कारी, जि. बीड) यांच्यावर चोरीचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.



### टीईटीमधून २०१० पूर्वीच्या शिक्षकांना वगळण्याची मागणी

**धाराशिव, दि.१२ जुलै -**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनामार्फत केंद्र व राज्य शासनाकडे पाठविण्यात आले. २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) मधून वगळण्यात यावे, तसेच महाराष्ट्रातील कार्यरत शिक्षकांसाठी तेलंगणा, तामिळनाडू, उत्तर प्रदेश व पंजाबच्या धर्तीवर स्वतंत्र व सुलभ परीक्षा घेण्यात यावी, परीक्षेची कठीणता आणि उत्तीर्णतेसाठीची गुणमर्यादा कमी ठेवावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी लालासाहेब मगर, बशीर तांबोळी, बाळासाहेब वाघमारे, अविनाश मोकाशे, सुरेश भालेराव, शिवाजी साखरे, बिलाल सौदागर, युवराज जाधव यांच्यासह शिक्षक आंदोलनात सहभागी झाले.

## बोरी धरणातील पाण्याला गळती

**११.८६% साठ्यातून दररोज हजारो लिटर पाणी वाया, तातडीच्या दुरुस्तीची मागणी**



**पिण्याच्या पाण्यावर संकटाची शक्यता...**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ जुलै -**

नळदुर्ग येथील बोरी धरणातून कॅनॉलमध्ये पाणी सोडण्यात येणाऱ्या मोरीजवळ मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरू असल्याने दररोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. धरणात सध्या केवळ ११.८६ टक्के पाणीसाठा शिल्लक असताना ही गळती तातडीने बंद करून मौल्यवान पाण्याची नासाडी रोखावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सध्या पावसाने ओढ दिल्यामुळे संपूर्ण परिसरात पाणीटंचाईची चिंता वाढली आहे. पावसाळा सुरू होऊन महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही बोरी धरणाच्या पाणीसाठ्यात एक टक्क्याचीही वाढ झालेली नाही. या धरणावर नळदुर्ग, तुळजापूर आणि अणदूर परिसरातील अनेक मोठी गावे पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. त्यामुळे धरणातील प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना सुरू असलेली गळती चिंतेचा विषय ठरत आहे.

माहितीनुसार, कॅनॉलच्या सिमेंटीकरणाचे काम सुरू असताना संबंधित ठेकेदाराने पाण्याच्या प्रवाहासाठी कॅनॉल एका ठिकाणी फोडला होता. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतरही त्या ठिकाणाची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्याचबरोबर धरणाच्या बाजूने झालेल्या लिकेजमुळे पाणी कॅनॉलमध्ये येऊन फोडलेल्या भागातून थेट नदीपात्रात जात असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत आहे.



हवामान विभागाने यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज असताना धरणातील पाणी गळतीमुळे वाया जाणे धोक्याची घंटा मानली जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ही गळती अनेक दिवसांपासून सुरू असूनही पाटबंधारे विभागाने अद्याप ठोस उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे भविष्यात निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पाटबंधारे विभागाने तातडीने गळतीचे मूळ शोधून ती बंद करावी, तसेच कॅनॉल फोडलेल्या ठिकाणाची संबंधित ठेकेदाराकडून त्वरित दुरुस्ती करून घ्यावी, अशी मागणी होत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन बोरी धरणातील पाण्याची होणारी नासाडी तात्काळ थांबविण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## श्री तुळजाभवानी मातेस २८१ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ जुलै -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेस रविवारी (दि.१२ जुलै) श्रीक्षेत्र उमरखेड (जि. यवतमाळ) येथील श्री चिन्मय मूर्ती संस्थानच्या वतीने २८१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र भक्तिभावाने अर्पण करण्यात आले. धार्मिक वातावरणात झालेल्या या सोहळ्याने मंदिर परिसर भक्तिमय झाला.

यावेळी श्री चिन्मय मूर्ती संस्थानचे मठाधिपती परमपूज्य माधवानंद गुरुवामनानंद स्वामी महाराज यांच्या शुभहस्ते श्री तुळजाभवानी मातेस विधिवत अभिषेक, पूजा-अर्चा आणि ओटी भरण्याचा धार्मिक विधी संपन्न झाला. याप्रसंगी संस्थानचे कुलमुखत्यार ॲड. महेश कनकदंडे व मोहिनी कनकदंडे यांनी देवीप्रती असलेल्या श्रद्धेचे प्रतीक म्हणून २८१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण केले. या पवित्र सोहळ्यानिमित्त श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने परमपूज्य स्वामी महाराज यांच्या दर्शनासाठी डोलीची विशेष व्यवस्था करण्यात आली. मंदिरातील पारंपरिक धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर मंदिर संस्थानच्या वतीने परमपूज्य माधवानंद गुरुवामनानंद स्वामी महाराज, ॲड. महेश कनकदंडे आणि मोहिनी कनकदंडे यांचा श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि महावस्त्र देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

## प्रेमाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जुलै -**



**पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल...**

भूम तालुक्यातील एका गावातील १७ वर्षे २ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर प्रेमाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध भूम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० जानेवारी २०२६ ते १० जुलै २०२६ या कालावधीत संबंधित तरुणाने अल्पवयीन मुलीला प्रेमाचे आमिष दाखवून तिच्या घरामागील ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने ११ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भूम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४ (२)(एफ)(आय)(एम) तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२ मधील कलम ४, ८ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## रुपामाता नॅचरल शुगरमध्ये मिल रोलर पूजन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जुलै -**

रुपामाता नॅचरल शुगर युनिट क्र. १, पाडोळी (आ.), ता. जि. धाराशिव येथे गाळप हंगाम २०२६-२७ निमित्त आयोजित मिल रोलर पूजन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी कारखान्याची प्रतिदिन गाळप क्षमता ८०० टनांनी वाढवून २८०० टन करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

समारंभाची विधिवत पूजा रुपामाता परिवाराचे मार्गदर्शक तथा माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर गुंड (गुरुजी) आणि हभप. बाबुरावजी पुजारी यांच्या हस्ते करण्यात आली. यानिमित्त गाळप हंगाम २०२६-२७ च्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक तथा भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकट गुंड पाटील आणि कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग समूह सातत्याने प्रगतीपथावर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

समारंभात बोलताना सुधाकर गुंड (गुरुजी) यांनी सांगितले की, गाळप क्षमता वाढविल्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस वेळेत, जलद गतीने आणि पूर्ण क्षमतेने गाळप होणार आहे. त्यामुळे ऊस वाहतुकीतील विलंब कमी होऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. शेतकरी केंद्रस्थानी ठेवून करण्यात आलेला हा औद्योगिक विस्तार परिसराच्या कृषी व औद्योगिक विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



**गाळप क्षमता २८०० टनांपर्यंत वाढ**

याप्रसंगी जनरल मॅनेजर एम. जी. राठोड, चीफ इंजिनिअर अविनाश समुद्रे, डेप्युटी चीफ इंजिनिअर संजय गुंड पाटील, चीफ केमिस्ट दिगंबर आवताडे, सुरक्षा अधिकारी लोकरे, हर्षल मोहिते, अनिकेत नवले यांच्यासह विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पाटील यांनी केले.

## फटाके-केकला फाटा; वाढदिवसानिमित्त फळझाडांच्या रोपांची अनोखी भेट



**सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.१२ जुलै -**

कळंब तालुक्यातील येरमाळा केंद्रांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पानगाव येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी आणि वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला.

शाळेतील उपक्रमशील शिक्षक विनोद गाडेकर यांनी त्यांचे धाकटे बंधू व परभणी जिल्ह्यात शिक्षक म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रमोद गाडेकर यांच्या ११ जुलैच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्याऐवजी उपयोगी फळझाडांची रोपे भेट देत वाढदिवस साजरा केला. याचवेळी शाळेतून सातवी उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शाळा सोडल्याच्या दाखल्यासोबत एक आठवण जि.प.च्या शाळेची... या उपक्रमांतर्गत केशर आंबा, दशहरी आंबा किंवा फणसाचे रोप भेट देण्यात आले. या उपक्रमामागील उद्देश वाढदिवसावरील अनावश्यक खर्च टाळणे, फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करणे, पर्यावरण संवर्धनाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाची सवय रुजविणे हा आहे. ही फळझाडे भविष्यात उत्पन्नाचे साधन ठरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक हातभार लावू शकतात, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमाची संकल्पना व नियोजन शिक्षक विनोद गाडेकर यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक सचिन ताकपिरे आणि शिक्षक भाऊसाहेब जाधवर यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीस विनोद जाधव, रूपाली बेदरे, प्रणिता पाटील आणि मनीषा तांबारे यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमात शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य दीपक ओव्हाळ यांनी उपक्रमाचे तसेच शाळेत सुरू असलेल्या सकारात्मक बदलांचे कौतुक केले. यावेळी सातवी उत्तीर्ण विद्यार्थी, त्यांचे पालक आणि आजी-आजोबा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ट्रॅक्टरच्या धडकेत ८ वर्षीय चिमुकलीचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा येथे ट्रॅक्टरच्या धडकेत आठ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली असून, ट्रॅक्टर चालकाविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रेया गोकुळ माळी (वय ८, रा. बामणी, ता. जि. धाराशिव) ही १० जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ७.४५ वाजता काक्रंबा येथील फुलसागर यांच्या घरासमोरील रस्त्यावर खेळत होती. त्यावेळी एमएच २५ एएस ८६४२ क्रमांकाचा ट्रॅक्टर चालक बापू भारत बेडगे (रा. काक्रंबा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) याने ट्रॅक्टर भरधाव व निष्काळजीपणे चालवून श्रेयाला धडक दिली.

या अपघातात श्रेया गंभीर जखमी झाली आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

याप्रकरणी गणपती बळी माळी (वय ५५, रा. बामणी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तुळजापूर शहरामध्ये मोकाट डुकरांचा सुळसुळाट

**परिसरातील नागरिक त्रस्त, तातडीच्या कारवाईची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ जुलै -**

शहरातील पुजारी नगर, मस्के प्लॉट्स व नळदुर्ग रोड परिसरात मोकाट डुकरांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

डुकरांचे कळप सोसायट्या, रस्ते आणि मोकळ्या जागांमध्ये फिरत असल्याने अस्वच्छता, दुर्गंधी तसेच अपघात व संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.



अनेक तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली असून, नगरपालिका प्रशासनाने विशेष मोहीम राबवून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### डुक्कर पालकांना सूचनावजा पत्र

उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी यांनी सांगितले की, शहरातील मोकाट डुकरांच्या समस्येची दखल घेत डुक्कर पालकांना सूचनावजा पत्र देण्यात आले आहे. डुक्कर मोकाट सोडू नयेत व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.


### जाहिर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उमरगा यांचे कार्यालय**

प्रकरण क्र.६४३/२०२५

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **सुभाष शरणप्पा झुरळे रा.मुरुम ता. उमरगा** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी (त्यांची मुलगी नामे **सदिक्षा सुभाष झुरळे** रा. मुरुम ता.उमरगा यांचा) यांचा **जन्म दिनांक २०.०८.२००९** रोजी मुरुम येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयातलेखो स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १९.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार,**
तहसिल कार्यालय, उमरगा

### जाहिर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उमरगा यांचे कार्यालय**

प्रकरण क्र.६४२/२०२५

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **सुभाष शरणप्पा झुरळे रा. मुरुम ता. उमरगा** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी (त्यांची मुलगी नामे **धरती सुभाष झुरळे** रा. मुरुम ता.उमरगा यांचा) यांचा **जन्म दिनांक २१.०१.२०१३** रोजी मुरुम येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १९.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार,**
तहसिल कार्यालय, उमरगा